# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २१/०८/२००६

आज दि. २१/०८/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. २७/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ३) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला बालकल्याण |
| ४) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ५) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ६) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १२) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १८) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २२) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २३) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २७) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| २८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २९) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३०) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३३) | श्रीम. सय्यद नुरजहॉं नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३४) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३६) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३७) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ३८) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४१) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४४) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४५) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ४६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ४८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ४९) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५०) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५१) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५२) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५४) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५५) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५६) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५७) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५८) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ५९) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६०) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६१) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| २) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ६) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ८) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ११) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| १२) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| १४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| १५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| २) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ३) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ५) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ६) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ७) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

दि.२१/८/२००६ ची मा. महासभा. सर्वांना नमस्कार. महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित असलेले या शहराचे आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, तसेच उपस्थित असलेले सचिव हरेश पाटील साहेब, विरोधी पक्षनेते परशुराम पाटील साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व पक्षाचे गटनेते, प्रभाग समितीचे सर्व अध्यक्ष, उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेविका, सर्व सन्मा. उपायुक्त व सर्व खात्याचे अधिकारी, सर्व वृत्तपत्रामध्ये बसलेले प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीतील सर्व नागरिक, बंधु आणि भगिनींनो. आजची मा. महासभा विविध विषयांवर सुरू होत आहे. तसेच, मिरा-भाईंदर शहरातही गणरायाचे आगमन होउन पुर्ण शहरामध्ये एक उत्साहाचे वातावरण दिसून येते. त्या निमित्त सर्व गणेश बांधवांना हार्दिक शुभेच्छा व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात आपण सर्वांनी पार पाडावी अशी मी इच्छा व्यक्त करते. एवढे बोलून मी माझे शब्द संपवते. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र!

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मागील सभेच्याप्रमाणे प्रश्न क्रमांक ५२ ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांच्या प्रश्नोत्तरापासून सभेला सुरूवात होत आहे. ११.४५ मिनिटे झाली आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. अध्यक्ष महाशय, हा विषय दि. २२/०९/२००३ म्हणजे आजपासून तीन वर्षापूर्वी हा प्रश्न मी उपस्थित केला होता. तीन वर्षानंतर हा विषय पुन्हा आज मा. महासभेसमोर चर्चेला आलेला आहे. हा विषय दि. २६/०६/२००६ च्या सभेमध्ये उपस्थित केला होता. त्यावेळी अपुरी माहितीमुळे, संपूर्ण माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी आणि पुढच्या मा. महासभेत हा प्रश्न घ्यावा. असे आपल्याकडून आदेश झाले. त्यानंतर दि. ०८/०७/२००६ रोजीची मिटींग स्थायी समितीच्या निवडणुकीमुळे सभा पुढे ढकलली आणि आज पुन्हा ही मिटींग ह्या सभागृहामध्ये होत आहे. या मधल्या काळामध्ये अनेक पत्रे या संदर्भाची माहिती मागण्यासाठी मी, अधिकारी वर्गाला तसेच आयुक्त साहेबांना दिले होते. पण मला अजुनही पूर्ण माहिती मिळत नाही. नगररचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग आणि विधी सल्लागार हे तिन्ही डिपार्टमेंट एक दुसऱ्यावर हा प्रश्न आपसामध्ये ढकलत आहे. अतिक्रमण डिपार्टमेंटला विचारल्यानंतर हा प्रश्न विधी सल्लागांराशी संबंधित आहे आणि विधी सल्लागारांना विचारल्यानंतर सांगितले की, हा प्रश्न नगररचना विभागाशी संबंधित आहे. अशी विधाने करून मला उत्तर दिली जात आहेत. तरी सर्वप्रथम मा. महापौर मॅडम, अध्यक्ष महाशय आपल्याला विनंती आहे की, संबंधित तिन्ही खात्याचे अधिकारी इथे उपस्थित असेल तर मी माझ्या प्रश्नाला सुरूवात करतो. अन्यथा वेळ ही जाणार आहे आणि ह्या प्रश्नाचे उत्तर ही समाधानकारक मिळणार नाही आणि हा विषय जो विषयपटलावर आलेला आहे. तो ह्या शहराच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. नागरिकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. महापालिकेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की, विधी सल्लागार, अतिक्रमण विभाग आणि नगररचना विभाग ह्या तिन्ही खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना या व्यासपीठावर बोलावून आपण मला उत्तर दिले तर ह्या प्रश्नाची लवकरच वाचा फुटेल आणि चर्चा होईल. अशी आपणांस विनंती आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, आपले कोणतेही अधिकारी दिसत नाही. उपायुक्त दिसत नाही. त्यांना कल्पना आहे का की, आज महासभा आहे?

**याकूब कुरेशी :-**

मागच्या वेळी त्यांचा प्रश्न होता आणि त्या प्रश्नाला उत्तर देण्याकरिता अधिकारी नाही. मग ह्या सभेला अधिकारी हजर राहायला पाहिजे होते. त्यांना उशिर का होतो?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांची परवानगी असेल तर मी ह्या विषयावर बोलू इच्छिते की, कारण आपण ह्यांच्या प्रश्नाबरोबर लिस्ट दिलेली आहे की, कुठले आरक्षण आहे आणि कुठे अतिक्रमण आहे? आपण ती लिस्ट बघितली तर, त्याच्यावर इंडस्ट्रील, गाळे, ब्लॉक, कंपनी, ओपन प्लॉट, झोपड्या, इंडस्ट्रीज गाळे, झंकार कंपनी, झोपडपट्टी-झोपडपट्टी, ओपन प्लॉट हे एवढे सर्व अतिक्रमण दाखवले आहे. ह्याच्यावरुन स्पष्ट दिसून येते की, आपले जेवढे आरक्षण आहे त्याच्यावर जास्तीत जास्त अतिक्रमण झालेले आहे. कुठे रहिवाशी आहे, कुठे इंडस्ट्रीज गाळे आहेत, कुठे झोपड्या आहेत, तर मला असे वाटते की, शहरात नेमके अतिक्रमण विभाग काय करते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, म्हणून अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना येउ द्या. तरच विषयाला पुढे चालना मिळेल अशी माझी आपल्याला विनंती आहे. ज्या गोष्टीचे त्यांना उत्तर द्यायचे आहे ते अधिकारी सभागृहामध्ये नाही. हा महत्त्वाचा विषय आहे आणि आता सभागृहाच्या खाली होते असे बोलतात आणि जेव्हा त्यांचा विषय आहे. दोन

मा. महासभेमध्ये हा विषय आपण पुढे पुढे घेतला. अजूनही त्यांना पुढे घ्यायचे असेल तर त्याला माझी काही हरकत नाही. साहेब, हा ज्वलंत विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्याची पुर्ण माहिती आपल्याला दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माहिती पूर्ण दिलेली नाही. म्हणून मी सांगतो जर सभागृहात अधिकारी असतील तर मी त्यांना बोललो, त्यांना माहिती देताना संबंधित विषयावर सर्व ढकलाढकली केलेली आहे आणि त्या संबंधित विभागाने मला पुन्हा पत्र दिलेले आहे की, आमची काही जबाबदारी नाही म्हणून समोरासमोर आले तर कोण जबाबदार आहे? ह्या विषयावर कोण जबाबदार ते तरी आपल्याला माहिती पडेल.

**मा. आयुक्त :-**

आपण जे पत्र दिलेले आहे. त्या पत्रामध्ये जे नमुद केलेले आहे त्याच्याप्रमाणे आपण चर्चा करू या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझा विषय अतिक्रमणाचा आहे. अतिक्रमण अधिकारी सभागृहामध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. एकतर आपल्याला माहिती आहे त्यांनी दिड महिन्यापर्यंत लिस्ट दिलेली नाही. आपल्याकडून आग्रहाने ती लिस्ट घेतली. मला माहितीच्या अधिकारामध्ये शेवटी पत्र द्यावे लागले.

**मा. आयुक्त :-**

आपण पत्रामध्ये जे नमुद केलेली माहिती आहे. ती माहिती आपल्याला पुर्ण मिळाली आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, अजून पुर्ण माहिती मिळालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला कुठली माहिती मिळालेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर्व टोटल विषयामध्ये त्यांनी संबंधित डिपार्टमेंटवर ढकलाढकली केलेली आहे आणि संबंधित विभागाने त्यांच्यावर ढकलाढकली केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आपला जो प्रश्न आहे तो मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत एकूण ३७६ आरक्षणे असून त्यापैकी शासकीय जागेवर २७ आरक्षणे वगळून अन्य खाजगी ३४९ आरक्षण जागा रिकामी आहेत का? किती जागेवर अतिक्रमण झालेले आहे? व किती आरक्षणे महापालिकेने ताब्यात घेण्यासाठी भूसंपादन खाजगी वाटाघाटीने विकास हक्क घेउन जागा संपादित केलेली आहे? हा अशा प्रकारचा आपला प्रश्न आहे. त्याला आपण असे उत्तर दिलेले आहे की, मंजूर विकास योजनेत एकूण ३८६ आरक्षणे आहेत. मनपाने विकसित केलेली आरक्षणे....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अपुरी माहिती दिलेली आहे म्हणून तर मी सांगत आहे ना. आता ही जी माहिती दिलेली आहे ती ही अपूरी माहिती दिलेली आहे. आता त्यांनी मला ज्यादिवशी ही यादी दिली त्यामध्ये माझा जो दुसरा प्रश्न आहे की, किती लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यांनी संबंधित विधी सल्लागारांशी संपर्क साधून त्यांच्याकडून उत्तर घ्या. विधी सल्लागारांना मी पत्र दिल्यानंतर विधी सल्लागारांनी सांगितले की, हा माझा अधिकार नाही. हा क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा अतिक्रमणचा विषय आहे. त्यांनी मला उत्तर दिलेले आहे. म्हणून शेवटी, मी हा प्रश्न कोणाला विचारु?

**मा. आयुक्त :-**

आपण हा जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या संदर्भामध्ये जे काही नमुद केलेले आहे. त्याचा आपण जो दुसरा उपप्रश्न विचारलेला आहे त्याची माहिती पुढे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, नाही आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्याची माहिती 'ब' मध्ये आहे आणि 'ब' चा आपला प्रश्न असा आहे की, महापालिकेच्या आरक्षित जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण बांधकामे....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, या विषयावर जर आपण उत्तर देत असाल तर मी विषयाला सुरूवात करतो.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. उत्तर देतो. जर समजा, अधिकारी कोर्टाच्या कामाकरिता हायकोर्टामध्ये गेले असतील....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा महत्त्वाचा विषय असला व कोर्टाचा महत्त्वाचा विषय असला तरी आपण तारीख घेऊ शकतो. असे या जगामध्ये नाही की, आपण तारीख घेऊ शकत नाही. पण जाणूनबुजून या विषयाला टाळाटाळ

करण्यासाठी ते गेलेले आहेत आणि मी आपल्याला प्रत्यक्ष फाईल दाखवतो. मी सर्व संबंधित खात्याशी संपर्क करुनही तुम्हाला सांगतो की, अतिक्रमण अधिकारी ह्या सभागृहामध्ये असणे आवश्यक आहे अशी मी तुम्हाला विनंती करतो. ज्या महत्त्वाच्या विषयावर ही चर्चा आहे. तीन वर्षापूर्वी हा विषय आला आणि तीन महिन्यापूर्वी हा विषय आला. त्यांना वेळ मिळाली. त्यांना तीन महिन्याची वेळ मिळाली आज ही जरी ते टाळाटाळी करत असाल तर अतिक्रमण अधिकारी हे ह्या महापालिकेचा, ह्या सभागृहाचा अपमान करित आहे असे आमचे ठाम मत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे येथे दिलेली आहेत. तरीसुद्धा ह्याच्या व्यतिरिक्त जे प्रश्न आहेत त्यांची उत्तरे स्वतः आयुक्त साहेब देतील आणि आयुक्तांकडे सगळी खाती असतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, मी बोलतो ना, आयुक्त साहेब उत्तर देऊ शकणार नाही. हे तुम्हाला मी सांगतोय, तुम्हाला अतिक्रमण अधिकाऱ्याला बोलवायला लागेल. कारण अतिक्रमण अधिकाऱ्यांनी जे पत्र दिले त्यांनी ते विधी सल्लागारावर ढकलले आहे आणि विधी सल्लागारांने पुन्हा अतिक्रमण विभागावर ढकललेले आहे. माझ्याकडे विधी सल्लागारांचे पत्र आहे. बाकींच्या प्रश्नांची आपण येथून उत्तर द्या तेथून उत्तर घ्या. त्याच डिपार्टमेंटकडून उत्तर घ्या असे त्यांनी उत्तर दिलेले आहे मी कुठे नाही बोलतो. साहेब, जे अतिक्रमण अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले आहे. तुम्ही विधी सल्लागारांशी संपर्क करा. त्यांनी काय उत्तर दिले आहे. मग त्यांनी मला काय उत्तर दिलेले आहे हे आपण डिपार्टमेंटली विचारा. म्हणजे जे उत्तर दिले पाहिजे ते अतिक्रमण अधिकाऱ्यांनीच उत्तर दिले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या प्रश्नातला जो पहिला मुद्दा आहे. मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत एकूण ३७६ आरक्षणे आहेत ह्या प्रश्नाच्या उत्तराने आपले समाधान झाले का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समाधान झाले नाही. अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की.....

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो प्रश्न विचारलेला आहे. तर त्याला जे काही उत्तर दिलेले आहे. ते उत्तर सुद्धा समोर ठेवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या प्रश्नाच्या उत्तराने माझे समाधान होत नाही. मला तुम्हाला असे विचारायचे आहे की, ३८६ आरक्षणापैकी ३४ ची यादी दिलेली आहे. सभागृहात अतिक्रमण अधिकाऱ्यांचे मत आहे की, फक्त ३४ आरक्षणावर अतिक्रमण झालेले आहे. बाकीच्या जागेवर आरक्षण झालेले नाही. बाकीची आरक्षणे सुरक्षित आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या अनुषंगाने आपल्याला माहिती दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी नेमका प्रश्न विचारतो की, हा २००३ चा प्रश्न आहे. म्हणजे ही यादी देताना २००३ च्या पूर्वीची दिलेली आहे की, आत्ताची दिलेली आहे. उपप्रश्न म्हणून विचारतो ना. म्हणून सांगतो तुम्ही उत्तर देऊ शकणार नाही आणि त्यानंतर पुन्हा दोनदा-तीनदा मी तुमच्याकडे आलो आणि अतिक्रमण अधिकारी ह्यांच्याकडे ही गेलो. असे नाही की, मी सभागृहामध्ये उत्तर मागतो. मी संबंधित खात्याला पत्र दिलेले आहे. माहितीच्या अधिकाऱ्यांमध्ये पत्र दिलेले आहे. सभागृहात मला माहिती देणार नाही म्हणून मला माहितीच्या अधिकाराचा वापर करावा लागला. त्यामध्ये त्यांनी पूर्ण उत्तर दिलेले नाही. संबंधित खात्याकडून उत्तर घ्या असे प्रत्येकवेळी उत्तर दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

या आरक्षणाच्या संदर्भामध्ये आपण माहिती मागितलेली आहे ती माहिती, आपण जो प्रश्न विचारलेला आहे की, मागच्या तीन वर्षापूर्वी हा जो प्रश्न विचारलेला होता तर हे तीन वर्षापूर्वीची स्थिती नसून मी सद्यस्थिती दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आपले असे म्हणणे आहे की, ३८६ पैकी आज फक्त ३४ आरक्षणवर अतिक्रमण झालेली आहेत असे आपले म्हणणे आहे का?

**मा. आयुक्त :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि जर मी आपल्याला आणखीन अतिक्रमणे दाखवली तर? मी अतिक्रमण अधिकाऱ्यांना आणखीन तीन रिझर्व्हेशन आज दाखवलेली आहेत. काम चालू आहे. त्यांनी त्याची पाहणी केली आहे का? ते विचारा.

**मा. आयुक्त :-**

आपण जे म्हणता की, ही जी ३४ आरक्षणे आहेत त्याची माहिती प्रशासनाने आपल्यासमोर ठेवलेली आहे. ह्याच्या व्यतिरिक्त त्या ठिकाणी बांधकाम सुरु असतील त्या संदर्भामध्ये आपण माहिती दिली तरी आम्ही घेऊ

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी कशाला माहिती देऊ माहिती देण्याचा अधिकार आमचा नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण जरी माहिती दिली नाही......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून सांगितले आपण अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्याला बोलवा. आपण परत माझ्यावर ढकलू नका. माझ्याकडून उत्तर अपेक्षित करु नका. मी सभागृहाकडे उत्तर मागत आहे.

**मा. आयुक्त :-**

३४ आरक्षणाच्या बाबतीमध्ये जी आपल्याला माहिती दिलेली आहे. आपण जे सर्व्हेअरची नेमणूक केलेली आहे......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ही जी आरक्षणाची यादी दिलेली आहे. मी नगररचना विभागाला २००५ साली पत्र दिलेले होते, ह्या प्रश्नाच्या नंतर. तेव्हा नगररचनाने मला सांगितले की, अतिक्रमणचे संरक्षण करणे हे अतिक्रमण अधिकाऱ्यांचे काम आहे आणि त्यावेळी त्यांनी यादी दिली नाही आणि आता मला अतिक्रमण अधिकाऱ्यांनी यादी दिल्यावर त्याच्यावर सह्या मारलेल्या आहेत. नगररचना विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने, त्यांनी काहीही केलेले नाही. अतिक्रमण अधिकाऱ्यांनी काहीही केलेले नाही. त्यांनी स्वतःने उत्तर दिले आहे की, आमचा अधिकार आहे, अतिक्रमण बघण्याचे, अतिक्रमण पाडायचे. मग ते कुठलेही अतिक्रमण असो. मी बाकीचे जे खाजगी बांधकाम चालू आहे त्याच्याबद्दल बोलतच नाही. जे कोर्टात पिटीशन आहे. जे नागरिकांच्या हक्कासाठी आरक्षण ठेवलेले आहे, जे गार्डनसाठी आरक्षण ठेवले आहे, लायब्ररीसाठी आरक्षण ठेवलेले आहे, समाजमंदिरासाठी आरक्षण ठेवलेले आहे त्या आरक्षणाबद्दल मी बोलत आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण प्रश्नामध्ये जे काही नमुद केलेले असेल त्याप्रमाणे उत्तर प्रशासनाने ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग मी उपप्रश्न विचारतो ना. म्हणून सांगतो उपप्रश्न विचारला ना त्याचे उत्तर येऊ द्या आणि दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर विधी सल्लागार, ह्यांना विचारा ना. ते आपल्या मागेच बसले आहेत ना. जेव्हा मला अतिक्रमण अधिकारी ह्यांनी सांगितले की, ह्या प्रश्नाचे उत्तर विधी सल्लागार देणार. विधी सल्लगारांना मी भेटलो, त्यांना पत्र दिले. त्यांचे उत्तर आलेले आहे. त्यांनी पुन्हा सांगितले की, ही माझी बाब नाही, ही अतिक्रमण अधिकाऱ्यांची बाब आहे. माझ्याकडे त्याचे उत्तर आहे ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण विचारलेले प्रश्न आणि त्याचे दिलेले उत्तर, ह्या उत्तराने आपले समाधान झालेले नाही का? आपण थोडक्यात सांगा की, आपल्याला काय अपेक्षित आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अपेक्षित लिहिलेले आहे. मी जी वस्तु लिहिलेली आहे ह्याच्यातली काहीही मिळालेली ना. म्हणून अतिक्रमण अधिकारी जर समोर असाल तर त्यांना मी विचारतो ना.

**मा. महापौर :-**

सन २००३ साली विचारलेला जो प्रश्न आहे त्याच्यात पूर्णपणे उत्तर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, दि. ०९/०६/२००५ साली मी पत्र दिले होते. या पत्राच्या नंतर हे २००३ रोजीचे पत्र आहे. २००५ मध्येही पत्र दिलेले आहे. त्यामध्ये अतिक्रमण अधिकारी हेच त्याला जबाबदार आहेत. हेच तुम्हाला यादी देणार असे त्यांनी सांगितले. त्यांनतर अतिक्रमण अधिकाऱ्यांनी आता तीन दिवसांपूर्वी १ तारखेला मला यादी दिली. त्यामध्ये त्यांनी पुन्हा बाकीची बाब जी काही बाब असेल ती बाब विधी सल्लागारांशी निगडीत आहे. विधी सल्लागारांना मी पत्र दिल्यानंतर, विधी सल्लागाराने सांगितले की, ही बाब क्षेत्रीय अधिकारी आणि अतिक्रमण विभागाशी संबंधित आहे. असे उत्तर दिलेले आहे. आपण अख्खी फाईल त्यांच्याकडून मागवून घ्या की, काय काय मला उत्तर दिलेले आहे? माझ्याकडून काय काय प्रश्न आलेले आहे? तुम्हाला त्याच्यातुन माहिती पडणार आहे.

**मा. महापौर :-**

आता ह्यावेळेस विधी सल्लागार येथे उपस्थित आहेत. आपण जे प्रश्न आहेत विधी सल्लागारांना त्याबद्दल आपण.........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी आम्हाला उत्तर दिलेले आहे की, हे माझ्या अधिकारात नाही. मग त्यांना आम्ही काय विचारणार? त्यांनी मला उत्तर दिलेले आहे त्यांना मी काय विचारु? म्हणून त्यांच्यासमोर, अतिक्रमण अधिकारी त्यांच्यावर आक्षेप ठेवतोय. तर समोरासमोर माहिती पडेल की, तुम्ही विधी सल्लागारांना कसे काय सांगितले.

**मा. महापौर :-**

आपले आता कोणकाणते उर्वरित शिल्लक प्रश्न आहेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर नाही आणि पुढचा प्रश्न मी कुठे विचारु? पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही तर दुसरा प्रश्न विचारण्याचा प्रश्न येतच नाही.

**मा. महापौर :-**

स्वतः आयुक्त साहेब आपल्याला ह्या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी बोललो ना, ३८६ पैकी ३४ ची यादी दिलेली आहे. आयुक्त साहेबांचे असे म्हणणे आहे की, ३४ वर आरक्षण झाली आहेत हे ठामपणे सांगतात का? नाही सांगू शकत. कारण माझ्या जवळ अजून आरक्षण आहेत. भाईंदर महाराष्ट्र टाईम्समध्ये, ठाण्याचा आवाजमध्ये आता नवीन आरक्षणामध्ये अतिक्रमण चालू आहे अशी नोंद आलेली आहे. एका आठवड्यापूर्वी ठाण्याचा आवाज, महाराष्ट्र टाईम्स त्याच्यामध्ये नोंद आलेली आहे. आपल्या सभागृहाच्या नेत्यांनी एक जबाबदार सभापतींनी आरोप केलेला आहे की, आरक्षणाच्या जागेवर अतिक्रमण होत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, नगररचना विभागाने अतिक्रमण विभागाला आरक्षित जागेची यादी दिलेली आहे का हे त्यांना पहिल्यांदा विचारा. नगररचना विभागाचे अधिकारी बसले आहेत ना, त्यांना विचारा. अतिक्रमण विभागाला आरक्षित जागेची यादी दिलेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

यादी दिलेली आहे. एकूण आरक्षणांपैकी ३४ आरक्षणांवर अतिक्रमण झालेली आहे. त्या ३४ ची यादी दिलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आमचे सदस्य म्हणतात की, ३४ च्या ऐवजी तीन-चार आरक्षणांमध्ये अतिक्रमण झालेले आहे. त्याचे उत्तर कोण देणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तीन-चार नाही, अजून पंचवीस मिळतील आणि आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

त्याचा जबाब कोण देणार?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, आता जे म्हणतात की, ह्या ३४ आरक्षणाच्या व्यतिरिक्त काही आरक्षणावर सध्या बांधकाम चालू आहेत त्याबाबतीमध्ये लगेच आज दुपारपासून सर्व्हेचे काम चालू करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यादी द्या ना. अन्यथा अजून एक महिन्यानंतर ह्या विषयाचे उत्तर द्या. अजून एक महिना जाऊ दे, ह्या विषयाला. मी कुठे आग्रह करतो आणि ह्या जबाबदार प्रश्नाला उत्तर देण्यासाठी अतिक्रमण अधिकारी सभागृहामध्ये नाही. साहेब, कोर्टामध्ये तारीख घेता येते. असे कुठले कोर्ट नाही ज्यामध्ये आपण रिक्वेस्ट केल्यानंतर आपल्याला तारीख मिळत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, हा तिसऱ्यांदा प्रश्न आलेला आहे. तीन मा. महासभा झाल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपल्याला माहिती आहे की, ह्या प्रश्नासाठी मी फेऱ्या मारल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये माझ्याकडे जेव्हा तक्रार आली. जेव्हा आपण मला सांगितले तेव्हा मी आपल्या समक्ष बोलावले आणि समक्ष संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्यांना समक्ष ताकीद दिली की, ह्यांना ताबडतोब माहिती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तरी त्यांनी टाळाटाळ केली आहे. आपण बोलल्यानंतर ही, जेव्हा सभागृहाच्या एका सन्मा. नगरसेवकांना आपण माहिती देत नाही. जेव्हा त्यांचा प्रश्न उपस्थित आहे. प्रश्न तीन वर्षापुर्वीचा आहे. प्रश्न तीन महिन्याच्या आधीचा आहे. तरी तो अधिकारी आज सभागृहामध्ये येत नाही आणि कोर्टाची फक्त बाजु दाखवतो कोर्ट हे कितीही मोठे कोर्ट असले आणि त्यांना विनंती पत्र पाठवल्यानंतर तारीख मिळते, असे नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जर माहिती पूर्ण नसेल तर पुढच्या सभेमध्ये विषय घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी विचारलेला अतिक्रमणाचा प्रश्न आणि प्रशासनाकडून मिळालेली माहिती, अनेक आरक्षणापैकी ३४ आरक्षणावर अतिक्रमण झालेले आहे. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांचे म्हणणे आहे की, ह्याच्यापेक्षा ही अधिक ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, मी सांगत नाही. अशी अनेक वर्तमानपत्रामध्ये त्याची नोंद आलेली आहे. मी तुम्हाला त्या वतर्मानपत्रामध्ये नांव सांगितलेली आहे. ठाणे की आवाज, महाराष्ट्र टाईम्स, ह्या सभागृहातील एक जबाबदार सभापतींनी आक्षेप घेतला. ती न्युज महाराष्ट्र टाईम्समध्ये आलेली आहे. मी सांगत नाही. माझ्याकडे नोंद आहे ती मी सांगणारच आहे पण अतिक्रमण अधिकाऱ्यांनी ही माहिती पहिल्यांदा दिली पाहिजे.

**मा. महापौर :-**

शहरातील आरक्षणाच्या जागेवर ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण होत आहेत ताबडतोब त्याची माहिती मागवून त्या ठिकाणी अतिक्रमण वाढू नये म्हणून ते अतिक्रमण थांबविण्यात यावे, असे मी प्रशासनाला निर्देश देत आहे. तसेच, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांचा जो प्रश्न आहे तो आत्ता पुरता स्थगित केला जाईल आणि पुढील मा. महासभेमध्ये पुढील प्रश्नापासून सुरुवात केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी विनंती आहे की, आतापासून अतिक्रमण अधिकाऱ्याला आपण ताकीद द्या. या सभागृहाचा वेळ घेउ नका आणि जेवढा हा विषय लांबला जाणार आहे. मॅडम, मला ही धोका निर्माण होणार आहे, हे देखील मी तुम्हाला सांगत आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की, या प्रश्नाला जेवढ्या लवकर वाचा फोडता येईल तेवढ्या लवकर वाचा फोडावी.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ५३, श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर ह्यांचा प्रश्न आहे. हे सदस्य गैरहजर आहेत.

**मा. महापौर :-**

पुढील प्रश्न घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ५४, श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. सचिवजी सभागृहाच्या पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांची लक्षवेधी सुचना आलेली आहे. सदरची लक्षवेधी सुचना मी मा. महापौर मॅडमकडे सादर केलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

लक्षवेधी काय आहे ते सभागृहाला कळू द्या. वाचून दाखवा.

**याकूब कुरेशी :-**

महापौर मॅडम, आपण ही लक्षवेधी घेत आहात का?

**मा. महापौर :-**

होय.

(नगरसचिवांनी मा. महापौर सो. ह्यांच्या परवानगीने लक्षवेधी सुचनेचे सभागृहासमोर वाचन केले.)

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.):-**

या वर्षामध्ये आपण २३०० व्हाईल्स खरेदी केलेल्या आहेत. आपण ३२५ या दराने हे व्हाईल्स खरेदी केलेले आहे आणि जे गरजू आहेत त्यांना आपण ५० रू. या कन्सेशन रेटमध्ये इंजेक्शन देतो. आजपर्यंत १९२३ इतके व्हाईल्स संपलेले आहेत आणि जे गरजू आहेत त्यांना देतो. आपण ह्याचे सर्व रेकॉर्डस ठेवलेले आहे. परंतु, काही काही ठिकाणी ॲड्रेसेस हे पूर्ण ठेवले गेले नसल्याचे आढळल्याने आपण सर्व मेडीकल ऑफीसर्स आणि संबंधित स्टाफ आहे त्यांना इन्स्ट्रक्शन दिलेले आहे आणि त्याप्रमाणे पुर्ण त्याचे ॲड्रेसेस ठेवण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या लक्षवेधीमध्ये माझा हाच आक्षेप होता की, महापालिका जेव्हा कुठल्याही गोष्टीला दोनशे टक्के सबसिडी देते म्हणजे ३२५ चे इंजेक्शन ५० रुपयात देण्यात येते. अडीचशे रुपये सबसिडी नागरिकांना मिळते. अशा गोष्टीची नोंद महापालिकेत होणे गरजेचे आहे. कारण त्याच्यावरुन असा संशय निर्माण होतो की, ५० रुपये घेऊन बाकीची नावे खोटी लिहीली आहेत, असे सिद्ध झालेले आहे. सहा. आयुक्त ह्यांनी मला दि. १९/०४/२००६ रोजी पत्र दिलेले आहे. म्हणजे दोन दिवसापूर्वी पत्र दिलेले आहे की, ह्यानंतर ज्या ज्या लोकांना कुत्रे चावणार त्यांना इंजेक्शन देण्याच्या वेळी त्यांच्याकडून संपूर्ण यादीची नोंद

घेतली जाईल असे मला उत्तर दिलेले आहे. माझा जो आक्षेप होता त्याच्यावर प्रशासनाने लक्ष दिलेले आहे. ह्या पुढे कुठलेही इंजेक्शन म्हणजे रेबीज नाही अन्य आपले जे इंजेक्शन या खात्यामध्ये आहे. टी.टी. आहे. दुसरे, लहान मुलांना आपण चेचक रोगावर जे इंजेक्शन लावतो ह्या सर्व इंजेक्शनची नोंद प्रत्येक केंद्रामध्ये व्यवस्थित ठेवली पाहिजे. ज्याच्यावरून कोणीही आपल्यावर कुठलाही आक्षेप घेतला नाही पाहिजे. तर प्रशासनाने हे मान्य केलेले आहे की, इंजेक्शनची नोंद व्यवस्थित ठेवलेली नाही. पण इंजेक्शन गेलेले आहेत. आयुक्त साहेब आपण जे पत्र दिलेले आहे ते सभागृहात वाचून दाखवा आणि मग मी माझा विषय संपवतो. आपण मला जे उत्तर दिलेले आहे ते वाचून दाखवा. नंतर मी हा विषय संपवतो.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.):-**

आपण सन्मा. नगरसेवकांना जे पत्र दिलेले आहे. ते दि. १९/०८/२००६ रोजीचे हे पत्र आहे.

(सदर पत्राचे सभागृहासमोर वाचन करण्यांत आले.)

**जयंत पाटील :-**

प्रश्न असा आहे की, १२२५ जणांना कुत्रे चावले का आणि त्यातले किती दगावले?

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.):-**

कोणीही दगावलेले नाही. परंतु जे....

**जयंत पाटील :-**

चार दिवसांपूर्वी स्थायी समिती सभा झाली. तर जे कुत्र्यांचे निर्बिजीकरण केलेले आहे. त्यामुळे या शहरामध्ये कुत्र्यांची वाढ बरीचशी कमी झालेली आहे, असे श्री. पाणपट्टे साहेबांनी सांगितले आणि एवढे कुत्रे चावले असा कुठेही उल्लेख नाही. असे परवा झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये त्यांनी सांगितले. मग हा काय प्रकार आहे? नक्की एवढे कुत्रे चावले की, नुसतेच कुत्रे चावल्याचे नाटक केलेले आहे.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.):-**

निर्मिती हा प्रश्न वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

त्याचा अर्थ मला कळतो. कुत्र्यांची भरपूर वाढ झालेली आहे आणि स्थायी समितीमध्ये विषय निघाला की, एकाच दिवशी चार जणांना कुत्रे चावले. तर लोकांना हे एवढे कुत्रे चावलेले आहेत का? ह्याची आपल्याकडे पत्त्यासह नोंद आहे का?

**मा. आयुक्त :-**

ज्या फॅक्ट्स आहेत त्याच फक्त रेकॉर्डवर आलेल्या आहेत. सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे आणि प्रशासनाने त्यांना उत्तर दिलेले आहे की, प्रशासनाच्या लिखाणामध्ये ज्या काही त्रुटी राहिलेल्या आहेत त्या त्रुटींच्या बाबतीमध्ये त्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. या त्रुटी झालेल्या आहेत आणि त्याची पुर्तता त्यांनी करावी. परंतु, जे....

**जयंत पाटील :-**

त्यांचे नाव आहे. परंतु, पत्ते आहेत का?

**मा. आयुक्त :-**

नाव आहेत. पण एखाद्या ठिकाणी पत्ता नसेल व एखाद्या ठिकाणी रस्त्याचे नाव नसेल, एखाद्या वेळेला....

**जयंत पाटील :-**

साहेब, कशाचेच नाव नाही. फक्त गल्ली, रोड-नवघर रोड, भाईंदर रोड....

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, सगळ्याच बाबतीत तसे झालेले आहे अशातला भाग नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, मी ती लिस्ट पाहिली आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही, तसे झालेले नाही.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, एका बाजूला आपण कुत्र्यांचे लसीकरण चालू करतो आणि बाजूला कुत्रे पैदा करण्याचे लसीकरण केले की, काय हे समजत नाही. काल, ९० फिटला आमच्या येथे जवळ १०-१२ पिल्लं मी स्वतः उचलली सुपामध्ये ठेवली आणि ओव्हर ब्रिजच्या येथे जाऊन ठेवली. म्हणजे हा काय प्रकार चालला आहे? म्हणजे हे चांगले काम केले असे आपल्याला वाटते. गितानगरपासून ते ९० फिटपर्यंत जाऊन बघा की, कुत्र्यांची पिल्लं किती आहेत?

**जयंत पाटील :-**

या शहरामध्ये कुत्र्यांची प्रचंड वाढ होत आहे.

**शुभांगी नाईक :-**

कुत्र्यांची वाढ प्रचंड होत आहे.

**जयंत पाटील :-**

आम्हाला माहिती आहे की, कुत्र्यांना मारणे हा गुन्हा आहे आणि सन्मा. मेनका गांधीने तो कायदा काढलेला आहे. परंतु, आपल्या माहितीसाठी सांगतो आणि आपणही ते वाचले असेल, चायनासारख्या देशामध्ये पाच दिवसामध्ये पन्नास हजार कुत्रे मारले गेले. कुत्रे माणसांना चावले तर काही होत नाही माणूस कुत्र्याला चावला असेल तर अशी जी म्हण आहे. म्हणजे कुत्रे माणसांना चावले की, त्याचा कुठल्याही तऱ्हेने विचार होत नाही. हे एवढे कुत्रे शहरामध्ये आहे आणि त्यांचे लसीकरण चालले आहे आणि त्यावर लाखो रुपये महानगरपालिका खर्च करते. परंतु, नक्की निर्जंतुकीकरण होत आहे का? की, नुसता तो देखावा चालला आहे. माझ्याकडे श्री. पानपट्टे साहेब तुम्ही या. तुम्हाला हलायला जागा मिळणार नाही एवढे कुत्रे दाखवतो.

**परशुराम पाटील :-**

माझ्या दारात किती कुत्रे आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, आतापर्यंत चार हजार आठशे दहा कुत्र्यांचे ऑपरेशन केलेले आहे. उत्तनला जुना मोकाट जनावरांचा कोडवाडा आहे, तिथे ऑपरेशन केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

आपण आम्हाला ही आकडेवारी सभेमध्ये सांगत आहात. पण तसे घडते का? हे आंम्हाला विचारायचे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ज्या कुत्र्यांचे ऑपरेशन केले त्यांच्यापासून उत्पत्ती होणार नाही ना. ऑपरेशन करायला सुरुवात केली नसती तर आतापर्यंत किती उत्पत्ती झाली असती?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पानपट्टे साहेब, ह्याचा अर्थ इंजेक्शन मागवण्याचा आदेश ह्याच्या अगोदर झालेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजून एका वर्षामध्ये आणखीन शंभर टक्के निर्जंतुकीकरण होणार आहे. म्हणजे ही उत्पत्ती दिसणार नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

माझ्या घराच्या शेजारी कुत्र्याला पिल्ले झालेली आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जोपर्यंत शंभर टक्के निर्जंतुकीकरण होणार नाही तोपर्यंत उत्पत्ती होणार. जरी एक दोन जरी कुत्रे शिल्लक राहिले तरी उत्पत्ती होणार.

**जयंत पाटील :-**

पानपट्टे साहेब, जागा धरुन बसलेले आहेत असे मला म्हणायचे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सांगतो ना. अजून एका वर्षामध्ये शंभर टक्के निर्जंतुकीकरण होणार आणि नंतर सगळं होणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, माझे जुन्या नगरपालिकेच्या बाजूला घरं आहे. कालच एका कुत्र्यानी नऊ पिल दिली. हे मी आपल्या ला दाखवतो.

**शुभांगी नाईक:-**

आमच्या प्रभागातही असेच आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आपण कोणाला दोष द्यायचा. एकतर नोटीस वापरत नाही. खोटी बातमी देत आहे.

**मिलन पाटील:-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मागच्या वेळेला स्थायी समितीमध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता आणि मी त्यांना ठासून सांगितले होते की, त्या कुत्रीच्या गळयामध्ये पट्टा आहे. तिचे ऑपरेशन झालेले आहे. परंतु, त्या कुत्रीला पिल्ले झालेली आहेत. तसे नाही तर तुम्ही माझ्या बरोबर या. मी या अधिकाऱ्यांना बोललो होतो की, तुम्ही या मी तुम्हाला दाखवतो की, ज्या कुत्र्याच्या गळ्यामध्ये पट्टा आहे अशा कुत्र्यांना सुद्धा पिल्ले झालेली आहेत.

**जयंत पाटील :-**

ही गंभीर बाब आहे.

**मिलन पाटील:-**

मी, महापौरांना सांगितले होते की, ज्या संस्थेला हे काम दिलेले आहे.....

**शुभांगी नाईक :-**

म्हणजे ह्याचा अर्थ असा की, आपल्याकडे शस्त्रक्रिया बरोबर होत नाही.

**मिलन पाटील :-**

मॅडम, ह्या विषयावर मी त्या वेळेला ऑब्जेक्शन घेतले होते की, ह्या संस्थेला काम देउ नका. या संस्थेचे डॉक्टर किंवा लसीकरण हे बरोबर नाही. माझे ऑब्जेक्शन होते. तरीसुद्धा ह्यावेळेला त्या संस्थेलाच हे काम दिलेले आहे. फक्त डॉक्टर बदली झालेले आहेत. म्हणजे आम्ही सभासद जे बोलतो त्याचे काय आहे का नाही? आम्ही ऑब्जेक्शन घेतो तर त्या अधिकाऱ्याने त्या माणसाकडे बघायला पाहिजे का, नाही? हा किती गंभीर प्रकार आहे आणि पुन्हा त्याच संस्थेला आपण हे काम दिलेले आहे. का, इतर कुठली संस्था नाही का? मॅडम, ही गंभीर बाब आहे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या चार वर्षात मी निवडून आल्यापासून आमच्या गावात एकदाही कोणी कुत्रे पकडायला आलेले नाहीत किंवा लसीकरण करायला.

**मिलन पाटील :-**

मॅडम, ही बाब गंभीर आहे. आपण ह्याच्यावर कमिटी नेमा. दोन किंवा तीन सदस्यांची समिती नेमा आणि त्या समितीला हे काम द्या कि त्यांची चौकशी करणे आणि पहाणी करणे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, मा. महापौर मॅडम, मी पानपट्टेसाहेबांना जसजशी तक्रार दिली तसतसे आमच्या मुर्ध्यागावातील कुत्र्यांचे ऑपरेशन झालेले आहेत. मी त्या गोष्टीचा पाठपुरावा केलेला आहे आणि ते काम झालेले आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. सन्मा. सदस्यांनी कुत्र्यांच्या बद्दल आणि रेबिज इंजेक्शनबद्दल जो प्रश्न उपस्थित केला तो प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. मी औषध आणि इंजेक्शनच्या बाबतीत बोलणार नाही. परंतु, सन्मा. सदस्या नयना म्हात्रे बोलल्या, एका सभासदाला कुत्र्यांच्या स्टेरेलायझेशनच्या संदर्भात महापालिकेचे काम चांगले दिसले तर चांगले दिसले असे बोलायला काय हरकत नाही. मी त्याचा साक्षीदार आहे. मी हे मुद्दामहून सभागृहाच्या लक्षात आणून देउ इच्छितो, मा. महापौर मॅडम, आपल्या माध्यमंतून की हा जो स्टेरेलायझेशनचा प्रकल्प आहे. हा आमच्या सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा उत्तनला आहे. आता शहरातले सगळं वाईट उत्तनकडे होत आहे तर त्याच्यातलाच तो एक भाग आहे. परंतु, हा जो स्टेरेलायझेशनचा त्या ठिकाणचा कार्यक्रम आहे तो अत्यंत चांगला आहे. त्या ठिकाणी जो दवाखाना आहे आणि कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात येते त्या ठिकाणी मी आठवड्यातून, दोन आठवड्यातून मुद्दामून विझीट देतो. तिथे प्रत्यक्ष ऑपरेशनची प्रक्रिया चालू आसताना आंम्हाला तिथे डॉक्टरांनी हजर केलेले आहे. मा. महापौर मॅडम, त्या कुत्र्यांच्या पिंजऱ्यामध्ये ॲट अ टाईम ४०-४५ कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण केलेले असते. ती कुत्री पुन्हा शहरामध्ये योग्य त्या ठिकाणी सोडत असतील. परंतु, हे स्टेरेलायझेशनचे कार्यक्रम तिथे चांगल्या प्रकारे चाललेले आहेत. फक्त एक अडचण आंम्हाला या दिवसामध्ये दिसलेली आहे की,दोन तीन महिन्यापूर्वी त्या खात्यासाठी निधी नसल्यामुळे ते काम बंद पडलेले होते. आता ते काम पुन्हा सुरु झालेले आहे असे आम्ही समजतो आणि कुत्र्यांचा स्टेरेलायझेशनचा जो प्रोग्राम आहे तो आवश्यक आहे. आपली जर शहराची अशी अपेक्षा असेल की, जर एखाद्या महिन्यामध्ये किंवा एखाद्या वर्षामध्ये शहराचे निर्जंतुकीकरण होईल तर ते शक्य होणार नाही. आम्ही आमच्या उत्तनमध्ये बघतो की, कुत्र्यांची संख्या आणि पिल्लांची संख्या कमी झालेली आहे. धन्यवाद!

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी मांडलेली लक्षवेधी सन्मा. सभागृहामध्ये या विषयावर संबंधीत नगरसेवकांनी केलेली चर्चा, यामधून असे पहाण्यास मिळाले की, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक ह्यांनी उपस्थित केलेला प्रश्न की, नसबंदी अयशस्वी झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे आणि काही ठिकाणी कुत्रे पकडण्याची गाडी फिरत नाही. तर त्या ठिकाणचे कुत्रे पकडून त्यांच्यावर योग्य ती नसबंदी करुन पुन्हा ती कुत्री योग्य जागेवर सोडण्यात यावी. तसेच आपल्या डिपार्टमेंटमध्ये नसबंदी करणारे डॉक्टर तज्ञ आहेत का? त्यांची डिग्री काय आहे? ह्याचीही चौकशी केली जाईल. हा सर्व व्यवहार पहात असतांना सर्व नगरसेवक पुर्ण शहरातील नागरिक यांचे लक्ष प्रशासनाकडे असते. त्यामुळे सर्व व्यवहार पारदर्शक असला पाहिजे. आपल्यात अशी म्हण आहे की, मांजर जेव्हा दुध पिते तेव्हा डोळे मिटून दुध पिते. तिला वाटते की, आपल्याकडे कोणी पहात नाही, तसा प्रकार काही ठिकाणी पाहण्यास मिळतो. पण असे न करता या शहरातील साडे आठ लक्ष लोकसंख्या आपल्याकडे पहात आहे आणि त्यातच या सभागृहाचे या शहराचे प्रतिनिधीत्व करणारे नगरसेवक तज्ञ आहेत आणि ते प्रत्येक गोष्टीमध्ये माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवतात. त्यामुळे प्रत्येक विषय, मग तो कुठलाही विषय असो त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे आणि पारदर्शकता पाळण्यासाठी त्या त्या अधिकाऱ्यांनी आपल्या स्वकतृत्वाने प्रयत्न केले पाहिजे अशी त्यांनी कर्तव्याची जाण ठेवली पाहिजे. जेव्हा अधिकारी कार्यक्षम, कर्तव्यदक्ष आणि पारदर्शक असेल तेव्हाच शहराचा विकास हा चांगल्या प्रकारे होउ शकतो. आजच्या या लक्षवेधीवरुन प्रशासनाला अशी सुचना देण्यात येते की,

आपण योग्य ती कार्यवाही करुन महापौर दालनाला प्रत्यक्ष ह्याचा सर्व रिपोर्ट सादर करावा. सचिवजी पुढील विषयाला सुरूवात करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला धन्यवाद. आपण ह्या लक्षवेधीवर अधिकाऱ्यांना जी सुचना केलेली आहे आणि अन्य बाबतीमध्ये, औषधामध्ये कुठलीही गफलती होणर नाही यासाठी आपण जो आदेश दिला त्याबद्दल आणि आपण ही लक्षवेधी सुचना मांडू दिली ह्याबाबत आपल्याला धन्यवाद.

**नगरसचिव :-**

आजच्या मा. महासभेला सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज आहेत. सन्मा. श्रीम. मायरा मेंडोसा, सन्मा. श्री. आसिफ पटेल, सन्मा. श्रीम. प्रभात पाटील, सन्मा. श्री. अनंत पाटील, सन्मा. श्री. हॅरल बोर्जिस, सन्मा. श्री. चंद्रकांत वैती, सन्मा. श्री. रमेश जैन.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा प्रश्न नंतर घेण्यात यावा कारण अजून पुर्ण काम झालेले नाही. तत्पुर्वी प्रकरण क्र. ५१ वा घ्यावा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा प्रश्न नंतर का घ्यावा? कारण काय?

**मा. महापौर :-**

विषय क्र. ५० ला सुरूवात करावी.

**मिलन पाटील :-**

मॅडम, अजून विषयाची पुर्तता झालेली नाही ना.

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ५० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशूराम पाटील :-**

सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पुढील विषयाला सुरूवात करावी.

**प्रकरण क्र. ५० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम १ अन्वये दि. १८/५/२००६ रोजी ठराव क्र. २३ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांवर सदस्यांची ठरावाद्वारे नावे घोषित करणे.

**ठराव क्र. ४० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम १ अन्वये दि. १८/०५/२००६ रोजी ठराव क्र. २३ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांवर पुढीलप्रमाणे सदस्यांची नांवे घोषित करण्यांत येत आहेत.

**समितीचे नांव :- पाणी पुरवठा समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. केशव रामभाऊ घरत |
| २. | सौ. उर्मिला कोमल भामरे |
| ३. | श्री. याकूब इस्माईल कुरेशी |
| ४. | श्री. चिंतामण कमलाकर पाटील |
| ५. | सौ. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे |
| ६. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील |
| ७. | सौ. सुनिता कैलाश पाटील |
| ८. | सौ. उमा विश्वनाथ सपार |
| ९. | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी |

**समितीचे नांव :- विधी समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. आसिफ गुलाब शेख |
| २. | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील |
| ३. | श्री. मिलन गोविंद पाटील |
| ४. | सौ. अनिता जयवंत पाटील |
| ५. | श्री. अनंत रामचंद्र पाटील |
| ६. | श्री. शफीक अहमद खान |

| | |
|---|---|
| ७. | सौ. शानु गोहील |
| ८. | सौ. रिटा सुभाष शहा |
| ९. | श्री. अशोक बळवंत पाटील |

याप्रमाणे सदस्यांच्या नावाच्या यादीसह विशेष समित्या स्थापन करणेबाबत ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५१ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या विषयामध्ये बंदिस्त या विषयाची माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी. बंदिस्त म्हणजे काय? आमच्या अजून हे लक्षात आलेले नाही. भांडण्याचा प्रश्न नाही. बंदिस्त म्हणजे काय हे कळेल का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत संबंधीत विभागाने उत्तर द्यावे.

**श्री. घेवारे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, इमारत बांधत बसतांना बाल्कनी प्रस्तावित केली जाते. बाल्कनी एफ. एस. आय. अंतर्गत येत नाही. म्हणून मुंबई, ठाणे इतर महानगरपालिका आहे व हे डी. सी. रुल्स आहेत. तिथे बाल्कनी बंदिस्त करण्याची प्रोव्हिजन आहे. बंदिस्त म्हणजे क्लोज करणे. आपण ही बाल्कनी उघडी ठेवतो. त्याचा अर्थ बिनकामी तो एरिया वाढवणे. त्याला बंदिस्त म्हणतात. नगरपालिका असतांना १९९२ला ठराव झाला होता. त्यावेळेस प्रति बाल्कनी पाचशे रुपये शुल्क आपण आकारत होतो. जेवढी बाल्कनी असेल तेवढी. आता ते शुल्क वाढवून दोन हजार रुपये केले आहेत.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, येथे बंदिस्त बाल्कनी शुल्कात फेरफार करण्याचा प्रस्ताव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये आपण बारा कोटी रुपयाची एक निश्चित रक्कम ठेवलेली आहे. बारा कोटी रुपयाची एक निश्चित रक्कम ठेवलेली आहे. आणि आपण अशापद्धतीने जर ह्याच्यामध्ये कमी जास्त केले, बंदिस्तिमध्ये, तर आपल्या बजेटमध्ये फरक पडणार नाही का? किती फरक पडेल? अंदाजपत्रकामधील बजेटमध्ये किती फरक पडणार? किती तूट येईल? वाढणार की कमी होणार? ह्याचा आपण हिशोब काढला आहे का? याबाबत नगररचना विभागाने उत्तर द्यायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भामध्ये मी खुलासा करु इच्छितो की, महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये जी तरतुद केलेली आहे. ती तरतुद ही बांधकामाच्या शुल्काबद्दल केलेली आहे. बाल्कनीबद्दल केलेली नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण हे परत बघा. अंदाजपत्रक मागवून घ्या. त्याच्यामध्ये आहे. विकास आकार - बंदिस्त बाल्कनीसहीत आहे. आपण बजेटचे पुस्तक मागवून घ्या. त्याच्यात आहे. किती फरक पडणार आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, मेरी एक विनंती है की, एमरजन्सी में मिरा रोड, शांती पार्क, गोकुल व्हिलेज मे कोई मर गया है। मैं ॲम्ब्युलन्स के लिए एक देढ़ घंटेसे बोला है। तो वह बोलते है की, ड्रायव्हर नही है। थोड़े टाईम मे जाता है। लेकिन अभी तक निचेसे जाने के लिए तैयार नही। और दोनो ॲम्ब्युलन्स निचे खड़ी हुई है।

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, ही बाब गेल्या वेळेस मी आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

ड्रायव्हर नही है। ऐसा कहकर नाटक करता है। श्री. अजित पाटील साहबने फोन किया, उपायुक्त शेख साहबने फोन किया लेकिन फिर भी कुछ जवाब नही है।

**रतन पाटील :-**

साहेब, मी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर कोण देणार आहे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी ह्यांनी सभागृहामध्ये जो काही प्रश्न उपस्थित केला, त्या संदर्भामध्ये गाडीची व्यवस्था केलेली आहे आणि गाडी ऑलरेडी गेलेली आहे. बाल्कनी बंदिस्त फी अशाप्रकारे हेड आहे

आणि त्या हेडमध्ये जी तरतुद केलेली आहे ती जवळ जवळ तेरा कोटींची तरतुद ठेवलेली आहे. अपेक्षित उत्पन्न तेरा कोटी ग्राह्य धरलेले आहे.

**रतन पाटील :-**

त्या उत्पन्नामध्ये भर पडणार आहे की, तुट होणार आहे? आपण आता बाल्कनी बंदिस्त फी मध्ये फेरफार करणार आहोत त्याच्यामुळे तुट पडणार आहे की, वाढणार आहे?

**मा. आयुक्त :-**

अंदाजपत्रकामध्ये जी तरतुद केलेली आहे ती तरतुद अंदाजपत्रकीय तरतुद आहे. अंदाज केलेला आहे. एखाद्या वेळी प्रत्यक्ष तेवढी येईलही किंवा त्याच्यापेक्षा जास्तही येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, हा विषय कशासाठी आणलेला आहे? वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यायाठी?

**मा. आयुक्त :-**

काय?

**रतन पाटील :-**

आपण हा जो विषय आणलेला आहे त्याच्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे का, कमी होणार आहे. ते एकदा जाहिर करावे. कमी होणार आहे तर कमी होणार आहे. वाढणार आहे तर वाढणार आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढणार असेल तर त्यात आम्हाला आनंद आहे.

**दिलीप घेवारे :-**

जेव्हा हे बजेट झाले त्यावेळी पाचशे रुपये प्रति बाल्कनीप्रमाणे आपण बजेट प्रोव्हीजन केलेली होती . आपला जो ठराव दिनांक. ३०/६/२००६ ला झाला तो ठराव नंतर झालेला आहे. त्याच्यामध्ये आपण मिनिमम रेटप्रमाणे बाल्कनी शुक्ल आकारण्याचे प्रस्तावित केले होते. ते भाव १५ हजारा पासून २५ हजारापर्यंत व्हेरीएशन होते. त्याच्यात बऱ्याचशा लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या जसे आर्किटेक्ट, बिल्डर्स आणि हे अन्यायकारक वाढ आहे असे सांगितले. त्यांच्यामुळे आपण मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या डी.सी. रुल प्रमाणे जे दोन हजार रुपयांचे भाव आहे त्याप्रमाणे केलेले आहे. तसेच, पाचशे रुपयाचा जो भाव होता त्याच्यात चार पट वाढ होण्याची शक्यता आहे.

**रतन पाटील :-**

मला हे सांगा, हया तक्रारी कोणाच्या आहेत तर आर्कि टेक्ट आणि बिल्डरच्या. तर हया आर्कि टेक्ट आणि बिल्डरच्या जोरावर ही महानगरपालिका चालते का? असे गृहीत धरायचे का? मग ते तक्रारी करतील आणि तशापद्धतीने आपण वाढवले , आपण मा. महासभेमध्ये निर्णय ते बदलावे असे आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील हयांनी घेतलेला आक्षेप समर्थनीय आहे. म्हणजे ह्या महानगरपालिकेमध्ये बिल्डर लॉबी सांगेल तो प्रस्ताव पास होणार आहे का? असा प्रश्न आहे का? आणि बहुतेक बिल्डरचा असा प्रस्ताव मांडायला उभे राहिले होते असे त्यांनी करु नये, बदनामी होईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, भोगवाटा दाखला दिल्याशिवाय .....

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छीतो की, बाल्कनीसाठी दंडनिय विषय आहे तर बाल्कनी बंदिस्त केल्यामुळे विषय आहे की, सी.सी. किंवा ओ.सी. घेत नाही म्हणुन की, आपण बाल्कनी कव्हर केली म्हणुन दंड आकारणार आहे. मग आपण ज्यावेळीला त्यांचा नकाशा मंजुर करतो त्यावेळी त्यांच्याकडुन डेव्हलपमेंट चार्ज घेतला जातो तर तो जो चार्ज घेतो त्याच्यामध्ये त्याने बाल्कनी दाखविली म्हणुन त्या चार्जमध्ये सुट असते का? की, त्या बाल्कनीच्या जागेचा ही आपण चार्ज घेतो. मग त्याच्यासाठी दंड आकारायचा असेल तर त्याचाही चार्ज घ्यायला पाहिजे ना. कारण आता त्यांनी जागा कव्हर केली म्हणुन आपण फक्त दंड म्हणुन त्याच्याकडुन हजार रुपये किंवा दोन हजार रुपये रेट लावणार आहे. मग त्यांनी ती जागा एफ.एस.आय म्हणुन वापरलेली आहे आणि नकाशा मंजूर करताना आपण त्याच्यावर शुल्क आकारला नाही तेही आकारणे भाग आहे. त्याने अतिक्रमण करुन गॅलेरी आत घेतली बाल्कनी कव्हर केली. पहिल्यांदा सुट म्हणुन त्याने बाल्कनी आपल्याकडुन घेतली आणि डेव्हलपमेंट चार्ज आकारला नाही कारण बाल्कनी आहे. ॲक्च्युअली फक्त जो वापरतो तेवढयासाठी आपण दिले तर बाल्कनीसाठी डेव्हलपमेंट चार्ज माफ आहे. आता बाल्कनी केली तर त्याचा डेव्हलपमेंट चार्ज घ्यायला पाहिजे ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपल्या टिपणीमध्ये दिले आहे की, भोगवटा दाखला घेण्याचे प्रमाण कमी झाले म्हणून आपले महसूल उत्पन्न कमी झाले. त्याकरिता आपण बाल्कनीदाराकडून दंड आकारणी करतो. साहेब, भोगवटा दाखला घेतल्याशिवाय बिल्डींग वापरता येते का? जर तशी बिल्डींग वापरता येत नसेल तर हा दंड घेतल्याने ती बिल्डींग रेग्युलर होणार नाही का?

**दिलीप घेवारे :-**

हा भोगवटा दाखला घेते वेळेसच दंड घ्यायचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे भोगवटा दाखला देत नाही.....

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण टिपणीमध्ये असे दिले आहे की, भोगवटा दाखला देण्याचे प्रमाण कमी झाले आहे. म्हणून आपण बाल्कनी दंड आकारणी करत आहोत. म्हणजे ती बिल्डींग आता रेग्युलर आहे की....

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, भोगवटा दाखला घेण्याचे प्रमाण खुपच कमी झाले आहे. ही कोणाची चुकी? आपले प्रशासन काय करत आहे? आपण त्यांना पाणी देतो, आपण त्यांना लाईटची एन.ओ.सी. देतो ते कशाला देतो? म्हणजे आपली ह्याच्यात कमजोरी आहे. साहेब, एक बिल्डर आता आठशे रुपयाचा भाव होता तिथे आता चोवीसशे रुपये भाव घेत आहे आणि बाल्कनीचे पुरे पैसे घेतो त्यांना आपण कमी करायचे असे कसे? आपण त्यामध्ये महापालिकेचे नुकसान करता. आपण मा. महासभेमध्ये प्रस्ताव पास केलेला आहे?

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, यह ठराव लाने की क्या आवश्यकता थी? की आर्किटेक्ट लोगो ने ज्यादा प्रेशर किया या बिल्डर लोगोने ज्यादा इसतरह सुधार किया इसका क्या मतलब है? बजेटमें अगर कही भी पैसा कम हो जाता है तो पुरा प्रशासन परेशान हो जाता है की बजेट कम हो गया है। इससे बजेटपर कही फरक पड़ रहा है। प्रशासनने इस तरहका ठराव लाने की क्या आवश्यकता थी? आपने टाऊन प्लॅनिंगसे पुछा क्या? ऐसा सब्जेक्ट लाने का क्या मतलब है? वजह क्या है?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

टाऊन प्लॅनिंगच्या विभागाकडून जो खुलासा करावयाचा आहे तो आपल्या समोर सादर करतो. बंदिस्त बाल्कनी हा जो विषय आहे तो एफ. एस. आय. पेक्षा जास्तीचा आहे. जो नॉमर्ल एफ.एस.आय. होतो त्यापेक्षा आपण आपल्या व्यवहारिक भाषेमध्ये जो लोडींग म्हणतो. हा तो लोडींगचा कंन्सेप्ट आहे. समाजामध्ये साधारणतः नवी मुंबई, मुंबई, आपल्या सर्व एम.आर.टी.पी.मध्ये जे एफ. एस.आय.च्या बाहेर बाल्कनी येतात म्हणजे आपण ते एफ.एस.आय.मध्ये घेत नाही त्यासाठी पंधरा टक्के, दहा टक्के असे आपण बाल्कनी बंदिस्त कंन्सेप्ट एम.आर.टी.पी.मध्ये केलेले आहे आणि त्याला विथ दंड लावून. यामध्ये आपल्याकडेसुद्धा तो नियम होता त्याच्यामध्ये सरसकट आपण पाचशे रुपये प्रमाणे आकारत होते. त्यामध्ये महापालिकेचे जे उत्पन्न आहे. कारण विकासक पुर्ण लोडींगने नागरिकांना ते विकले जाते. त्यामध्ये महापालिकेचा काही फायदा होत नव्हता. म्हणून म्हणून मुंबई, नवी मुंबई, ठाणे ह्या सर्व ठिकाणी अशा वेळेमध्ये मॅक्झिमम दहा ते पंधरा टक्के पर्यंतचे मोअर दॅन एफ.एस.आय. जो काही विकास कर आहे तो ह्या बंदिस्त बाल्कनी दंड आकारुन आपण वसुल करतो. त्याचाच भाग म्हणून या ठिकाणीसुद्धा ती कर आकारणी होत होती. त्याचे प्रमाण कमी होते. मिनटाईममध्ये सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी म्हटल्याप्रमाणे ते आपण जास्तीचे केले होते. पण ते इम्प्लिमेंट करायला अडचणीचे होत. वीस हजार रुपये जी रक्कम आहे ते धरुन आपण बजेटची रक्कम निश्चित केलेली नाही. आपण पाचशे रुपये धरुन निश्चित केलेले होते आणि व्यवहारिक आता हे जे दोन हजार आणि एक हजार रुपये आपण प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे निश्चितच आपल्या टोटल उत्पन्नामध्ये वाढ होईल आणि ह्याचे नागरिकांना कोणताही भूदंड होणार नाही. जे रुटीन सिस्टम आहे तेच राहिल.

**प्रकाश दुबोले :-**

उपायुक्त साहेब, हा जो दंड आकारलेला आहे, परंतु आपण त्यांना एफ. एस. आय. मध्ये जो शुल्क लावलेला होता. नकाशा मंजूर करताना त्यावेळी बाल्कनीला शुल्क लावला नव्हता का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

नकाशा मंजूर करताना एफ.एस.आय. हा आपण कारपेटवर करतो. एफ.एस.आय. परमिटेडमध्ये विकास कर घेतो.

**प्रकाश दुबोले :-**

त्याच्यावर आपण त्याच्याकडून पैसे घेतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

आता त्याच्यामध्ये दहा टक्के जे बाल्कनी बंदिस्त आहे ते सरसकट आपण हा ठराव मान्य केला तर त्यांना घेता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, सुप्रिम कोर्टाचा आदेश आहे की....

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, ते देखील शुल्क त्यांच्याकडून आकारावे. दंड आकारणार आहोत. त्याबरोबर तेही शुल्क आकारावे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण जर मान्यता दिली तर निश्चितच तसे करता येईल व महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

**प्रकाश दुबोले :-**

ते शुल्क आकारावे अशी माझी सुचना आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

हे शुल्क फार जास्त नाही. बाहेरच्या कॉर्पोरेशनबरोबर विचार केला तर, आपण हे फार सारासार केलेले आहे आणि ह्याच्यामध्ये नागरिकांना ही त्याचा बर्डन होणार नाही आणि विकासकाचा ह्याच्यामध्ये काही डायरेक्ट संबंध नाही.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, हा विषय याठिकाणी आणला गेला. दि. २०/०३/२००६ ला ठराव क्र. ९४ नुसार मा. महाभेनेच मंजुरी दिलेली आहे आणि आज पाच महिने दोन दिवस झालेले आहेत व पुन्हा हा ठराव येतो, हे कितपत योग्य आहे?

**जयंत पाटील :-**

हा संपुर्ण विषय वास्तुविशारद आणि विकासक....

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी मा. महासभेने दि. २० मार्च, २००६ ला ठराव क्र. ९४ मंजुर केलेला आहे. आज पाच महिने दोन दिवस झालेले आहे आणि हा विषय परत आलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण एवढी घाई का केली?

**प्रकाश दुबोले :-**

मा. महासभेने मंजुरी दिली ते मान्य नाही म्हणून सांगता व ओ.सी. घ्यायचे आपण हे अगोदर पासूनच बिल्डर लोकांनी बंद केलेले आहे. ह्याच्यावर कुठेतरी कंट्रोल आला पाहिजे ना? आपण ठराव केला म्हणून त्यांना मान्य नाही आणि त्यांची मनमानी चालते ती आपण मान्य करुन घेतली. या गोष्टीवर कुठेतरी बंधन आणले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब, दुसरी गोष्ट अशी आहे की, जर आपण हा दर कमी केला तर तुमच्या फ्लॅटचे दर कमी होणार आहेत का? तर ते होणार नाही. बिल्डरसाठी, विकासकसाठी आणि वास्तूविशारद त्यांचीच लोक असतात. त्यांचे जे आर्किटेक्ट आहेत त्यांनी आणि बिल्डरनी हा विषय येथे आणलेला आहे आणि त्यांच्यापुढे कुठेतरी आपण झुकतो आहोत. आज हे शहर झुकत आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी आपल्याला महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सांगितले, हा ठराव आपल्याला पास करण्याची आवश्यकता नाही, कमी करण्याची आवश्यकता नाही. आपल्या शहराचे उत्पन्न वाढले पाहिजे. आपण हे कोणासाठी करत आहोत? बिल्डर लोकांना फायदा होण्यासाठी, पण ते कुणाच्या फ्लॅटचे एक रुपयाही कमी करणार नाही. तोच दर ठेवणार आहे का? उलट दिवसेंदिवस रेट वाढत जात आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, महत्वाची गोष्ट अशी की, आपण विकास कर कारपेटने घेतो. बिल्डर आज बिल्डिंग विकताना सुपर बिल्ट अप म्हणजे चाळीस टक्के वाढ. एक बाल्कनी आपण चार बाय दहाची पकडली, चाळीस फुट. फ्लॅटमध्ये किमान दोन बाल्कनी असतात. ऐंशी फुटाचे तो दोन हजार रुपयाप्रमाणे ऐंशी लाख रुपये वसुल करतो आणि आपल्याला एवढासा दंड द्यायला त्यांना होत नाही आणि विकास करही तोच लागत नाही. आता सन्मा. नगरसेवक प्रकाश दुबोले यांनी सांगितले की, आपण त्यांच्याकडून विकास करही घेत नाही. म्हणजे एवढी दया-माया दाखविण्याची गरज नाही. मुंबई महानगरपालिकेचे आपण उदाहरण दिलेले आहे तर मुंबई महानगरपालिका नागरिकांना फार मोठमोठ्या सोयी देते. आज बिल्डर जी जागा आहे ती जागा, ओपन स्पेसपण सोडत नाही. ओपन स्पेस म्हणून सोडायला पाहिजे तेही सोडत नाही. त्याचाही विकास कर भरत नाही. हाही प्रश्न उपस्थित केला असताना तसे करता येत नाही. दंड आकारल्यावर कार्यवाही करता येत नाही. म्हणजे एखादा सुपर बिल्ट अपमध्ये फ्लॅट विकायचा विकास कर कारपेटने भरायचा. एफ.एस.आय.चा जास्त प्रयोग करायचा. विकास कर भरायचा नाही आणि बाल्कनी बंदिस्तमध्ये त्यांना सुट द्यायची. हे सभागृहाला मान्य नाही असे आमचे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदय, प्रकरण क्र. ५१ बऱ्याच उशीराने आपण मला परवानगी दिली त्याबद्दल धन्यवाद. काही ठिकाणी सभेचे नियम आपण स्वतः मोडत असतो. विषय, बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनीय शुल्काच्या आकारणीबाबत. या विषयामध्ये आपण या दंडामध्ये जे काही मॉडीफिकेशन करणार आहोत वाढ-घट, कमी-जास्त. पण सभागृहामध्ये या विषयामध्ये पहील्या दोन पॅरेग्राफमध्ये पहिल्या दोन लाईन आहेत. तत्कालिन मिरा भाईर्दर नगरपरिषदेने सर्व साधारण सभेतील ठराव क्र. ७५ दि. ०५/०८/१९९२ अन्वये बंदिस्त बाल्कनीसाठी दंडनीय शुल्क म्हणून पाचशे प्रति बाल्कनी म्हणजे एका बाल्कनीचे पाचशे रुपये असा हा ठराव म्हणत आहे.

मी विषयातील वाचतो आहे. चौरस फुट, चौरस मिटर किंवा ब्रास. शंभर फुटाला एक ब्रास होतो. जी आर्किटेक्टची भाषा आहे ती मी बोलत आहे. ह्याचा खुलासा या विषयपत्रिकेमधील आपल्या गोषवाऱ्यात नाही. म्हणजे आपण एकीकडे या ठरावानुसार बाल्कनीसाठी पाचशे रुपये आकारलेले आहेत. खाली आपण स्क्वेअर, चौरस मिटरचा हिशोब देत आहोत. त्यानंतर आपण खाली असेही म्हटले आहे की, संबंधित जे बिल्डर आणि वास्तूविशारद वगैरे जे आहेत यांनी केलेल्या विनंतीस मान देउन महापालिकेने बैठक घेतली. ठिक आहे. बैठक घेण्याचा मा. महापौर, मा. आयुक्त ह्यांना अधिकार आहे. परंतु, या बैठकीमध्ये किती आर्किटेक्ट आपल्याकडे उपस्थित होते? किती बिल्डर्सने मागणी केलेली आहे? त्यामध्ये ब्लॅक लिस्टेड किती आहेत? कारण गेल्या दिड महिन्यापुर्वी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये या मिरा भाईदरमधल्या अनधिकृत बांधकामाबद्दलचे प्रश्न गाजले. राज्यमंत्र्यांनी त्याच्यावर उत्तरे दिली आणि त्या बिल्डर लोकांनी सार्वजनिक हिताय प्रयोजनार्थ ज्या मोकळ्या जागा सोडल्या होत्या. तुमच्या डि.सी. रुलमध्ये ज्या तरतूदी आहेत त्याचे व्हॅल्युएशन करुन सोसायटीच्या ऑफिसकरिता जी जागा आहे ती अधिकृतपणे दिली गेली पाहिजे असा तुमचा डि.सी. रुल म्हणतो आहे. ह्याचे व्हॅल्युएशन करुन त्या जागा विकल्या, त्या रजिस्टर केल्या आणि त्याचे ताबेसुद्धा देउन टाकले आणि नंतर तुमचे भोगवट्याचे दाखले घेतले. भोगवट्याचा दाखला मिळाल्याबरोबर एका आठवड्यामध्ये त्यांनी वासलात लावून टाकली. आपण आपल्या प्रस्तावामध्ये म्हणतोय की, भोगवटा दाखला घेण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. म्हणजे आपण जर शंभर प्लान पास केले तर त्या शंभर प्लानचे शंभर भोगवटे दाखले निघालेच पाहिजे. आपण या विषयपत्रिकेमध्ये ही वाक्यरचना, शब्दरचना केली नाही पाहिजे. म्हणजे शंभर बिल्डिंग पास झाल्या पण तुमच्याकडे कोण भोगवटे काढत नाही आणि त्याच्याने तुमचे डेप्रिसिएशन वाढत चालले आहे. गेल्या दोन महिन्यामध्ये उच्च न्यायालयाच्या सोसायटीने केलेले पि.एल.आय., जनहित याचिका आणि रिट पिटीशनवर ऑर्डर आलेले आहे आणि ते आपल्याला बंधनकारक आहे. त्याच्यातल्या काही ऑर्डर्स मी काढून आणलेल्या आहेत. ओपन स्पेस आहेत. नकाशच्या व्यतिरिक्त ज्या ज्या जागा सुट्या सोडलेल्या आहेत, वाहनांच्या पार्किंग जागा आहे, गार्डन्स आहेत, लिफ्टच्याबाबतीतले अनेक निर्णय, अशा प्रत्येक सोसायटीने दाखल केलेल्या केस म्हणजे बिल्डरच्या विरोधामध्ये सोसायटीने उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या केसेस आहेत. त्याच्यातल्या ५-६ केसेसचे निकाल त्या सोसायटीच्या बाजूने, त्या नागरिकांच्या बाजूने लागलेले आहेत. हा विषय आपण नक्की केला आहे. मी तर या विषयावर आणखिन मॉडिफिकेशन करायला सांगत आहे की, प्रशासनाने ज्या दोन लाईन दिलेल्या आहेत, पाचशे रुपये प्रति बाल्कनी ही शब्दरचना बदला. त्याच्यामध्ये फुटाला पाचशे रुपये टाकले तरी चालेल. कारण आता मोनोबिल्ट अप सुरू झालेला आहे. मनुभाईंचा मोनोबिल्ट अप कळलं का? मोनोबिल्ट अप हे मी आयुष्यभर ऐकले नव्हते. नियमानुसार २७ टक्क्याच्या वर जाउ शकत नाही. पण भाईंदरला ६० टक्क्याच्या वर आता जवळ जवळ सुपरबिल्ट अप, बिल्ट अप त्याच्या उपर गेले आणि ही ब्राउचर वाटली जातात. या ब्राउचरमध्ये गार्डन, प्ले ग्राउंड वगैरे हे सर्व देणार आहे आणि तसे आपले प्लान पास केले जातात. आपल्या आयुक्तांच्या त्याच्यावर सह्या असतात. पण प्रत्यक्षात ज्या लोकांनी तिथे फ्लॅट घेतले आहेत अशा लोकांना पझेशन देते वेळी अशा जागा उपलब्ध करुन दिल्या जात नाही. या प्रस्तावावर, मुळ तर या ठरावाला आमचा विरोध आहे. कारण जी दंडात्मक कार्यवाही तुम्ही करत आहात. त्याच्यामध्ये अगोदर केलेल्या ठरावावर तुम्ही मॉडिफिकेशन करु शकत नाही. कारण बजेटवर त्याचा डायरेक्ट इफेक्ट आहे. याच सभागृहाने हे बजेट मान्य केलेले आहे. पाचशे रुपयाचा जो रेट दिलेला आहे तो कुठल्या आधाराने? हे आपण येथे क्लिअर केलेले नाही आणि पाचशेच्या वर जे तुम्ही केलेले आहे तेसुद्धा कुठल्या आधारावर हे कळवलेले नाही.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब,.....

**मिलन म्हात्रे :-**

विरोधी पक्षनेते आपण थांबा मी परमिशन घेतलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

आपण जर बोलत राहाल तर आम्ही काय करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

आपण बोला ना. एवढ्या वेळेपासून चर्चा चालू आहे. पण आता मला बोलायला परमिशन दिलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, बाल्कनीच्या दंडाबाबत बऱ्याचशा सदस्यांची चर्चा झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभेचा नियम मोडू नका. माझी चर्चा पुर्ण झालेली नाही. आपण खाली बसावे.

**परशुराम पाटील :-**

प्रशासनाने ह्याच्यावर चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा आणि हा विषय पुढच्या सभेमध्ये घ्यावा अशी आपणास विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तेच सांगत आहे हा विषय कसा असला पहिजे?

**परशुराम पाटील :-**

हा विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेत विषय घ्यावा ना. पण तो विषय कसा असावा?

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदय, अगर यह जो विषय है इसको अगली सभा में लिया जाए।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे साहेबांनी जवळ जवळ सात मिनीटापासून हात वर केला होता आणि हे सदस्य कसे मधे उठून बोलतात? मॅडम, हे बरोबर नाही, असे वागणं.

**मिलन म्हात्रे :-**

नाहीतर अशी हुल्लडबाजी आम्ही ही करतो.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मॅडम, यह ठराव अगली सभा में लिया जाए।

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, माझे म्हणणे मी दोन मिनिटात आटपतोय.

**मा. महापौर :-**

बोला.

**मिलन म्हात्रे :-**

माझा मुद्दा क्र. १ असा की, आपण हे जे मॉडिफिकेशन करत आहोत. एखादा बिल्डर चौरस फुटामध्ये त्याचे इनक्ल्युडेन्शन करतो. बाल्कनीसुद्धा त्याच्यात इनक्लुड करत आहे. आपण सर्व नगरसेवक आहोत. बिल्डरच्या या अनधिकृत कृतीला या ठरावाद्वारे आपण पाठिंबा देत आहोत का? ह्याचा जरा विचार करा. कारण सेपरेट चटई क्षेत्र हे वेगळे व बाल्कनी हे वेगळे. हे आपण इन्क्लुड करणार आहोत. या सगळ्याचा विचार करा व हा जो ठराव आहे व जे आर्किटेक्ट लोकांना ब्लॅक लिस्टमध्ये टाका असे मा. महापौर, मा. आयुक्तांचे या सभेत या सभागृहामध्ये आदेश झालेले आहेत. आम्हाला बघायचे आहे की, कोणी विनंती केली? मागच्या तत्कालीन आयुक्तांनी जर अशा आर्किटेक्टवर स्टीचर पास केली असतील आणि त्यांनी जर तुम्हाला विनंती केली असेल तर तुम्हाला त्याचे उत्तर द्यावे लागेल. ते आयुक्त बरोबर होते. श्री. शिवमुर्ती नाईकांपासुनचे मी बोलत आहे. सभागृहातले जे काही वक्तव्य आहे, मॅडम हा कायदा आहे. हा नियम आहे. आपण तपासून पहा. नाहीतर ब्लॅक लिस्टमध्ये हा आर्किटेक्ट असेल व तो तुमच्याकडे येउन ओरडणार. हे चालायचे नाही. किती बिल्डरवर आपण केस केलेली आहे? तुमच्याकडे ज्या विनंत्या आल्या, त्या केसेस केलेल्या, त्या इमारतींनी केसेस केलेल्या बिल्डरर्स त्यामध्ये इनक्लुड आहे का ते बघा. तुमच्या मिटींगला कोण बिल्डर आलेले होते? ह्याच्यामध्ये त्याबाबतची कसलीही डिटेल माहिती दिलेली नाही. उद्या आपण त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे आणि त्यांनी येउन सांगावे की, तुमचा ठराव चुकीचा आहे. आपण ठराव व्यवस्थित करा असे हे होणार नाही आणि महानगरपालिकेचे आम्ही कुठेही आर्थिक नुकसान होउ देणार नाही.

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्रमांक ५१, बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनिय शुल्काच्या आकारणीसाठी फेरविचार करणेबाबत सभागृहामध्ये सर्व सन्मा. सभासदांनी या ठिकाणी आपली मते व्यक्त केलेली आहेत आणि आपल्या महानगरपालिकेच्या बजेटवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होउ नये अशा पद्धतीचा तपशीलवार आपण आणला पाहिजे आणि सर्व सदस्यांनी या ठिकाणी विनंती केलेली आहे की, संपुर्ण या विषयाचा फेर आढावा घेउन ह्याची पुर्ण माहिती सभागृहापुढे आणून नंतर हा विषय पुढे घ्यावा असा मी ठराव मांडतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

विषय क्र. ५१ बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनिय शूल्काच्या आकारणीबाबत हा विषय स्थगित ठेवण्यात येत आहे. पुढिल विषयाला सचिवांनी सुरूवात करावी.

**प्रकरण क्र. ५१ :-**

बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनिय शूल्काच्या आकारणीसाठी फेरविचार करणेबाबत.

**ठराव क्र. ४१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्रमांक ५२ चे वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदया, नगरपालिका – महानगरपालिका का उत्पन्न महानगरपालिकामें उत्पन्न का साधन हाउस टॅक्स ....

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सर्वात पहिल्यांदा आपण सांगितले की, ऑगस्ट अखेरपर्यंत आपण हे बिल देणार आहोत. बिल दिल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत बिल भरल्यानंतर आपण १ टक्का सुट देणार आहोत. आता ऑगस्ट अखेर म्हणजे ह्याचे डेफिनेशन काय? ऑगस्ट अखेर चालू आहे आणि आपण ह्याच्यात ऑगस्ट म्हटलेले आहे. मग ऑगस्ट अखेर म्हणजे अजून किती दिवस बाकी आहेत ऑगस्ट अखेरला. अजूनपर्यंत बिल आलेली नाहीत आणि नउ दिवसात बिल पुर्ण होणार नाही असे मला वाटते. आपण दरवेळी जी बिल आहेत ती नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात देतो. आजपर्यंत ऑगस्ट महिन्यामध्ये बिल दिलेले नाही. तर त्याच्यावर विचार करण्यात यावा. दुसरी बाब अशी की, आपण म्हटले आहे की, बिल प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत पेमेंट केल्यावर एक टक्का सुट देणार आहोत. मॅडम, जर ह्याच्यात छोटी रक्कम असली एखाद्या व्यक्तिचा पाचशे रुपये कर आहे तर पाचशे रुपयाकरता आपण त्याला सुट किती देणार हार्डली पाचशे रुपये. तो व्यक्ती असा विचार करेल की, आपण महापालिकेत पाच रुपयासाठी टाईम काढून जायचे त्यापेक्षा त्याची थिंकिंग अशी असणार आहे की, महापालिके चा कर्मचारी आपल्या घरी आल्यानंतर आपण पैसे दिले तर आपल्याला तेवढा फायदा होईल नुकसान होणार नाही. आयुक्त साहे, दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण जे कन्सेशन दिलेले आहे त्याची शेवटी पिरियड काय आहे? म्हणजे ऑगस्ट महिन्यात आपण बिलं दिली तर माझ्या माहितीप्रमाणे आपण डिसेंबर महिन्यापर्यंत बिल भरले तर आपण कुठलाही व्याज घेत नाही आणि मार्च महिन्यापर्यंत बिलं भरली तर आपण त्यांना अर्धा टक्का पेनल्टी आकारतो. उदाहरणासाठी सांगतो ब्ल्यु मून क्लब हा माझा होता आणि तो मी विकलेला आहे. त्याचा कर साधारणतः २ लाख रुपये आहे. जर ते २ लाख रुपये मी पंधरा दिवसाच्या आत भरले असते तर त्या क्लब मालकाला हार्डली १ हजार रुपये फायदा झाला असता. त्याने तेच पैसे बँकेत ठेवले आणि मार्च मध्ये काढून तुम्हाला आणून दिले असते तर तिथे त्याला दहा हजार रुपये फायदा झाला असता. म्हणजे ह्या १ टक्क्याला काहीच अर्थ नाही. आपण हे छोटया रक्कमेसाठी करत नाही. अशी मोठी – मोठी बरीचशी इंडस्ट्री आहे, कमर्शिअल टॅक्स जास्त आहे. आपण मार्च महिन्यामध्ये बिल भरु. पंधरा दिवसामध्ये एका टक्क्याने आपले काय होणार? त्यापेक्षा ते पैसे वापरले तर दहा पट आपल्याला बेनिफिट होणार आहे. ह्याचा चांगल्याप्रकारे विचार करण्यात यावा. म्हणजे १ टक्का हा कुठेही चालणार नाही. त्याच बरोबर महत्वाची गोष्ट अशी आहे की, आपण जे बिल वाटप करणार आहोत त्याच्यामध्ये ज्या लोकांनी उशीरा पैसे भरलेले असतात त्याची ही आपण थकबाकी पाठवतो आणि त्यांना ते क्लिअरन्स घ्यायलाच पंधरा दिवस लागते. म्हणजे एखाद्या व्यक्तिने विचार केला की, मी जाउन बिल भरतो तरी आपल्याकडून त्याचे क्लिअरन्स मिळत नाही. तर पंधरा दवसात तो व्यक्ती कसे बिल भरणार? तो एक महत्वाचा मोठा विषय आहे. म्हणजे ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने, समजा मागच्या वर्षाचे बिल आहे त्या व्यक्तीने उशीरा बिल भरला असेल. आपण संगणकामध्ये ज्यावेळेला एन्ट्री करतो त्यानंतर त्यांनी बिल भरले असेल तर आता जी बिलं जनरेट होणार आहेत ते थकबाकी जोडून होणार आहे. म्हणजे त्याचे जे बॅकलॉग असेल ते जोडून आपण त्यांना बिल पाठवणार आहोत. ज्यावेळी तो व्यक्ती परत पैसे भरायला येतो त्यावेळी त्याला आपण बोलतो की, तुम्ही तेथून शेरा घेउन या की, बिल भरलेले आहे किंवा नाही. मग त्याच्यामध्ये प्रॉब्लेम होतो. साहेब, एका व्यक्तीला भरायच असेल आणि ते उशीरा भरले तर ज्या व्यक्तीला रक्कमेमध्ये सुट द्यायची आहे त्याला जबाबदार कोण राहणार? अधिकारी राहणार? महानगरपालिका राहणार? की भरणारा राहणार? एखादे माझे बिल आहे. तुम्ही सहा महिन्यानंतर मला दुरुस्ती करुन दिले व आता मी म्हणेन तुम्ही मला आता सुट द्या तर तुम्ही मला सुट देणार आहात का?

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता यांनी सुचना केली आहे. थकबाकी जी फॉरवर्डींग होते ती मिस्टेक असते. पण त्या संबंधितांनी मी मागच्या वर्षामध्ये भरलेली आहे पण बिलात पुन्हा आलेली आहे हे दाखवून दिले, दोन्ही पावत्या सेम दाखवून दिल्या तर थकबाकी वजा करुन बाकीचे पैसे घेतले जातात.

**नरेंद्र मेहता :-**

आपण नविन बिलामध्ये ॲड करुन देतो.

**अजित पाटील :-**

बरोबर आहे. जर त्यांनी दाखविली व आमची पोस्टींग चुकीची झाली त्यात प्रशासनाची चुक झाली तर ताबडतोब त्याचे व्याज आणि नोटिस फी लावलेली आम्ही कमी करुन करंटचे पैसे घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की, आपण अशी बिलं पाठवतो तर अशी बॅकलॉक बिल गेलीच नाही पाहिजे.

**अजित पाटील :-**

अशा प्रकारची दक्षता यावेळेस घेण्यात आली आहे. पोस्टींगच काम सिरिअसली चालू आहे अशा प्रकारच्या तक्रारी ह्यावर्षी येणार नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण ५६ करोड रुपये आहे आणि आपण १ टक्का सुट दिली. १०० टक्के आपली रिकव्हरी झाली तरी मोठा भाग नाही. कारण माझा प्रभाग हा जास्त वाढणारा आहे. ग्रीनकोर्ट पासून ते साधारण बी.पी. रोडपर्यंत. आजपर्यंत त्याच्यामध्ये कमीत कमी तीन हजार फ्लॅट असे असतील ज्यांना कर लागलेले आहेत आणि ते सहा वर्षापासून राहतात. आठ वर्षाची अशी सोसायटी आहे की ज्यांनी दहा-दहा वेळा पत्रं दिलेली आहे. दहा वेळा रायटिंगमध्ये पत्र दिली आहेत त्या बिल्डींगला आपण ऑक्युपेशन दिले. त्यालासुध्दा आपण कर लावत नाही. म्हणजे एका बाजुला आपण एवढा मोठा लॉस करत आहे.

**अजित पाटील :-**

आताच्या ह्या सर्व्हेक्षणामध्ये सर्वांना कर लावलेला आहे अशी आपण....

**नरेंद्र मेहता :-**

आपले काय म्हणणे आहे की, आपण सर्वांना कर लावले आहेत. आठ वर्षाची सोसायटी आहे त्यांनी ४ वेळा महापालिकेला पत्र दिले आहे आणि त्याला अजूनही कर लावला गेला नाही. आता त्याच्यावर आपण इंटरेस्ट घ्यायचे.

**अजित पाटील :-**

बहुतेक असे राहिलेल नाही. आपण सभासदांनी दाखवून द्या. ज्यावेळी मा. आयुक्त साहेबांना चार वेळा पत्र लिहिलेले आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आम्हाला या विषयावर ह्यांच्याशीच बोलायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मला पत्र प्राप्त झालेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मी त्यांना परवानगी दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ज्यावेळी आपण पत्र देतो तेव्हा ते पत्र मा. आयुक्तांनाच देतो तुम्ही संदर्भ त्या डिपार्टमेंटला फॉरवर्ड करता पण त्याची कार्यवाही होत नाही. कित्येकदा विजय पाटील यांनी सांगावे की चार बिल्डिंगना टॅक्स लागले आहेत. त्यांना मी कित्येकदा सांगितले. आर.डी.शिंदे साहेब होते त्यावेळची गोष्ट आहे.

**अजित पाटील :-**

मागच्या महिन्यात सर्व्हेक्षण केले आहे. कोणतीही इमारती टॅक्ससाठी राहिलेली नाही. आपण सन्मा. सदस्यांनी आणून दिले तर सेम डे टॅक्स लावण्यात येईल कोणत्याही परिस्थितीत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, थोडक्यात असे म्हणणे आहे की, आपण एका बाजूला इकडे वसुलीसाठी धडपड करतो आहे. त्यापेक्षा अजून नवीन कर आकारणी करायची आहे त्याच्यामध्ये करोडो रुपयाची महानगरपालिकेची वाढ होणार आहे. त्याच्यावर जरा जास्त लक्ष दिले पाहिजे आणि जे एक टक्का आहे. दॅट इज नॉट फ्लेजिंबल रक्कम. म्हणजे कोणीही तुमच्याकडे येणार नाही मग उगाच ठराव कशाला? माझे असे म्हणणे आहे की, एक टक्का केले तर कोणी येणारच नाही. कोण व्यक्ती यायला तरी पाहिजे ना.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मॅडम, सुबहसे जनाब पाच बार बोल चुके है। हम लोगोंको एक बार भी मौका नही मिलता।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जनाब आप मा. महासभा में प्रश्न ही नही लाते।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मेरा कहने का, मतलब है की नगरपालिका में सिर्फ दो ही डिपाटमेंट कमाने के है। जिनसे खर्चा चलता है। एक तो टॅक्स है और दुसरा टाऊन प्लॅनिंग है। टाऊन प्लॅनिंग से आज तक पता नही चलता की क्या कमाई होती है वहा से महानगरपालिका की मुझे पता नही चलता या अपने नगरसेवको को भी पता नही चलता टाऊन प्लॅनींग मे क्या प्राब्लेम है। कहा से पैसा आ रहा है। कहा जा रहा है। डेव्हलपमेंट कैसे हो रहा है। ५०० सो नकशे एक ही महीने मे पास हो जाते है उनसे नगरपालिकाकी कितनी आय होती है यह आज तक पता नही चला। कहने का तात्पर्य अभी सब्जेक्ट ५२ जिसमे नगरपालिका की ५७ करोड रुपया वसुल

करने की बात है। एक सुसज्जीत आपके पास एक स्टाफ है लेकीन मुझे लगता है छह महिनेसे सारा स्टाफ सो रहा है। कुछ दिन तेजी आयी थी ५७ करोड रुपये वसुल करने की मिस्टर नाईकने उस जमाने में लगाके टॅक्स वसुल कर के शहरका विकास करना जरुरी है। थोडीसी तेजी आई वसुलीकी अधिकारीयों मे भी लगा लेकीन जनाब श्री. विजय पाटील जैसे अधिकारी यहा पुरा डिपार्टमेंट साडे तीन करोड का बेकार पडा है सिर्फ जन्म-मृत्यू का पत्र मिलता है वहा से और पुरे के पुरे आपके कम्प्यूटर बेकार है आपके साडे तीन करोड रुपया लगके बिल्कुल वेस्टेज हो गया मा. आयुक्त महोद्य, आपको बताना चाहता हुं कम से कम एक महानगरपालिका बनी है तो कोई तो चेंज आना चाहिए। लेकीन यहा कुछ चेंज नही आया। पब्लीक को सहुलीयते देने के नाम पर हमने कुछ भी नही दिया। सन्मा. सदस्य ओमप्रकाश वही बात है जो आप हमारी कह रहे है हमारी बात है लेकीन आपका तरीका अलग है और हमारा तरीका अलग है। बिच मे मत बोलिए आपके बीच हम नही बोलते मा. आयुक्त महोदय मेरा कहने का यह मतलब है की छह महीने अपने बेकार चले जाते है। माह एप्रिल से एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर इस साल प्रभाग हमे जिम्मेदारीया दी। आप जिम्मेदारीयो का डिसपरसमेन्ट नही करना चाहते जरासी भी जिम्मेदारी प्रभागाको नही दे रहे है। हम जाते है हमारे स्टाफ को देखने तो स्टाफ आराम से बैठा सो रहा है। क्या काम है। साहब, काम दिया है इनस्पेक्शन इधर जा रहे है उधर जा रहे है। घर जाकर घुमकर चले आते है महानगरपालिका का कही तो कंट्रोल होना चाहीए। मा. महापौर महोदया, आप प्रभाग मे जाकर देखीए क्या काम होता है। हमारे जैसे लोग जिन्हे काम पसंद है चुप चाप बैठे रहते है स्टाफ से लढ नही सकते। यहा क्लोजिंग नही हुआ पिछले साल का जो अमाऊंट आया था इसका क्लोजिंग बिल अब तक बने नही। जैसे प्रभाग समिती का मैं अध्यक्ष बना, मैंने कहा महानगरपालिका मे नंबर वन सबसे ज्यादा टॅक्स का पैसा वसूल करके बताऊंगा। लेकीन वहा देखा तो अभी तक क्लोजिंग का पता नही। श्री. विजय पाटील को बोला तो वह बोले की साहब वही काम हम कर रहे है। मुझे लगता है इतने सक्षम अधिकारी को एक बार कहने से तो दुसरा डिपार्टमेंट दे दिजीए कम से कम उन्हे आरोग्य तो दे दिजीए। आज दस साल हो गया हर आदमी श्री. विजय पाटील के बारे मे बोल रहे है लेकीन उनका डिपार्टमेंट चेंज नही हुआ है। ना मालूम आप लोगो का क्या है। मा। आयुक्त महोदय अभी आपके पास सुसज्जीत पुरे आयुक्त है बताऊ एक आयुक्त है, तीन उपायुक्त है, चार सहा. आयुक्त है, और करीब आठ या नौ ए क्लास ऑफीसर है। इससे महानगरपालिका किस तरह से काम कर रही है यह आपको खुद ही महसूस होगा। अभी टॅक्स की बात आई है तो टॅक्स का ठराव जाहीर टॅक्स की बात है की, आप ५७ करोड रुपये वसुल करेंगे कमसे कम चार महिने डिसेंबर तक वसूल करके अगर २० टक्का, ८० टक्का भी किया तो कमसे कम ४० करोड रुपये इकट्ठा हो जाता है। उसके लिऐ आप ऐसा विधीवत अगले साल ५ साल के लिए ऐसा कानून बनाईए थाना महानगरपालिका मे दुसरी महानगरपालिका मे अपने से बहूत कम पैसा पैदा करनेवाली कल्याण नगरपालिका में कम्प्यूटर सेक्शन कितना अच्छा चल रहा है बिल उनके अप्रेल, मे, महिने मे आ जाते है। अपने यहाँ मे महिने मे बिल नही आ पाऐंगे, उम्मीद भी नही है। आज कोई अधिकारी उनको काम करने को दिजिए मई मे हर हालत मे टॅक्स का बिल आना चाहिए। हम लोगो को नागरिक पुछ के परेशान करते है की साहब, आपके बिल नही आऐ सोसायटी के पास पैसा है देने केलिए पर कहा जमा करे ये पता नही है। आज ये ठराव आया है इसमे मेरा निवेदन है मे ये प्रस्तावित करता हु। थाना के अगर आपके बिल सप्टेबंर महिने मे आ जाते है। १५ सप्टेंबर मे तो ३० सप्टेंबर तक जो बिल भरे उसे ५ टका कम किजिऐ उसके बाद एक महिने मे जो पैसा भरे तीन टक्का कम करे ये और अक्टूबर, नोव्हेंबर मे १५ नोव्हेंबर तक जो भरेंगे उन्हे दो टक्का कम करीए इस तन्हेका उनके बिल पर कम करके उतना पैसा दिया जाएगा तो वो आपको जो पैसा है ४० करोड जिससे मैने ८० टका बताया आपको बिना किसी मेहनत के बिना किसी जोर जबरदस्ती किये हुए आपको जो सहआयुक्त उन्हको है पता चल जायेगा। ४० टका ऑफ दी ८० टका टोटल अमाऊंट वसुल हो गया तो कम से कम पब्लिक को भी यह सहूलत मिल जायेगी। अभी कोई भी काम बोलिये, हर ठेकेदार का पैसा पडा हुआ है अपने यहॉ सिस्टम देखीए दस जगह दस भगवान के मंदिर है। चढावा चढाना पडता है। तब जाके आदमी आखरी हनुमानजी प्रसन्न हो जाते है।

**मिलन म्हात्रे :-**

सबसे बडा मंदिर कौनसा है?

**महेंद्रसिंग चौहान :-**

मेरे कहनेका मतलब मा. आयुक्त महोदय को थोडीसी नीचे हम लोग भी कहीना कही काम मे रह चुके है। लेकीन मेरा मा. आयुक्त साहब को कहनेका मतलब ये है महानगरपालिका बन गई पर कोई भी काम मे तपदीली नही आई।

**मिलन म्हात्रे :-**

आज सत्य वचन हो रहा है। श्रावण का मास है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

सत्य वचन हमेशा होता है लेकीन आपको सुनना तो चाहीए। आप अपने हिसाबसे बोलीए।

**मिलन म्हात्रे :-**

बोलीए।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मै तो सहयोगात्मक कहता हूँ। हमेशा ही मेरी पॉझिटिव्ह थिंकींग है की महानगरपालिकाको हमेशा फायदा हो। आज ये ठराव आया बाल्कनी का। बाल्कनी का प्रस्ताव आया वह थोडें दिनोंके बाद रखिए ना। किसी कॉन्ट्रॅक्टरने बोला या किसी आर्कीटेक्टने बोला अभी चौथे माले का जो आपका ऑफिस है, देखिए ना बिल्डर और आर्कीटेक्ट का ऑफिस है। क्या करते है आपके अधिकारी कितने आरक्षण को आपने अभी तक लिया? एक आरक्षण हमको मिला है हमारी जानकारी मे इस्ट मे इनकी नर्सरी बनाना है मैने कहॉ कमसे कम १ लाख पडेंगे मुझे लगता है की अभी तक किसी भी अधिकारीने मुझे लगता है मा. खतगांवकर साहबने भी उसका ज्ञान नही लिया की वो कौनसे कोने पर आरक्षण है। एक टेन्डर मैने २००३ मे निकाला था, चौपाटी के सुंदरीकरण का। १ करोड २० लाख रुपयोंका टेन्डर मिट्टी का लेकीन आज तक टाऊन प्लॅनिंग ने उसकी खबर नही ली। उसको सी.आर.झेड.से कैसे निकाला जाए न जाने किसके दबाव से वह चीज कॅन्सल कर दी। समय खत्म हो रहा है फिर से इलेक्शन आने जा रहा है। लेकीन.........

**मिलन म्हात्रे :-**

हमने हमारा समय आपको दे दिया है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

लेकीन तेजी निकल गई। हमे लगा हमारे मा. आयुक्त महोदय शिर्डी से आए है भगवानने कुछ अच्छा यहा पे भेजा है। पर न जाने आपने कहा सबकुछ वही पर समाप्त कर दिया। यहॉ के लिए सिर्फ कुछ सुनने के लिए और कम बोलने की शिक्षा लेके आए। आप बोलिए इस शहरको तो सुधारीऐ वरना यह भी चार सालसे भी उल्हासनगर से भी कम नही होगा। मेरे बोलनेका मतलब इतना ही है ऐसा नही है ५०० नक्शे टाऊन प्लॅनिंग के सहयोगात्मक रुप से आपका सहयोग करना चाहते है। नगरपालिका और पब्लिक को कुछ भी मिले। पब्लिक का कुछ भला हो। मिस्टर नाईक नाम क्यु न लु मैने दो बार नाम लिया। एक बार रोड चौडा किया। हम सभी बहुतसे लोग बिल्डर है हमारे पश्चिम के बैठे हुए है सभी लोगोने सहयोग दिया रोड चौडा कर दिया। आज अच्छा लग रहा है। बिल्डींग तोडी, लागो को अच्छा पर ऐसा कोई चमत्कार साहब आपने नही दिखाया। मा. महापौर महोदया, आप के बोलने मे अच्छा खासा सबकुछ प्रशासन को अच्छा ऑर्डर देती है। पर पता नही प्रशासन क्यो नही हिलता है। पहिले नही थे आयुक्त वगैरा, आज आपके पास पुरा स्टाफ है। पुरा स्टाफ होन के बावजुद काम नही हो रहा है। अभी एक अच्छा मौका है। आप लोगो को एक अच्छा मौका है पब्लिक को बता सकते हो। यह ५ टका और ३ टका मा. आयुक्त महोदय, अगर यह प्रोव्हिजन है तो इस शहरके नागरिकोको देखीए आप ५ टका टॅक्स मे सहुलीयत दिजिए आपका टॅक्स डिसेंबर तक मुझे लगता है ८० से ९० टका भर जाएगा। सोसायटी तैयार है पैसा देने को लेकीन ५ टका बिल पर फौरन कट कर उन्हे सहुलीयत दि जाए। ५ टका और ३ टका उसके लेट के बाद मेरा ये ठराव है की, महानगरपालिकासे.........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चौहान साहब, आप ठराव मांडीए, पर चर्चा तो होने दिजिए। आपको ना किसीने कहा है, ठराव आपही मांडीए।

**महेंद्रसिंग चौहान :-**

महानगरपालिकेची कामे वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने विकास कामासाठी लागणारा निधी मोठ्या प्रमाणावर वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रामाणीकपणे मुदतीत कर भरणाऱ्या करदात्यांना सुट दिल्यास नागरिक मोठ्या प्रमाणावर कराचा भरणा भरण्यास प्रवृत्त होईल. अशाप्रकारे ठाणे महानगरपालिकेने देखील वेगवेगळ्या मुदतीत वेगवेगळ्या दराने सुट दिली आहे जात आहे. महापालिकेच्या विकास कामासाठी लागणारा निधी वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नागरिकांना कराचा भरणा वेळेवर करण्यास प्रोत्साहनार्थ महानगरपालिकेचे सन २००६-०७ ह्या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे बिल मालमत्ताधारकांस बिल मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत भरण्याचे मालमत्ता धारकाने हालाकी ५ टका कम करके उनसे पैसा लिया जाय। उसके बाद एक महिने के अंदर भरणा किंवा मालमत्ता धारकांचे बिलांचे, करांचे रक्कमेवर ३ टक्के एवढी सुट देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. मालमत्ताधारकांना सुट देण्याचा फायदा बिलिंग होण्याच्या दृष्टीने बिल भरणा केल्यानंतर त्याच दिवशी मालमत्ता धारकांना अदा करण्यांत यावी. मालमत्ता धारकांचे मोठ्या प्रमाणावर करांचे भरणा करण्याच्या दृष्टीने सुट देणे आवश्यक असल्याने कराच्या दृष्टीने भरणा रक्कमेवर सुट देणे कामी अंदाजपत्रक रुपये इतने महानगरपालिकाके अधिनियम १०१ या कलमाखाली मंजुरी देण्यात येत आहे. इस तरह का यह मेरा प्रस्ताव है। यह जनता के हित मे सर, हर जगह पे सभी के योग्य है। धन्यवाद!

**परशुराम पाटील :-**

अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आता विषय क्रमांक ५१ आणि ५२ दोन्ही विषय आपण बघितले. आपण ५२ चा विषय हा आजचा विषय नाही. नगरपालिकेच्या काळापासून करदात्यांना सुट देण्यांत येते. पण मागच्या ५ वर्षापासून हा विषय का घेतला नाही किंवा महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी का विचार केला नाही. याची खंत वाटते. मा. महापौर मॅडम, एक रुग्ण असेल आणि तो रुग्ण डॉक्टरकडे जातो तर तो डॉक्टर चार, पाच तपास करतो. त्याचे ब्लडप्रेशर चेक करतो, त्याला रक्त तपासणीसाठी सांगतो, अन्य बाबी करायला सांगतो. तोच रुग्ण एका मेडीकल स्टोअरमध्ये जातो आणि माझे डोके दुखत आहे असे सांगुन एक छोटीशी गोळी मागतो. त्यामुळे त्याचे डोके दुखणं थांबते. म्हणजे या महापालिकेमध्ये नागरिकांच्या हिताचा विचार करण्याच्या आधी अधिकारी सक्षम आहेत. अधिकारी कोणीच असक्षम नाहीत असे नाही पण त्यांची कार्यपध्दती त्यांना कशा पध्दतीने काम करायला पाहिजे ही जाणीव त्यांना नाही. नगरपालिकेच्या काळामध्ये अर्धा टक्क्यांनी सुट या महापालिकेच्या वतीने नगरपालिकेच्या वतीने देण्यात येत होती. मधल्या काळामध्ये आम्ही पण अनेक वेळेला सांगितले की, महानगरपालिकेमध्ये अशी सुट द्यावी पण तरतुद नाही.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी ठराव मांडलेला आहे आणि सन्मा. विरोधी पक्ष नेते यांनी याला अनुमोदन दिलेले आहे आता ठराव झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण चर्चा होउ द्या.

**लिओ कोलासो :-**

चर्चा भरपुर झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा व्हायच्या अगोदर तुम्ही लोक ठराव कशाला ठेवतात?

**लिओ कोलासो :-**

चर्चा भरपूर झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा व्यवस्थीत होउ द्या. आम्हाला बोलायचे आहे.

**लिओ कोलासो :-**

आपण विषयाचा शेवट करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे हे धंदे काय? तुम्ही मग ठराव ठेवताताच कशाला? प्रत्येकाला त्यावर बोलायचे आहे. ७.०० वाजे पर्यंत आम्ही सभा चालवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आज या महानगरपालिके मध्ये कोणत्या तरी सदस्यांची अंतरआत्मा जागली आहे असे वाटते आणि त्यांनी सर्व अंतरआत्माशी बोलायला पाहिजे. एक व्यक्ती दारु पिल्यानंतर सच्चा बोलतो हे तो अंतरआत्माने बोललेला आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदया, अंतरआत्माकी बात मेरे दोस्त ने की, सन २००३ मे टॅक्स की बात स्थायी समिती मे मैने उठाई थी।

(सभागृहात गोंधळ )

**महेंद्रसिंग चौहान :-**

पब्लिक के हित की सारी बाते मेरे द्वारा बताई गयी है । यह तो मेरे पुण्य के बाद मे बात करते है। जनहित की सारी बाते हम करते है। जनहित की सारी बाते मेरे द्‌वाराही की गई है। यह लोग मेरे बात करने के बाद बात करते है।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम , सन्मानिय . सदस्यांना त्यांचे वक्तव्य मागे घ्यायला सांगा . त्यांनी दारु पिलेल्या माणसाचा असा शब्द वापरला आहे.

(सभागृहात गोंधळ )

**परशुराम पाटील :-**

मॅडम, सदर विषयावर ठराव झालेला आहे ना?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**मिलन पाटील :-**

त्यांनी जे उदाहरण दिल आहे त्यावर त्वरीत ॲक्शन घ्या.

**रतन पाटील :-**

सन्मानिय. सदस्यांनी त्यांच्यावर आक्षेप घेतलेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, कुठल्याही सभागृहामध्ये जर मी असा शब्द वापरला असेल तर मी माफी मागतो पण मी अजुनही कधीही असा शब्द वापरलेला नाही.

**महेद्रसिंग चौहान :-**

यह सारी बाते हम पहिले ही सन २००३ मे कर चुके है। पुनरोद्धार करते है। लेकिन इन्होंने कोई नयी बात नही की है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी बोलत आहे. दोन मिनिटात मी माझे मत मांडतो. ठराव मांडलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण बसुन घ्या. ठराव सर्वानुमते मंजुर. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मला दोन मिनिटं बोलायचं आहे. या विषयावरच आहे. मला फक्त या ठरावावर सुचना करायची आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग समिती के अध्यक्षने अभी यहाँ पे बोला की यहॉ पर कुछ मंदीर है। वो मंदीर में कुछ भेट देना पडता है, कुछ चढावा देना पडता है। मैं उनसे कुछ पुछना चाहूँगा के वो कौनसे मंदीर है। हमने यहाँ पे एक भी मंदिर नही देखा है।

**मिलन म्हात्रे :-**

मंदीर है। एक ही मंदीर है।

**धनराज अग्रवाल :-**

राम का मंदीर है या कौनसा मंदीर है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह महानगरपालिका ही एक मंदीर है।

**धनराज अग्रवाल :-**

आप उन्हे पुछिए कौनसा मंदीर है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग साहेब ने बोला है, की मंदीर मे बिना चढावे के कोई काम नही होता है। ऐसे कौनसे अधिकारी को यह चढावा चढाते है वह बोलिए। वह अधिकारी का नाम बताईए।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, गंभीर आक्षेप आहे. मॅडम, गंभीर आक्षेप केलेला आहे. याबाबत आपण सन्मा. सदस्यांना विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

मंदीर अटकवली बाबा का है।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तूम्ही त्यांना विचारा आपण येथे कोणत्या मंदीरात प्रसाद चढवतो?

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्यने बोला की हमने चार बरस तक कोई विकास का काम नही किया। अभी वो बात रिपीट करेगें तो इनको तकलीफ होगा। और यह बोलते है, जब तक ये कोई अधिकारी को चढावा नही चढाते तब तक कोई काम नहीं होता। तो कौनसे अधिकारी को ये चढावा चढाते है यह इनसे पुछिए।

**रोहित सुवर्णा :-**

यह बात हमलोग बोलते तो मा. महापौर मॅडम हमे बिठाती है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आप बैठ जाइए। सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम आपण बोला।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान साहेबांनी ठराव केलेला आहे. विरोधी पक्ष नेते यांनी अनुमोदन दिलेले आहे. तर आपण कर आकारणी करतो आणि त्या कराचं आपण वसुलीसाठी आपण काही ना काही साठ गाठ करतो. आपण काही ना काही युक्ती राबवतो, की जनता आपल्याकडे कर भरण्यासाठी येते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप हमारे सदस्य को आप ना बोलते है, की बोलने का नहीं पर अभी आप मॅडम को बोलने दे रहे है। क्योंकी आपके ठराव मे अनुमोदन चाहिए।

**रिटा शाह :-**

अनुमोदन का सवालही नही है। इस ठराव को अनुमोदन हो गया है।

**धनराज अग्रवाल :-**

अनुमोदन हो गया है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

इस ठराव मे हमारा भी सुझाव है की उसमें विधवा और हॅन्डीकॅप को सबको टॅक्स माफ कर दिजीए।

**मदन उदित नारायण सिंग :-**

अनुमोदन हो गया है, तो फिर ठराव पर चर्चा क्यो कर रहे है।

**रिटा शाह :-**

चर्चा नहीं कर रही हूँ। जो ठराव हो गया है उसमें सुचना दे रही हूँ।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका जी आपको परमिशन दिया था। आपने अभी इतना सारा बोला, आपको बोलनेके लिए परमिशन दिया था ना।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला ही या विषयावर सुचना करायची आहे त्याकरिता आम्ही परमिशन मागत आहेत.

**मा. महापौर :-**

आपकी लाईन जब तब उठके खडे होके बोलने लगते है, आपको परमिशन की जरुरत नहीं होती है।

**रिटा शाह :-**

मॅडम, आता आपल्याकडे जनता कशी पैसे भरायला येणार, ठिक आहे. त्यांना ५ टक्के, ३ टक्के, २ टक्के केलेले आहे. परंतु, मा. शिवमूर्ती नाईक साहेबाचे नाव मला वाटते आपण फार वेळा नगरसेवकांनी त्यांची आठवण काढली. रस्ता रुंदीकरण, कर वसुली यासाठी. परंतु, जनतेला आपण प्रोत्साहन दिलेलं आहे की आपण असे असे सूट देणार आणि तुम्ही आमच्याकडे भरणा करा. परंतु, कर वसुलीसाठी आपण आपले कर्तव्य बजावलेलं आहे. पण ज्या कर वसुलीवर आपण अधिकारी आणि स्टाफ नेमलेला आहे, ते कर वसुली का होत नाही व का केली गेली नाही आणि ते बिल का लोकांपर्यंत ठराविक वेंळेमध्ये पोचत नाही. हा सवाल आपल्यासमोर उद्‌भवतो तर आपण जनतेला प्रोत्साहीत करतो, तर आपण अधिकारी आणि स्टाफलाही प्रोत्साहीत केलं पाहिजे किंवा पेनल्टी लावायला पाहिजे. कारण अधिकाऱ्यांनी वेळेवर वसुली केली नाही, वेळेवर बिल दिले नाही. मग त्यांना काही ना काही सजा, शिक्षा आणि पेनल्टीच्या रुपाने काही ना काही आज तुम्ही डिक्लेअर करा अशी माझी सूचना आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आता आमचे सहकारी सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी जे वक्तव्य केले ते खरोखर म्हणजे आज बोध घेण्यासारखे आहे. ह्याच्या अगोदर सुद्धा मी प्रत्येक वेळेला मा. उपायुक्तांना सांगितलेले आहे, की डिपार्टमेंटली एक रजिस्टर ठेवून द्या. डिपार्टमेंटली रजिस्टर अशासाठी ठेवून द्यायचा कदाचित बघा. तुम्ही कधी आपले, मा. आयुक्त कधी नसले समजा, कामानिमित्त कधी बाहेर गेले तर प्रत्येक डिपार्टमेंट खाली असतात. तुम्ही बघून घ्या. तुमच्या नंतरसुद्धा प्रत्येक डिपार्टमेंट खाली असतात. आम्ही कोणत्याही अधिकाऱ्याकडे जातो तर अधिकारी तिकडे नसतात. इकडे गेलेत, तिकडे गेलेत, आज कोर्टात गेलेले आहेत. अधिकारी सांगतात, मी त्या वेळेला मा. खतगांवकर साहेबांना सांगितलेले होते, की तुम्ही डिपार्टमेंटली एक रजिस्टर ठेवून द्या. ज्या मा. उपायुक्तांना जायचे असेल, ज्या अधिकाऱ्यांना जायचे, ज्या स्टाफला जायचे असेल, ज्या शिपायांना कुठेही बाहेर जायचे असेल त्यांनी त्या रजिस्टरमध्ये नोंद करावी आणि कुठेही जावं बाहेर किंवा आम्ही जर एखादे नगरसेवक, कुठल्या कामानिमित्त आलो तर आम्हाला सुद्धा कळलं पाहिजे, कोणते अधिकारी कुठे गेलेले आहेत? आम्ही जर रजिस्टर बघितलं तर ताबडतोब आम्हाला लक्षात येईल. अमुक एक ठिकाणी कामानिमित्त गेलेले आहेत. आणि प्रत्येक वेळेला....

**रतन पाटील :-**

फोनसुद्धा बंद करतात. आपण त्यांना फोन कशासाठी दिलेले आहे?

**मिलन पाटील :-**

आपण प्रत्येक वेळेला जर असे केले तर आपल्याला काय कळणार आहे आणि मी किती वेळा फिरलो. तुम्ही किती वेळा, गेटवर बघा. सगळे लोक बाहेर जातात. कधी कधी अख्खे डिपार्टमेंट खाली असते. तर ह्यांची तुम्ही दखल घ्या आणि मा. महापौर मॅडम, तुम्ही आताच निर्देश द्या, ह्या दोन किंवा चार दिवसामध्ये प्रत्येक डिपार्टमेंटला रजिस्टर ठेवण्याचे कृपया आदेश द्यावेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा.):-**

मी आपल्याला सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, आपल्या सजेशनप्रमाणे प्रत्येक विभागप्रमुखाला तसे आदेश काढलेले आहेत. प्रत्येक विभाग प्रमुखाकडे तसे मुव्हमेंट रजिस्टर आहेत. आपण ते बघू शकता.

**मिलन पाटील :-**

आता आहेत का रजिस्टर? चालू आहेत का? मग ते आम्हाला का बघायला मिळत नाही? त्यांनी रजिस्टर टेबलावर ठेवावीत. त्यांच्या खणामध्ये, कपाटामध्ये ठेवली तर आम्हाला कसे माहिती पडेल? त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या टेबलावर रजिस्टर ठेवावीत तर आम्ही बघू शकतो ना. ठिक आहे, आज आपण आम्हाला सांगितलेले आहेत ह्याच्यानंतरच आम्ही त्याची चौकशी करु.

**मा. आयुक्त :-**

अशा प्रकारचे रजिस्टर ठेवलेले आहेत. परंतु, संबंधित खातेप्रमुखांना आदेश देण्यात येतील की, सन्मा. सदस्य आल्यानंतर ते रजिस्टर त्यांना दाखवावं.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी या विषयावर बोलू इच्छितो की, मी आज सकाळी शिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये गेलो होतो. शिक्षण अधिकारी देखील उपस्थित नव्हते. त्यांच्याबाहेर सात क्लार्क बसतात. एकही क्लार्क उपस्थित नव्हता. त्या ठिकाणी मला फक्त श्री. परब साहेब दिसले, श्री. दातीर दिसले. पण एकही क्लार्क नव्हता. ही आजची घटना आहे. सव्वा अकरा वाजेपर्यंत कोणीही नव्हते. कृपया, उपायुक्त साहेबांनी या गोष्टीकडे द्यावे. आम्ही वेळोवेळी तक्रार करणे बरोबर नाही. मा. खतगांवकर साहेबांच्या ऑफीसमधील शिपाईसुद्धा युनिफार्ममध्ये नसतो हे मी त्यांच्या लक्षात आणून दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मागच्या स्थायी समिती सभेमध्ये सदर विषय चर्चेला गेला की, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आपण येथे फक्त रजिस्टर सह्या घेण्यासाठी ठेवलेले आहे. मागील स्थायी समितीच्या सभेमध्ये पंचिंग मशीन आणि थम्स अप, आपण त्याचं कॉम्प्यूटरद्वारे थम्स म्हणून आपण जी मागणी केलेली आहे. ते आजपर्यंत लागली गेलेली नाहीत आणि अन्य महापालिकेमध्ये महापालिकेच्या वतीने जे दौरे झालेले आहेत. अन्य महापालिकामध्ये गेल्यानंतर तिथली जी वस्तूस्थिती किंवा त्या अधिकाऱ्यांकडे आम्ही निश्चितच बघितलं तर प्रत्येकाच्या गळ्यात त्याचं नाव, त्याचे हुद्दा आणि त्याचं कार्ड आहे. आयडेंटीटी कार्ड, प्रत्येक अधिकारी, कर्मचारी कुठेही जाईल, त्याचे कार्ड त्याच्या गळ्यात आहे. आज आपल्याकडे असा प्रकार दिसत नाही आहे. आपले सगळे कर्मचारी आहेत, हे खाली आहेत. सगळे बाहेर. आजसुद्धा आता ह्या क्षणीसुद्धा गेटच्या बाहेर कुणाला पहायला सांगितलं तर सगळे लाईनने महापालिकेच्या त्या कट्टयावर बसलेले असतात. आपण पाहणी करावी. आता पाहाणी करावी, वाटल्यास. पण अशा पद्धतीने नगरपालिकेने एकतर पहीले त्यांना ड्रेसची सक्ती करावी. कंम्लसरी शिपाई असो, कुणीही असो त्यांना ड्रेस महानगरपालिकेमध्ये त्यांना प्रथम सक्ती करावी. त्याच्या गळ्यामध्ये आयडेंटीटी कार्ड हे त्याच्या हुद्द्यासहीत त्याच्या गळ्यात अडकवण्याची आणि लगेच त्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. कारण आज कर्मचारी येथे येतो त्यांना आम्ही बघतो. एखाद्या अधिकाऱ्यांच्या कॅबिनमध्ये गेल्यानंतर ते सांगतात, कुठे गेले साहेब, साहेब दुसऱ्या माळ्यावर. अहो, दुसऱ्या माळ्यावर शोधायचे कुठे? मा. आयुक्तांच्या, मा. महापौरांच्या की, मा. उपमहापौरांच्या? कुठल्या कॅबिनला शोधायचे? तिथे काही उत्तर नाही. दुसऱ्या माळ्यावर, दुसऱ्या अधिकाऱ्यांना विचारले तर दुसऱ्या साईटवर. अहो कुठल्या साईटवर गेले आहेत? हे काय आहे. मला निश्चित उत्तर दिली जात नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा.):-**

सन्मा. सदस्यांच्या सुचनेच्या अनुषंगाने खुलासा करतो, स्थायी समितीमध्ये खुलासा झालेला आहे. त्यांनाही ती कल्पना आहे की येणाऱ्या स्थायी समितीमध्ये पंचिंग मशीन आणि स्मार्ट कार्डची योजना त्यांचे दर मागवलेले आहेत. मा. आयुक्तांकडे ते मंजूरीसाठी सादर केलेले आहेत आणि स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर तात्काळ ती कार्यवाही पूर्ण होईल. आपण ती कार्यवाही अंतिम स्टेजला आणलेली आहे.

**प्रकरण क्र. ५२ :-**

महापालिका कराची वसुली मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी मालमत्ताधारकांना प्रोत्साहनपर मालमत्ता कराच्या रक्कमेवर बट्टा (सूट) देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मालमत्ता कर व इतर सर्व कर ही प्रमुख उत्पन्नाची साधने आहेत. मालमत्ता कर व इतर सर्व कर वेळच्या वेळी मागणीनुसार वसुल होणे महानगरपालिकेस आर्थिक दृष्ट्या आवश्यक आहे. महानगरपालिकेने हाती घेतलेली विकास कामे मुदतीत पुर्ण करुन घेण्याच्या दृष्टीने त्या कामी लागणारा निधी वेळच्या वेळी उपलबध होणे तितकेच जरुरी आहे. महानगरपालिकेची सर्व कराची मागणी सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात थकबाकीसह एकूण ५६.५५ कोटी इतकी अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या विकास कामासाठी लागणारा निधी वेळच्या वेळी उद्दीष्ट साध्य करणे आवश्यक असल्याने

महानगरपालिकेचा कराचा भरणा नागरिकांनी वेळीच केल्यास महानगरपालिकेला लागणारा निधी वेळीच उपलबध होऊ शकेल.

नगरपालिकेचया कालावधीमध्ये नगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार बिल दिल्यापासून १५ दिवसाचे आत कर भरणाऱ्या नागरिकाला १% सूट देण्याची तरतुद होती, त्यामुळे नागरिका १% सुटीचा फायदा घेऊन कराचा भरणा मोठ्या प्रमाणावर करीत होते. जे मालमत्ता धारक कराचा भरणा वेळेवर करीत नाहीत, मोठ्या प्रमाणावर रक्कम थकीत ठेवतात अशा मालमत्त धारकांवर विलंबाबद्दल १२% दराने व्याजाची आकारणी महानगरपालिका करीत आहे. अशा कारवाईमुळे महानगरपालिकेस व्याजाचे उत्पन्न मिळत असते. ज्याप्रमाणे कराचा भरणा वेळेवर व विहीत मुदतीत करणाऱ्या करदात्यांना प्रोत्साहनार्थ म्हणून कराच्या भरण्यावर सूट दिल्यास प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांस न्याय दिल्यासारखे होईल.

महानगरपालिकेची विकास कामे वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने विकास कामासाठी लागणारा निधी मोठ्या प्रमाणावर वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रामाणिकपणे मुदतीत कर भरणाऱ्या करदात्यांना सूट दिल्यास नागरिक मोठ्या प्रमाणावर कराचा भरणा भरण्यास प्रवृत्त होईल, अशा प्रकारे ठाणे महानगरपालिकेस देखील वेगवेगळ्या मुदतीत वेगवेगळ्या दराने सूट दिली जात आहे.

महानगरपालिकेचे विकास कामासाठी लागणारा निधी वेळेवर उपलब्ध होण्याचे दृष्टीने नागरिकांना कराचा भरणा वेळेवर करण्यास प्रोत्साहनार्थ महानगरपालिकेचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे बिल मालमत्ता धारकांस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत भरणाऱ्या मालमत्ता धारकांस बिलाच्या कराच्या रक्कमेवर ५% व १ महिन्याच्या आत भरणाऱ्या मालमत्ता धारकांस बिलाच्या कराच्या रक्कमेवर ३% इतकी सूट देणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

मालमत्ता धारकांना सूट दिल्याचा फायदा वेळीच होण्याच्या दृष्टीने बिल भरणा केल्यानंतर त्याच दिवशी मालमत्ता धारकांस अदा करण्यांत यावी.

मालमत्ता धारकांनी मोठ्या प्रमाणावर कराचा भरणा करण्याच्या दृष्टीने सूट देणे आवश्यक असल्याने कराच्या भरणा रक्कमेवर सूट देणे कामी अंदाजपत्रकात रु. ५० लाख अतिरिक्त अनुदानाची तरतुद करणेस ''महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१'' या कलमाखाली मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५३ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण नियमानुसार मुल्याच्या वाजवी दरात मंजूरी मिळण्यासाठी विषय आलेला आहे. आपण जो इकडे तक्ता दिलेला आहे. त्या तक्त्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आपण वेगवेगळे दर दाखविलेले आहेत. याचं कारण आम्हाला कळलेले नाही. या शहरामध्ये राहणारा कोणीही असेल त्याला समान दर असायला पाहिजे, अशी माझी वैयक्तिक मागणी आहे. गावठण विभागाला सोडून, गावठण विभागाबाबत मी काहीही म्हणत नाही. कारण ते मूळचे स्थानिक रहिवासी आहेत. त्यांची जुनी घरे आहेत. परंतु, आपण उत्तनमध्ये आर.सी.सी. दाखविलेले आहे. उत्तन चारवर. त्याला आपण ०.८५ म्हणजे ८५ पैसे दर लावलेला आहे. म्हणजे उत्तनमध्ये ज्या इमारती बनवतील आणि बनलेल्या आहेत. त्यांना आपण ८५ पैसे लावतात आणि इतर ठिकाणी ज्या इमारती आहेत, मिरारोड, भाईंदर पूर्व, घोडबंदर, काशिमिरा, त्या ठिकाणी आपण १ रुपया ६० पैसे लावलेले आहेत. ही तफावत एवढी असण्याचे कारण काय? दुसरा भाग असा आहे राई, मुर्धा, मोर्वा, डोंगरी, चौक या ठिकाणी सुद्धा इमारती झालेल्या आहेत. राई-मुर्धामध्ये इमारती झालेल्या आहेत आणि होत आहेत. त्या इमारतींना आपण ८० पैशांनी दर लावलेले आहेत. एवढी तफावत असण्याचे कारण काय? साहेब, मी इमारती बद्दल म्हणतो आहे. गावठण विभागात जी घरं आहेत त्यांच्या संबंधी म्हणत नाही.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, डोंगरी, उत्तन ते मुर्धा पर्यंतचा रेट किंवा नवघर भाईंदर हा जो गावठण विभाग आहे त्या गावठण विभागाला वगळून काजूपाडा, चेणे, वरसावे, घोडबंदर, काशिमिरा, पेणकरपाडा ह्या भागाला जो कर सन १९९९ पासून आकारला जात होता तो दर आणि उत्तनचा दर ह्याच्यात जी तफावत आहे आणि आमच्या कडून ग्रामीण भागातील जे स्थानिक रहिवाशी आहेत. गावठणात ज्यांची घरें आहेत त्यांच्याकडून १ रुपया २० पैशाने कर आकारणी केलेली आहे आणि आज सन ९९ ते २००६ ह्या मधल्या काळात जी करआकारणी केलेली आहे. ती आमच्याकडून दुप्पट केलेली आहे. ती कर आकारणी आमच्याकडे जर दुप्पट केलेली आहे. त्याची आम्हांला परतफेड मिळावी अशी माझी विनंती आहे. साहेब,

म्हणजे जी काही जास्त आकारणी केलेली आहे. आज आमच्या चेणे, वरसावे, काजूपाडा भागात जी आदिवासी लोकांची घरे आहेत. जे आदिवासी पाडे आहेत ह्या आदिवासी पाड्यांमध्ये सुद्धा जवळ जवळ ८० पैसे ते १ रुपया २० पैशाने घरपट्टी लावण्यात आलेली आहे. हा भेदभाव का? जर अगोदरच्या १९९८ सालापर्यंत बरोबर होता परंतु त्यानंतर सन १९९९ ते २००६ ह्या मधल्या काळात जी घरपट्टी डबल लावलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो कराचा विषय आहे. तर असणारे कर कौलारु, आर.सी.सी. ह्या घराला आर.सी.सी. किती आहे, कौलारुला किती आहे? त्याप्रमाणे कौलारुला १ रुपया २० पैसे आहे की, १ रुपया ८० पैसे आहे. ह्या पद्धतीने जो तो आपला ठराव झालेला आहे आणि त्या पद्धतीने मुदत वाढ देखील दिलेली आहे. ज्याला डबल कर लागलेला आहे. एकाच घराला दोन कर लागलेले आहेत असे तर आता जुना जो कर येत आहे त्याच पद्धतीने आपण त्यांना तो कर आकारण्यात यावा आणि जो कर नविन त्यांना आकारला गेलेला आहे तो कर मला वाटतं न घेता जुना कर आकारण्यात यावा त्यासाठी काही लोकांनी जुनी कर फी भरलेली नाही आणि जी नवीन घेतात. त्या पद्धतीने दोन महिन्याचा अवधी आपल्या प्रशासनातर्फे मुदत वाढवण्यात आलेली आहे. तर त्याच पद्धतीने त्याचा जो कर आहे. आता त्या गोष्टीला तीन वर्ष जवळ जवळ झाली. मा. आयुक्त साहेब शिंदे साहेब होते. एका बिल्डिंगला दोन कर लागतात त्या पद्धतीने आपल्या प्रशासनाकडून मला वाटते आता एकच कर लावला गेलेला आहे आणि त्या पद्धतीने जो कर लावलेला आहे त्या गावठणमध्ये घर बांधलेलं गेलेले आहे आणि त्या पद्धतीने त्यांचा कर घेण्यात यावा असे आपणांस घोषीत करतो.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ५३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ प्रकरण क्र. ८ नियम ७ नुसार मालमत्ता करात वाढ करण्यासाठी .........

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. मा. आयुक्त साहेब, हे असे ठराव वाचतात आणि मग नंतर माझ्या वेळेला उभे राहिल्यावर हरकत घेतात. आम्हाला चर्चा व्यवस्थित करायची आहे. तुमच्याकडे आम्ही विनंती केलेली आहे. आम्ही मंजुरी मागितलेली आहे. काही वांदा नाही वाचन नंतर करायचं. पहिला चर्चा नंतर वाचन.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख याबाबत प्रशासनाला उत्तर तरी देऊ द्या.

**आसिफ शेख :-**

ठिक आहे. उत्तर द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आमची चर्चा झाल्यानंतर त्याच्यावर उत्तर आले पाहिजे. आम्ही महापौरांकडून परवानगी मागितलेली आहे. आमची चर्चा झाल्यानंतर उत्तर आलं पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सगळ्यांचे प्रश्न ऐकुन घ्या आणि एकत्र उत्तर द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मांडल्यानंतर आपण सांगाल की......

**आसिफ शेख :-**

पण, ठराव मांडतच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मांडायची गरज नाही. चर्चा होऊन जाऊ द्या.

**मा. महापौर :-**

प्रशासनाला उत्तर देऊ द्या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, इसमे एक सुचना करनी है की, ......

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आपणच ठराव मांडा त्याला आमची हरकत नाही. पण आमच्या प्रश्नाचे उत्तर येऊ द्या.

**आसिफ शेख :-**

ठराव मांडायचा आहे आणि मलाही विचारायचे आहे. मला प्रश्न विचारु देणार की नाही देणार? सगळ्यांना एकत्रित उत्तर देतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, एक सुचना करु इच्छितो ह्याच्यामध्ये प्रतिवर्षी ५ टक्केने जी दर वाढ सुचविलेली आहे तर आतापर्यंत आपण बऱ्याच नागरीकांवरती कराचा बोजा टाकलेला आहे. तर मी या सभागृहाला अशी रिक्वेस असे करतो की, जे प्रतिवर्षी न घेता तीन वर्षांनी घ्यावे.

**अजीत पाटील :-**

मला वाटते कर घेण्याबाबत आलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

इथे दिले आहे दराने प्रतिवर्षी ५ टक्के इतकी वाढ करावी. तर ह्याच्यामध्ये तीन वर्षांनी करावे. दर तीन वर्षांनी वाढ करावी.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, एक सुझाव और है रहिवासी १.६० है बिगर रहिवासी ३ है। तर तो डबल से भी जादा हो गया। अभी अपना दिड पट तो मेरा आपसे रिक्वेस्ट है की वो उसमे रखा जाए। १.६० का २.४० बिगर रहिवासी बराबर है।

**अजीत पाटील :-**

आम्ही प्रस्तावित केलेले आहे. सभागृहासमोर विचार करण्याकरिता सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी खुलासा करतो. महानगरपालिका, नगरपालिका कायद्यातील तरतुदीनुसार तत्कालीन नगरपालिकेमध्ये शासनाने मुल्य निर्धारण अधिकारी यांना नगरपालिकेच्या वार्षिक भाडे मुल्य ठरविण्याकरिता कॉम्प्युटर अधिकारी म्हणून नेमणूक केलेली होती. त्यामुळे ते जे दर निश्चित करतील त्यानुसार दराची आकारणी करणे त्यावेळेला नगरपालिकेला बंधनकारक होतं, कायद्याच बंधन होतं. त्याने जे भाडेमुल्य निश्चित केलेलं आहे. त्या आधाराने नगरपालिकेने टॅक्सची आकारणी करायची कायद्याने तरतुद होतात. त्याप्रमाणे नगरपालिकेने टॅक्सची आकारणी केलेली आहे आणि तत्कालीन नगरपालिकेच्या वेळेला सन १९९९ साली मुल्यनिर्धारण अधिकाऱ्याने जे रेट निश्चित केलेले आहे त्यानुसार हे दरपत्रक तक्ता क्र.१ मध्ये दिलेले आहे आणि जे मुल्य निश्चित केले जाते. मुल्यनिर्धारण अधिकारी यांनी जे स्टेशनपासून जवळचं ठिकाण, स्टेशनपासून लांब ठिकाण हायवे हा सगळा विचार करुन त्यांनी भाडेमुल्य निश्चित केलेलं आहे आणि ही जी आपल्याला तफावत दिसते. मुर्धा, राई-मुर्धा याला ८० पैसे, भाईंदर पश्चिम-पूर्व मिरारोड याला १ रुपया ६० पैसे त्यांचा असा उद्देश आहे. म्हणजे स्टेशन लगत असलेले प्रॉपर्टी जनरली जास्त भाड्याने मिळू शकते असा अंदाज केलेला आहे आणि उत्तन हे स्टेशनपासून लांब असल्याकारणाने त्याचा दर त्यांनी वेगळा निश्चित केलेला आहे. हा आधारभूत धरुन त्यांनी भाव निश्चित केलेला आहे. हे भाव निश्चित करण्याचे अधिकारी हे मुल्यनिर्धारण अधिकाऱ्याला होते आणि त्यांनी केलेले भाव निश्चित करण्याचे अधिकार हे मूल्यनिर्धारण अधिकाऱ्याला होते. आणि त्यांनी केलेले भाव हे कॉम्पीट असल्याकारणाने त्या दरांनी आकारणी केलेली आहे आणि भाव निश्चित करण्याचे पूर्ण अधिकार शासनाने त्यांना दिलेले आहेत. त्यामुळे तफावत दिसते.

**रतन पाटील :-**

साहेब, पण त्याच्यामध्ये बदल करण्याचा अधिकार महापालिकेला आहे ना?

**जयंत पाटील :-**

प्रश्न असा आहे की, याच्यामध्ये १९९९ साली कर निर्मूलन मूल्याच्या अधिकाऱ्याने हे केलेले आहे. त्याकाळामध्ये राई, मोर्वा, पेणकरपाडा या ठिकाणी बिल्डिंग नव्हत्या. आज तिकडे फाऊंटन सारखं मोठे हॉटेल झालेले आहे. हे लक्षात घ्या आणि तो प्रचंड नफा कमावित आहे. मग तुम्ही त्यांना टॅक्स कमी लावणार आहेत का? त्या ठिकाणचे दर १९९९ सालचे दर आणि आजच्या दरामध्ये खूप मोठी तफावत आहे. उत्तनमध्ये ज्या इमारती झालेल्या आहेत त्या नंतर झालेल्या आहेत आणि मूळातच तिथे ना विकास झोन आहे.

**अजित पाटील :-**

कोणता?

**जयंत पाटील :-**

उत्तनमध्ये. तरी तिकडे इमारती झाल्या. त्या इमारतीला आपण कोणता दर लावणार?

**अजित पाटील :-**

जो निश्चित केलेला आहे तोच दर लावणार?

**जयंत पाटील :-**

कोणता दर? ८० पैसे, ८५ पैसे.

**अजित पाटील :-**

आपण जे प्रस्तावित केलेला जो दर आहे. त्या दरामध्ये बिल्डिंगला टॅक्स लावण्याकरीता चार कॅटेगिरी केली जातात. आर.सी.सी., लोड बेअरिंग, सिमेंट सिट, विटा....

**जयंत पाटील :-**

मी आर.सी.सी. बद्दलच म्हणतोय, बाकी म्हणत नाही.

**अजित पाटील :-**

उत्तनचा रेट आम्ही तसाच ठेवलेला आहे. त्यामध्ये आम्ही वाढ केलेली नाही.

**रतन पाटील :-**

अहो, नवीन इमारतीच्या दरामध्ये बदल झालाच पाहिजे.

**जयंत पाटील :-**

उत्तनचा दर आपण ८५ पैसे ठेवलेला आहे आणि तो आर.सी.सी.ला ठेवलेला आहे.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, आमच्या बोलण्याचा असा उद्देश आहे की, गावठण भागामध्ये जी काही कौलाची घरे होत आहेत त्यांचा दर आणि या हॉटेल्स किंवा बिल्डिंग्स भाड्याने देण्यासाठी जे होणार आहेत त्याच्यासाठी निराळा दर असे काहीतरी करावे ना.

**सुर्यकांत भोईर :-**

फक्त गावठणसाठी वेगळे दर करावे.

**केशव घरत :-**

फक्त गावठणसाठी रेट कमी करण्यात यावा.

**जयंत पाटील :-**

फक्त गावठणसाठी.

**अनिता पाटील :-**

जी रहिवाशांसाठी घरे बांधलेली आहेत त्यांना वेगळे दर लावण्यात यावे. कमर्शियल आहे, त्यांना आता तुम्ही जो दर लावाल तो दर लावून घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, या ठिकाणी प्रकरण क्र. ५३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियमानुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य ठरविण्यासाठी भाडेमूल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत....

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही परमिशन मागितली आहे. चर्चा व्हायच्या अगोदर ठराव कसे काय मांडता?

**रतन पाटील :-**

ठराव मांडणार आहात का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, दोन-दोन मिनिटं यांना बोलू द्या, नंतर तुम्ही ठराव मांडा.

**आसिफ शेख :-**

मी आता ठराव मांडत नाही. आता मला परवानगी दिलेली आहे तर माझे बोलणे पूर्ण होऊ द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव नंतर......

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी सन्मा. सभागृहातील ज्येष्ठ नेते सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, त्याचप्रमाणे आमचे मित्र सन्मा. सदस्य रतनजी पाटील आणि सन्मा. सदस्य केशवजी घरत साहेब यांनी या ठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत, खरोखरच या सूचना उपयुक्त आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये या ठिकाणी ग्रामीण भाग शहरी भाग.......

**मिलन म्हात्रे :-**

मला चर्चा करायची आहे, तुम्ही खाली बसा. ते ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

आदिवासी पाडे असे वर्गीकरण ठरावामध्ये करायला पाहिजे. शहरी भागामध्ये आपल्याला या ठिकाणी जे प्रस्तावित दर आपण निश्चित केले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परमिशन मेरेको दिया है। पहले मेरे को बोलने दो। बाद मे वो।

**आसिफ शेख :-**

ते सर्व दर सन्मा. सदस्यांना दिलेले आहे. याठिकाणी ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि गावठण या भागातील जे रहिवासी भाग आहेत. त्या मुळ रहिवासी भागांसाठी आपण ८० पैसे दराने कर आकारणी करावी आणि त्या व्यतिरिक्त जे मालमत्ता आहेत. त्यांना कमर्शियलसाठी जास्त असेल, म्हणजे रहिवाससाठी ८० पैसे आणि कमर्शियलसाठी १ रुपया ५० पैसे.

**रतन पाटील :-**

सर्वांना समसमान दर पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

आणि हॉटेलसाठी?

**आसिफ शेख :-**

हॉटेलचं कमर्शियलमध्ये आलं ना. रहिवास म्हणजे राहण्यासाठी, बिगर रहिवाससाठी हॉटेल्स पण आली. त्यामध्ये त्याप्रमाणे दर निश्चित करण्यात यावा. त्याचप्रमाणे जे आपण दरपत्रक या ठिकाणी दिलेले

आहे त्यामध्ये आपण एक टिप दिलेली आहे की, सदरच्या दरामध्ये प्रत्येक वर्षी ५ टक्के तर प्रत्येक वर्षी २ टक्के याप्रमाणे आपण दरवाढ करावी. अशा प्रकारे आपण या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सुचना आणि आम्ही मांडलेल्या सूचने संदर्भात मी हा सदरचा प्रस्ताव आपल्यासमोर मांडत आहे.

**रतन पाटील :-**

प्रस्ताव नंतर मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव नंतर मांडा. ही हलकटगिरी करु नका.

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, मी मांडलेली सूचना......

**मिलन म्हात्रे :-**

हे असं असेल तर आम्ही मिटींग चालू देणार नाही. तुमच्या सत्ताधाऱ्यांना मान ठेवायला सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, माझी सुचना या ठरावामध्ये घेतलेली नाही. कृपया ती सुचना घेण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

हे धंदे आम्हालाही चांगले करता येतात.

**रोहीत सुवर्णा :-**

आपण वाचता वाचता नंतर काय बोलले की, हा माझा ठराव आहे आणि आता तुम्ही बोलले माझा ठराव नाही ही माझी सुचना आहे. हे आपली देखील दिशाभूल करित आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ५३ सभागृहामधील सर्व नगरसेवकांनी या विषयावरती गंभीरपणे आपण जरा विचार करुन बघू या. मा. महापौर मॅडम, या शहराचे जर आपण चार भाग केले तर या सर्व ठिकाणी विकसनशील कामं करत असताना.....

**मा. महापौर :-**

आपण ठराव मांडता का?

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव नाही, हा ठराव होणार नाही. आमच्या सुचना आहेत त्या कोण घेणार? आम्हाला अजुन बोलायला दिलं का?

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी बोलताना सांगितले की, हा ठराव नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये ज्या सुचना असतील ...

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी सांगितले की, हा ठराव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमनी रुलिंग दिलेले आहे की, हा ठराव नाही. ठराव नंतर पहिल्यांदा चर्चा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, स्वतःच बोलल्या की हा ठराव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

या मिरा भाईंदर शहरामध्ये आपले वर्षाचे जे बजेट होते. त्याच्यामध्ये या शहराचे आपणचार हिस्से करु. या बजेटमध्ये येथे बसलेले प्रत्येक नगरसेवक त्यांच्या वॉर्डमध्ये जास्तीत जास्त विकसनशील कामे कशी होतील? याचा पाठपुरवठा पत्रव्यवहार, ठराव वगैरे करत असतात. या शहराच्या बजेटचा सर्वात एक महत्वाचे साधन म्हणजे हाऊस टॅक्स आहे. या शहरामधला जो तक्ता दिलेला आहे. आम्ही ज्या ठिकाणी राहतो तिकडे लोड बेअरिंग सिमेंटची सिट्स वगैरे कौलारु ह्यांचे दरच दिलेले नाही. म्हणजे याच्यापुढे आकारणी तुम्ही कशावरती करणार? सस्पेक्टेडच आहे. हा परिपूर्ण विषय तक्ता दिलेलाच नाही. बघा एवढी भाषणे चांगली चांगली होतात पण महत्वाचे कोणी बोलत नाही. सगळ्यांना गार्डन पाहिजे त्याला करोडो रुपयांचा खर्च आहे. अगदी उत्तन पासून ते थेट तुमच्या घोडबंदरपर्यंत, हा पैसा तुम्ही आणणार कुठून? आमच्याकडे हाऊस टॅक्स कमी करा, पाणीपट्टी कमी करा सगळेच बोलतात पण, हे मोठे-मोठे रस्ते, पार्क, रोड, संडास, शौचालय त्याच्यानंतर, गार्डन, वाचनालय, आपली विभाग कार्यालये आपल्याला याच सभेमध्ये सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी बोलले की, ॲम्ब्युलन्स गेली नाही. म्हणजेच तुम्हाला हे सगळे इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थित करायला महानगरपालिकेला जेवढा जास्त रेव्हेन्यु वाढेल तेवढा तुम्ही बघितला पाहिजे.

उत्तनसारख्या ठिकाणी किंवा काही ठिकाणी. मॅडम, आमचा कोणाशीही वैयक्तिक आकस नाही आहे. पण ज्यावेळेला तो निवासाचा जो प्रकार आहे, टाईप ऑफ स्ट्रक्चर तो बदलला जातो. त्याठिकाणी कोणाचही लक्ष नसते. गेल्या पाच-पाच वर्षापासून कुडाच्या घराचे चांगले बंगले झाले, ग्रॅनाईट लागले त्याचं व्हॅल्युएशन काढले तर करोडोत जाईल. बंगला विकायला काढला की, करोडोला विकला जातो. हाऊस टॅक्स त्यांना ५० पैसे, ८० पैसे पाहिजे. माझ्या माहितीनुसार अनेक प्रलंबित आहेत. माझ्याकडे माहितीच्या आधारातली काही उत्तरे आलेली आहेत. साहेब, आम्ही उगीच बोलत नाही. ज्या दिवशी आपण सांगाल मिटींग ठेवा आम्ही त्या उत्तरासकट पुरावे सादर करु. त्या त्या विभागातले अजुनही टाईप ऑफ स्ट्रक्चर बदललेले नाहीत. त्या शिवमुर्ती नाईक साहेबांच्या पासुनचा कालावधी मी सांगत आहे. मी परत एकदा बोलत आहे. गेल्या चार वर्षापासुनचा इतिहास आहे. हा प्रकार बदलून टाईप ऑफ स्ट्रक्चर बदलून ५० पैशाचा दिड रुपया होईल याबद्दल कोणी प्रयत्न केला का? की बाबा माझ्या विभागातील ही प्रकरण निकाली काढा आणि हा जो पहिल्यंदी कौलारु घरं होती त्याचा बंगला झाला. कौलारु घराचे ५० पैसे होते. आता दिड रुपया तर दिड रुपयानी वसुल करा असे कोण बोलतय का? पण या ठरावाच्या अगोदर ही प्रकरणे एवढी पेन्डीग आहेत हे आपण आयुक्तांना कळवा की, ही प्रकरणे पेन्डीग आहेत. आज पेणकरपाडा त्या ठिकाणी भविष्यात रेट काय असेल? आज तीन हजार रुपये भाडे आहे तरी ते भरायला हरकत नाही असे दिसते. त्याकरिता आपण त्याचे व्हॅल्युएशन परत करा. काही घरे आहेत, जी लाकडी आहेत, ती पडलेली आहेत का? कौलारु घरे आहेत ती पडलेली आहेत का? त्याची पाहणी करा? ते घर जर पाडून नविन घर बांधले असेल तर तसे व्हॅल्युएशन करा ते स्वतः तुम्हाला हाऊस टॅक्स वाढवून देणार नाही. आपण फक्त रजिस्टरवर चेक करतो. आपण हा ठराव देताना परिपूर्ण द्या. आज भाईंदर वेस्टचे दर दिलेले नाही. उद्या हा ठराव झाल्यावर लॅन्ड मालक कर आकारणी करताना ह्याच आकारणीने कर आकारणी करणार का नाही?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी सभागृहाला माहिती देतो की, तत्कालिन नगरपालिकेने हे दर निश्चित केलेले होते ते दर शहरातील पाच विभागासाठी मर्यादित होते. प्रत्येक विभागामध्ये ज्या ज्या प्रकारची स्ट्रक्चर असतील त्या त्या प्रमाणामध्ये त्यांनी दर द्यायला पाहीजे होते परंतु काही काही ठिकाणी दर दिलेले नाहीत हे आपल्या गोषवाऱ्याच्या पहिल्याच पानावर जे नमुद केलेले आहे त्याच्यामध्ये १९९९ सालामध्ये जो निर्णय मुल्यनिर्धारण अधिकाऱ्यांने घेतलेला होता तो दिलेला आहे. त्यानंतर जे काही दर निश्चित केले होते त्या इमारतींच्या तपशील हा अ,ब,क,ड अशा विभागामध्ये दिलेला आहे. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रातील विविध भागांमध्ये मालमत्ता कर आकारण्यासाठी भाडेमूल्य निश्चित करण्यासाठी प्रस्तावित जे दर दिलेले आहेत ते एका पानावर दिलेले आहेत तर त्याच्यामध्ये संपूर्ण प्रत्येक प्रभागाच्या म्हणजे जे पाच प्रभाग केलेले आहेत त्या प्रभागामध्ये असलेली प्रत्येक प्रकारची घरे ही असेसमेन्ट सुटणार नाहीत ह्याची दक्षता घेऊ न हे दर निश्चित केलेले आहेत. म्हणजे सन्मा. सदस्यांनी सुरूवातीला विचारले की काही ठिकाणी दर दिलेले नाहीत. परंतु, जे दर दिलेले नव्हते हे १९९९ पूर्वी म्हणजे नगरपालिका काळामध्ये जे मूल्यनिर्धारण समितीने कराचे दर निश्चित केलेले होते त्याच्यामध्ये उदाहरण द्यायचे झाले तर मिरारोड पूर्व, भाईंदर पूर्व आणि पश्चिम ह्या ठिकाणी इमारतीच अ, ब, क, ड मध्ये वर्गीकरण केले होते. परंतु, ठिकाणी दर देताना फक्त आर.सी.सी. चे दर दिलेला आहे त्याच्यानंतर लोडबेरींग, सिमेंट शिटस् व कौलारु घरांचा दर दिलेला नव्हता. माती, विटा, कौलारु, लाकडी पाट्याच्या भिंतीचा दर दिलेला नव्हता. झोपड्या आणि कुडाच्या भिंतीचा दर दिलेला नव्हता. ही जी अपूर्णतः शिल्लक राहीलेली होती आणि एखाद्या वेळेला प्रशासनाकडून ज्यांच्यावरती दर निश्चित केलेले नव्हते तर त्याची आकारणी करताना एखाद्याला जादा दराने वसूल केलेले असतील तर आता जे आपण महानगरपालिकेसमोर हा जो प्रस्ताव आणलेला आहे. त्या प्रस्तावाप्रमाणे जर आपण निर्णय घेतला. हा शेवटचा जो तक्ता दिलेला आहे. शेवटच्या तक्ताप्रमाणे जर आपण आकारणी केली तर कोणावरही कसल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. आणि ज्यांची आकारणी ऑलरेडी जर एखादी समजा झोपडी असेल आणि त्या झोपडीची आकारणी ८० पैशाने झालेली असेल तर त्या प्रभागामध्ये जे निश्चित केलेले दर आहेत किंवा आपण काही जी मंजूरी देणार आहोत. मंजूर दरास मंजूरी देणार आहोत त्या प्रमाणे त्याची असेसमेंट होईल. म्हणजे ह्या बाबतीत कोणावरही अन्याय होणार नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे.......

**धनराज अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, हे जे आता दर चालू आहेत. बिगर रहिवासी दिड पटीने चालू आहेत. १.६० चे २.४० आहेत आणि आपण इकडे तीन केलेले आहेत. रहिवाशीसाठी १.६० आहे आणि बिगर रहिवाशीसाठी २.४० आहे. सध्या चालू रेट आता जे तुम्ही तीन केलेले आहेत. २.४० इथे व्हायला पाहिजेत ना. जे चालू आहेत ते येथे द्यायला पाहिजे ना.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, प्रकरण क्रमांक ५३, मिरारोड, भाईंदर पूर्व, पश्चिम, घोडबंदर, काशिमिरा, पेणकर पाडा, चेणे, वरसावे लगत महामार्गालगत बिगर रहिवासी वापरासाठी, रहिवासी

वापरासाठी आपण जे दर केलेले आहेत त्याच्यामध्ये एक टिप आहे. वाणिज्य व वैद्यकीय वापरासाठी उपलब्ध नमुद रहिवास दराच्या दिड पट दर विचारात घ्यावा. मिरारोड, भाईंदर पूर्व आणि पश्चिम विभागासाठी बिगर रहिवाश्यासाठी तीन रुपये आपण आकारलेले आहेत आणि घोडबंदर, काशिमिरा, पेणकर पाडा आणि हायवे लगतचा जो भाग आहे आज त्या पूर्ण भागामध्ये मोठ-मोठी हॉटेल्स, मोठ-मोठे ढाबे, गेस्ट हाऊस आणि मोठ-मोठी असून ते लाखो रुपये दिवसापाठी कमावत आहेत बिअर बारही असतील, आहेत असे तिथे लाखो रूपये दिवसापाठी ते कमावतात आणि त्याच्यासाठी आपण किती रुपये ठरवले आहेत तर २ रुपये ५० पैसे आज भाईंदर पूर्व विभागात बिगर रहिवाश्यांसाठी, दुकानदारांसाठी जर आपण ३ रुपये लावतो आणि ज्या मोठ्या हॉटेल्स आणि बिअर बार, लॉजिंग बोर्डीगसाठी तिथे दर कमी का करण्यात यावा. तिथे तर दर जास्त लावायला पाहिजे जिथे आपल्याला महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवायचे आहे. तिथे आणखीन काटकसर कशाला करत आहेत? आज महानगरपालिका हे उत्पन्न वाढविते त्यात आपण का काटकसर करता उत्पन्न विभागामध्ये जिथे रिसॉर्ट आहेत तिथे सुद्धा बराचशा पैशांची कमाई आहे. तिथे दिड रुपया का? मा. महापौर मॅडम, या प्रश्नामध्ये आमच्याही काही हरकती मुद्दे आहेत. या तिकडच्या जागेचे जे रहिवासी आहेत. तिथे सुद्धा वाढवा ना. रहिवासी विभागासाठी एक करा. कशाला कमी करतात जास्त करा. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. १९९९ चे प्रकरण तुम्ही बघू नका. गावठण विभाग, आदिवासी पाडे हे वगळून महापालिका काय करते? कोणाला पाठीशी घालते. एका बाजूला बिल्डरर्स लोकांना पाठीशी घालते. एका बाजूला हॉटेल्सवाल्यांना पाठीशी घालते कशासाठी हे? जिथे कमाई आहे तिथे आपण त्यांना कमी करतोय. महानगरपालिकेचे उत्पन्न कमी करतोय आणि नागरिकांवर टॅक्स वाढवतो आहे. जिथे पाहीजे तिथे तुम्ही खेचून घ्या ना.

**अजित पाटील :-**

हायवे लगत जी मोठ मोठी हॉटेल्स आहेत. त्यांना कमी रेट केला आहे. असे आपले म्हणणे आहे परंतु कॉलम नंबर २ बघा त्याच्यामध्ये घोडबंदर, काशिमिरा, चेणा, पेणकर पाडा, वसरावे सर्व महामार्गा लगत ह्याच्यामध्ये हॉटेल्स सगळी येतात. त्यामुळे जो भाईंदरचा रेट आहे ३ रुपये तो तसाच ठेवण्यात आलेला आहे. आणि कॉलम नंबर ३ घोडबंदर, काशिमिरा, मिरारोड, महाजन वाडी, पेणकरपाडा, चेणे, वरसावे सर्व गावठणला ह्याला रेट कमी आहे आणि आपण जे म्हणतात हायवे लगत रेट कमी आहेत. आणि आपण जे म्हणतात हायवेच्या लगत रेट कमी आहेत.

**रतन पाटील :-**

घोडबंदरला हॉटेल्स नाही आहेत का? काशिमिराला हॉटेल्स नाहीत का? पेणकरपाड्याला हॉटेल्स नाही आहेत? आहेत की नाही?

**अजित पाटील :-**

तिथे रेट जास्त आहे भाईंदर सारखाच केलेला आहे. कमी केलेला नाही.

**रतन पाटील :-**

तिथे जास्त रेट लावा ना हे अडीच रुपये कशाला? हे कोणासाठी करत आहात?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील तुम्ही बसुन घ्या.आपली सुचना समजली . आपण बसून घ्या.

**केशव घरतः-**

मा. महापौर मॅडम, हयाच्यात उल्लेख केलेला आहे. घोडबंदर , काशिमिरा, पेणकरपाडा, वरसावे मार्गालगत आणि घोडबंदर , काशिमिरा, महाजनवाडी, पेणकरपाडा, वरसावे हयासाठी जो दर निश्चित केला आहे तो दर आणि राई ,मोर्वा, मुर्धा यासाठी गावठणमध्ये जो दर निश्चित केलेला आहे यात तफावत आहे.

**अजित पाटीलः-**

पेणकरपाडा,चेणे, वरसावे गावठण याच्यामध्ये जे रेट आणि राई, मुर्धाचे रेट मी तुम्हाला वाचुन दाखवित आहे. त्याच्यामध्ये माती, विटा, कौलारु, लाकडी पट्टया ५५ पैसेच आहेत.

**केशव घरतः-**

आमचे म्हणणे तेच आहे की, राई ,मोर्वा मुर्धा , उत्तन तसेच हायवे लगतची जी गावठण भाग आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

गावठणमध्ये (आर.सी.सी.) आहेत त्याच्यामध्ये ८० पैसे दिलेले आहेत (राई, मुर्धा, मोर्वामध्ये) आणि इथे १ रुपया ४० पैसे दिलेले आहेत.

**अजित पाटील :-**

काशिमिरा, घोडबंदर हयाचा जो रेट आहे तो कॉम्पीट ॲथोरिटीने ठरवलेला रेट आहे ना.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये करमुल्यांकनाचा जो विषय या ठिकाणी आलेला आहे. ह्याच्यामध्ये आपण जे मुळ रहिवासी गावठण, आदिवासी पाडे आणि ग्रामिण भाग हया ठिकाणी जे स्ट्रक्चर आजच्या तारखेला आहेत. जो दर लावलेला आहे त्याच्यामध्ये आपण कोणत्याही प्रकारची वाढ आपण करु इच्छित नाही आणि त्याच्या व्यक्तिरीक्त ज्या बाजुला जसे सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की, ग्रामिण भाग सोडुन जर कमर्शियल ज्या ठिकाणी करत असाल त्या ठिकाणी तुमचे वाढीव जे रेट आहेत ते हा

ठराव सन्मा. सदस्य आसिफ शेख वाचत आहेत त्याप्रमाणे आपण या तिन भागामध्ये बिल्कुल रेट वाढवलेले नाहीत. मुर्धा, राई, मोर्वा, खारी, गोडदेव, काशी, गावठण, घोडबंदर , उत्तन, पेणकरपाडा आदी या गावठण ठिकाणी आणि ग्रामिण भागामध्ये आणि माशाचा पाडा हया ठिकाणी जे आदिवासी पाडे आहेत त्या ठिकाणी आपण वाढ प्रस्तावित करत नाहीत आणि ज्या ठिकाणी उदाहरणार्थ (फाऊंटन हॉटेल) घोडबंदरच्या बाजुला आहे. उत्तन मध्ये एखादा मोठा रिसॉर्ट आहे. त्यामध्ये कमर्शियल रेट वाढविले तर हरकत नाही. पण जे मुळ रहिवासी त्याठिकाणी राहतात आणि त्यांनी जर आपले घर दुरुस्त किंवा रिपेरिंग केले तर त्याला कोणत्याही प्रकारचे रेट वाढवता कामा नये अशा प्रकारची सुचना आम्ही मांडत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला कायदेशीर रेट कमी करायचा अधिकार आहे का? तुमचा टाईम ऑफ स्ट्रक्चर बदलला. तुमच्या कायदयात तरतुद आहे. मॅडम, कायदयाच पुस्तक मागवून बघा. हयावर मा. आयुक्त साहेब आपली टिपणी आम्हाला पाहिजे. जर माझ्या राहत्या घराचा टाईप ऑफ स्ट्रक्चर बदलला तर त्याचा रेट तोच राहणार आहे का? ह्या बाबतीमध्ये आपल्या अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे. ती तुमच्या कायद्यात तरतुद आहे. मी तुम्हाला कळवले पाहिजे की, मी पूर्वी कौलारु घरात राहत होतो आता माझे आर.सी.सी. झालेलं आहे आणि माझ्या पत्रानंतर तुम्ही दर नक्की करायचा आहे. आम्ही ज्या सुचना दिल्या होत्या त्याचे काय झालं? उद्या माझ्या तळमजल्याच्या घराचे चार माळ्याची बिल्डिंग बांधली.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, प्रकरण क्र. ५३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ताच्या कर आकारणीसाठी कर योग्य मुल्य ठरवण्यासाठी भाडेमूल्याचे मंजूरी मिळविण्यासाठी.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख माईक चालू नाही. पुन्हा सुरुवातीपासून वाचा. आणि सर्वांना ऐकायला जाईल असे वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

गुपचूप हळूहळू वाचू नका.

**आसिफ शेख :-**

सभागृहात सगळ्यांनी शांतता पाळली तर सगळ्यांना ऐकायला येईल.

**मोहन पाटील :-**

मा. सचिवजी, माझ्या सुचनेमध्ये चौक गावाच्या नावाचा समावेश करावा.

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी आपल्या मिराभाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी, उत्तन, चौक, पाली, त्याचप्रमाणे घोडबंदर, काशी, महाजनवाडी, पेणकरपाडा, चेना, वरसावे या परिसरातील जे जुने रहिवासी आहेत जे गावठण परिसरात राहतात. आदिवासी पाड्यात राहतात, ग्रामीण भागात राहतात. तर अशा ठिकाणी अशा विभागात जे आर.सी.सी. सहीत जे रहिवास भाग आहे त्या रहिवास भागांना आपण आदिवासी पाडे आले त्यामध्ये ग्रामीण व गावठण भागातील सर्व म्हणजे मुर्धा, राई, मोर्वा, चेना, पाली, डोंगरी चौक, महाजनवाडी, नवघर सर्व भाग सर्व गावठण भाग आर.सी.सी. सहीत अशा रहिवास इमारतींवर मालमत्तांवर ८० पैसे प्रमाणे कर आकारणी करण्यात यावी. करयोग्य मूल्य ठरविण्यात यावे. त्याचप्रमाणे जे मोठ-मोठे रिसॉर्ट आहेत, मोठ-मोठी हॉटेल्स आहेत, शॉपिंग मॉल्स आहेत, शॉपिंग सेंटर आहेत, बिगर रहिवासी इमारती आहेत. त्या बिगर रहिवासी इमारतींना ४ रुपये कर योग्य मूल्य ठरविण्यात यावे. असे मी या ठिकाणी ठराव मांडत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रकातील दर ह्या ठिकाणी सादर केलेले आहेत त्यामध्ये आपण म्हटलेले आहे सदरच्या दरामध्ये दरवर्षी ५ टक्के दरवाढ करण्यात यावी तर ५ टक्के प्रमाणे प्रत्येक वर्षी २ टक्के याप्रमाणे दरवर्षी वाढ करण्यास ही सभा समर्थन देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही सुचविलेल्या सुचनांचा उल्लेख या ठरावात कुठेही आलेला नाही. परत एकदा सांगतो आमचे या ठरावाला ऑब्जेक्शन आहे. आर्थिक बाजू आहे ह्याच्यामध्ये कोणीही सत्ताधिकाऱ्यांनी त्याच्या मनानुसार ठराव पास करू नये. मा. महापौर मॅडम, तुम्ही आर्थिक डेप्रीशिएट कराल आणि त्यामध्ये आम्ही ज्या सुचना मांडल्या आहेत त्या आर्थिक हिताच्या आहेत. त्याबद्दल मा. महापौर मॅडम आपण निकाल द्यावा. मी महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या बद्दल बोलत आहे आणि नियमानुसार बोललेले आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही सुद्धा मांडलेल्या सुचनांचा विचार करा. त्या सुचना या ठरावामध्ये घ्याव्यात.

**मिलन म्हात्रे :-**

त्या सुचनांचे काय झाल ते बोला कारण मला आजचे एक पत्र आले आहे. मा. आयुक्त साहेबांचे उत्तर आलेले आहे की, तुम्ही सभागृहात ज्या सुचना करता त्या सुचना आम्ही त्या ठरावामध्ये इनक्लूड करतोय पण ते इनक्लूड होत नाही. झालेले ठराव आणि प्रोसिडींग तफावत हे घेऊन मी मा. आयुक्तांना नंतर भेटणार आहे. हे मा. आयुक्ताचं खोटं उत्तर आले आहे. खोटं उत्तर आहे.

**मा. महापौर :-**

ठराव क्र. ५३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कर आकारणीसाठी कर योग्य मूल्य ठरविण्यासाठी भाडे मूल्याची वाजवी दरास मंजूरी मिळवण्यासाठी ठराव सुचक सन्मा. सदस्य आसिफ शेख व अनुमोदक सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये त्यांनी सुचवलेला बदल जो ग्रामीण भागात राई, मुर्धा, मोर्वा, डोंगरी, चौक आणि मोर्वा यासाठी ८० पैसे तर लोडबेरींग, शेडींगसाठी ६५ पैसे, माती, विटा, कौलारु साठी....

**मोहन पाटील :-**

गाव सगळी येतील ना.

**रतन पाटील :-**

उत्तनसाठी  किती येतील? उत्तनला आर.सी.सी. ला किती?

**मोहन पाटील :-**

राई, मुर्धा, मोर्वा, घोडबंदर, खारी, गोडदेव, काशीगाव, पेणकरपाडा, उत्तन, चौक ही सगळी गाव येतील.

**परशुराम पाटील :-**

सगळी गाव येतील.

**सुर्यकांत भोईर :-**

आदिवासी पाडे, मिरारोड, भाईंदरची गावठण

**रतन पाटील :-**

पुर्ण गावठाण पाहिजे. उत्तन गाव सोडून उत्तन गावाच्या बाहेर आर.सी.सी. ला सगळा रेट लावावा.

**मा. महापौर :-**

राई, मुर्धा, डोंगरी, चौक आणि मोर्वा, घोडबंदर, काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, चेणा, वरसावा.

**जयंत पाटील :-**

खारीगांव सोडून.

**रतन पाटील :-**

खारीगाव नको, गावठण आहे.

**मा. आयुक्त :-**

एक गोष्ट लक्षात घ्या की, गावठाणचा एरिया आपण जरी म्हणत असलात तरी त्या गावठण एरियामध्ये या कॅटेगिरीची घरे असतील. त्याच्यामध्ये आर.सी.सी. असेल त्याच्यामध्ये लोडबेअरींग असेल, त्याच्यामध्ये माती, विटा, कौलारू घरे असतील, भिंती असतील, झोपड्या असतील सगळ्यांना एकच दर लावायचा?

**मोहन पाटील :-**

गावठण, जे मूळ रहिवासी आहेत त्यांना.

**मा. आयुक्त :-**

माझे म्हणणे गावठणामध्ये आपण म्हणता त्याप्रमाणे या चार प्रकारची घरे असतील ना, की नाही आहेत. जर या चार प्रकारची घरे असतील तर प्रत्येक कॅटेगिरीला वेगळा दर लागला पाहिजे ना.

**मोहन पाटील :-**

समजा राईला कौलारु घर आहेत, जर राईला घर बांधणार, मुर्धाल्याही घर बांधणार, घोडबंदरलाही घरं बांधणार. त्या पद्धतीने येणार ते येणार ना. ज्या पद्धतीने आपण हेड ठरवू त्या पद्धतीने येणार ना. गावठणामध्ये. आम्ही काय म्हणालो, इतर भाग नाही. खारीगावमध्ये गावठण बोललात तर ५० ते ६० घरं खारीगावात गावठाणमध्ये आहेत. फक्त ५०-६० घर. त्या ५०-६० घरांसाठी जो रेट आहे तो वेगवेगळा रेट येत आहे आणि त्याच्या बाहेर जो तुमचा सात-बारा उतारा जी जमिन आहे त्यांना वेगळा रेट.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु, माझ त्यावर म्हणणे असे आहे की आपण म्हणतात की गावठाण एरिया मध्ये जी काही घरे असतील त्या घरांना एकच दर लावावा. परंतु, जी काही गावठण मध्ये घरं असतील त्याच्यामध्ये सुद्धा क्रायटेरिया असेल ना.

**मोहन पाटील :-**

क्रायटेरिया आहे ना.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये आर.सी.सी. असेल, कौलारु असतील, पत्र्याची घरं असतील.

**मोहन पाटील :-**

म्हणजे आता जो रेट आपण कौलारु घराला ठेवलेला आहे आणि समजा जर कौलारु घर तोडण्यात आली आणि आपण राई-मुर्ध्याला लावलेला तोच रेट त्याला सम आकारणी होईल. वापरत असताना आकारणी होईल. जे गावठण भागामध्ये आहेत. त्यांना सम आकारणी होईल.

**मा. आयुक्त :-**

आपल्यांना असे म्हणायचे आहे की, दर प्रस्तावित केलेले आहेत हे दर जो जो गावठाण विभाग आहे त्या गावठाणच्या एरियाला सगळ्यांना सारखे करावेत.

**मोहन पाटील :-**

सारखे करावेत.

**मा. आयुक्त :-**

असे आपले म्हणणे आहे का?

**मोहन पाटील :-**

होय, असे म्हणणे आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे. आपण ज्या पद्धतीने टॅक्स आकारला त्या पद्धतीने गावठण मध्ये कोणता आर.सी.सी. आहे, कौलारु आहे असा सर्व्हे करुनच आपण आकारणी करा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, गावठणमध्ये जी घर आहेत त्यांना सर्व ठिकाणी समान दर लागतील. मग ज्यांनी आर.सी.सी. काम केलेले असतील तर आर.सी.सी. चा रेट जो उत्तनला तोच भाईंदरला असावा.

**रतन पाटील :-**

सर्व समान असावा. मिराभाईंदर मध्ये आर.सी.सी. चा रेट सर्वांना समान असावा अशी मागणी करतो.

**मोहन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. आता तुमचे घरे पडायला आल्यानंतर तुम्ही....

**रतन पाटील :-**

साहेब, तसे बोलत नाही. आता नविन बद्दल बोलत आहे. मिरा भाईंदर मध्ये जे आर.सी.सी. काम होतील त्यांचा रेट समान असावा.

**रिटा शाहः-**

साहेब, मी दोन मिनीटे बोलते नंतर तुम्ही जवाब द्या. मी तेच विचारते की आता आपण बोलले गावठण मध्ये क्रायटेरिया तुम्ही फिक्स करणार की, आर.सी.सी. जो घर असेल, बंगला असेल, बिल्डिंग असेल आणि कौलारु किंवा झोपडे असेल त्यांना सेम रेट मग शहरामध्ये आर.सी.सी. असेल, झोपडी असेल, कौलारु असेल मग त्यांना कुठला रेट लावणार शहरातील जनतेने काय चुक केली आहे?

**मा. आयुक्त :-**

त्याच्या बद्दलचा खुलासा करत आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. सभागृहाला माझी विनंती आहे. ह्या ठिकाणी चांगल्या सजेशन ह्या करमूल्य निर्धारीत करण्यासाठी तुम्हाला युनिट रेट निश्चित करायचे आहेत त्यासाठी इथे आलेले आहेत. आपल्या सर्वांचे मांडलेले विचार लक्षात घेता पुर्ण शहर पातळीवर शहरामध्ये जितकी गावठण डेव्हलप विकासामध्ये घर आहेत तर त्यासाठी सर्व गावठाणसाठी, आर.सी.सी. साठी एक दर म्हणजे जो अ,ब,क,ड करायला पाहिजे मग गावठण एरिया पुर्ण शहरातील वेफगत झाल्यानंतर गावठाण बाहेरचे जे रहीवास क्षेत्र आहे पुर्ण शहरामध्ये त्याच्यासाठी अ,ब,क,ड करायचे आणि पुर्ण शहरामध्ये गावठाण आणि गावठण बाहेरील रहीवास अ,ब,क,ड झाल्यानंतर जे कर्मशियल असेल पूर्ण शहरात त्याच्यामध्ये अ,ब,क,ड करायचे आहे हे तीन कॅटेगिरी केले तर सम-समान टॅक्स आपल्याला लागेल. आपल्या सर्वांच्या सुचना विचारात घेता हे धोरण निश्चित करणे योग्य राहिलं.

**परशुराम पाटील :-**

साहेब, सर्व्हे करणे जरुरीचे आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, माझी एक सुचना आहे. आपलं सिटी सर्व्हेच काम चालू आहे ते किती पर्यंत झालेले आहे. मिरा-भाईंदर गावठण विभागातील सिटी सर्व्हेच काम चालू केलेले आहे. मा. आयुक्त साहेब आपण सिटी सर्व्हे चालू केले आहेत ते कितीपर्यंत झालेले आहे. मा. आयुक्त साहेब विषय आहे सिटी सर्व्हेचा. सिटी सर्व्हेचा नंबर मिळाला नाही तर गावठाण भागात घरं बांधु शकत नाही ही आपली राय आहे. मी तेच विचारतो कुठपर्यंत आले आहे हे सगळं मी जेव्हा सभागृहात आलो तेव्हाच हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम....

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जी....

**याकुब कुरेशी :-**

हा विषय नाही आहे.

**रतन पाटील :-**

गावठाण विभागामध्ये जो सिटीसर्व्हे आयोजित केलेला आहे. तो कुठपर्यंत आलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

हा विषय नाही तर का घेतात.

**रतन पाटील :-**

गावठण विभागाचा सिटी सर्व्हे हा काही विभागाचा झालेला नाही काही भागाचा बाकी आहे त्याचे काम कुठपर्यंत झालेले आहे. होणार आहे की, बाकी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सिटी सर्व्हेचे काम चालू आहे.

**रतन पाटील :-**

चालू आहे.

**याकुब कुरेशी :-**

दुसरा विषय आहे. विषयांतर का करता उगाच?

**मा. महापौर :-**

विषय सर्वांनुमते मंजूर, सचिव पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ज्या सुचना सांगितलेल्या आहेत त्याचे काय झाले? त्या ठरावात ते अंतर्भुत नाही. मा. आयुक्त साहेबांनी तुम्हाला परत एकदा सुचना केली ह्या आर्थिक घडामोडी आहेत म्हणून सांगतोय मॅडम. तुम्ही जे रुलिंग देत आहात ते परिपूर्ण द्या. आम्ही नगरपालिकेच्या लॉसचं बोलत नाही. आमच्या सुचना तुम्ही ठरावामध्ये ॲड केल्या किंवा नाही?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम....

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश जी....

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, चार बरस के बाद कर संबंधी कोई प्रस्ताव आया है इसलिए सन्मा सदस्य अजित पाटील अभिनंदन के पात्र है।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्याला तुम्ही कुठल्या दराने आकारणी कराल ते पण तुम्ही दिलेले नाही. ठरावात सुद्धा नाही, टिपणीतही नाही. इंडस्ट्रीज, कमर्शियल अलग, कमर्शियल दुकान, हॉटेल्स, बिअर बार, डान्स बार सब तुम्हारे

**रोहीत सुवर्णा :-**

कुछ समझने मे नही आता है।

**आसिफ शेख :-**

एक रहिवास आणि दुसरा बिगर रहिवास

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये त्याचा उल्लेख आहे.

**आसिफ शेख :-**

बिगर रहिवास मधला तुम्ही काहीच आणत नाही. बिअर बार आणा, इंडस्ट्री आणा, आणि काही आणा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझी ह्यामध्ये एक सुचना आहे. विषय पत्रिकेवर जर विषय आणला प्रस्ताविक दर त्याच्यामध्ये इंडस्ट्रिज होणे गरजेचे आहे. फक्त रेसिडेन्शीयल आणि नॉनरेसिडेन्शीयल बोलून चालत नाही. आपण जेव्हा कर आकारणी करतो तेव्हा इंडस्ट्रिजला वेगळे करतो, वाणिज्य वेगळे करतो आणि रेसिडेन्शीयल वेगळे करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, करमूल्य निर्धारण अधिकारी जे आहेत त्याच्याकडून आपण इंडस्ट्रिजचा रेट मागवला पाहिजे. ही नोंद करुन घ्या. ह्यामध्ये जी कमतरता आहे. वाणिज्य शिर्षाखाली वाणिज्य आणि औद्योगिक....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, मा. महापौर साहेबा आणि मा. आयुक्तांनी जरा लक्ष द्यावे. मा. आयुक्त साहेब....

**मिलन पाटील :-**

सन्मा. नगरसेविका जिवी हिरावाडे ह्या आज बोलायला उभ्या आहेत. त्यांना बोलू द्या त्यांचा मा. महासभेमध्ये प्रस्ताव आहे. तो पास करावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम, आता आपण घोडबंदर, काशीमिरा, मिरा, पेणकर पाडा, चेणे, वरसावा येथील टॅक्स बाबत चर्चा केली आणि गावठाण ग्रामिण भागामध्ये टॅक्सचा दर आपण निश्चित केलेला आहे. परंतु, काशिमिरा क्षेत्रामध्ये असे बरेचसे आदिवासी पाडे आहेत जसे माश्याचा पाडा, डाचकुलपाडा, भटाचा पाडा, मांडवीपाडा, मस्करपाडा, आणि वेलकर पाडा अशा ठिकाणी आर.सी.सी. रेट आता सध्या लावलेला आहे. बाभळीची भाट, बाभळीची भाट नंबर २ या ठिकाणी त्यांच्या घरांना आर.सी.सी. रेट आता लावलेला आहे. पण त्यांची घर जी आहेत. माती, विटा, कौलारु, लाकडी, कुडाची अशी घरे आहेत. परंतु, याबाबत मी स्वतः महानगरपालिकेमध्ये पत्रव्यवहार केला होता. अधिकाऱ्यांशी चर्चाही केली. परंतु, मला याबाबत सविस्तर असे उत्तर देण्यात आलेले नाही. याबाबत विचार करु आणि विषय मा. महासभेत घेतला जाईल. अशा प्रकारचे उत्तर मला संबंधित अधिकाऱ्यांनी दिले. ह्यामध्ये अधिकाऱ्यांची स्वतः चुकी आहे, की अधिकाऱ्यांनी जागेवर बसून हा टॅक्स लावलेला आहे. प्रत्यक्ष जागेवर मातीची आणि कुडाची घरे असताना तुम्ही आर.सी.सी. रेट लावलाच कसा? आज त्या आदिवासी लोकांना १० ते १५ हजार रुपये टॅक्स भरावा लागत आहे. परंतु, त्यांच्याकडे तेवढे पैसेच नाही की, ते आपल्या महानगरपालिकेचा टॅक्स भरू शकतील. मग, अशा वेळेला त्यांच्याकडे जर उत्पन्नाचे साधनच नाही तर ते आपल्या पालिकेचा टॅक्स कसा भरतील? जंगलामध्ये लाकडे गोळा करुन किंवा तुम्हाला सर्वांना माहीत आहे की, आदिवासी लोक दारुचे व्यवसाय करतात आणि ते जंगलामधून लाकडे गोळा करुन पैसे कमवायचे त्यामुळे त्यांना महापालिकेचा एवढा टॅक्स भरता येत नाही. तर अशा प्रकारे पुणे महानगरपालिकेने आदिवासी लोकांसाठी टॅक्स माफ केलेला आहे. जर आपल्या पालिकेमार्फत अशा प्रकारची सुविधा आदिवासी लोकांना खास करुन जे आदिवासी समाजाचे आहेत आणि ज्यांचे उत्पन्नाचं स्त्रोत नाही. अशा लोकांना आपण आपल्या महानगरपालिके मार्फत जर टॅक्स माफ केला तर मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा एक वेगळा दर्जा आणि एक वेगळ्या प्रकारचे नाव गणले जाईल असे मला इथे वाटते आणि आपल्या या महानगरपालिकेमध्ये आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौ. जिवी वाडे यांचे म्हणणे ही तेच आहे आणि त्याही दोन शब्द त्या विषयावर बोलू इच्छितात.

**मिलन म्हात्रे :-**

मंडळ आयोगामुळे तुम्हाला हे पद मिळालेले आहे, आपण बोला.

**जिवी हिरावाडे :-**

मा. महापौरांच्या मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की आदिवासी पाड्यांना कर माफ करावे.

**मोहन पाटील :-**

पुणे महानगरपालिकेप्रमाणे जे कर माफ केले त्या पद्धतीने आपण ही त्यांचे कर माफ करायला पाहिजे. परंतु, मिनीमम तुम्ही जे ३५ पैसे दाखवले आहेत तर ५ टक्के दाखवताना ॲसेसमेंटला त्या रेकॉर्डला त्यांना ठेवता येईल. कमीत कमी ५ टक्के त्यांना करावे करुन म्हणजे ३५ पैसे दाखविले आहेत. ५ पैशांनी आकारणी करावी आणि ॲसेसमेंटला आपल्या रेकॉर्डला ठेवता येईल. एवढी माझी सुचना आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, या ठिकाणी प्रकरण क्र. ५३....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आज या ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, मा. महापौर मॅडम आणि अधिकारी वर्ग उपस्थित आहे तर मा. महापौर मॅडम, आपण कृपया, सदरच्या विषयावर रूलिंग दिली तर आम्हाला कळेल की आपला निर्णय काय आहे?

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा, सदस्य ज्योत्स्ना हसनाळे मॅडम यांनी जो माशाचा पाडा, डाचकुलपाडा ह्या विभागातील संपूर्ण आदिवासी पाड्यांचा उल्लेख केलेला आहे. परंतु, चेणे, वरसावे, काजूपाडा, पाटीलपाडा केसरी पाडा येथेही आदिवासी लोक राहतात. या आदिवासी लोकांनाही समाविष्ट करण्यात यावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सगळी आदिवासी समाजाची लोक...

**मा. महापौर :-**

मिरा-भाईंदर शहरामध्ये चेणा, वरसावे, काजूपाडा, माशाचा पाडा, भटाचा पाडा या ठिकाणी जे आदिवासी पाडे आहेत ज्या ठिकाणी मिरा गावात असणारा आदिवासी पाडा....

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे की, मिरा भाईंदरमध्ये जेवढे आदीवासी लोक असतील तेवढ्याचा टॅक्स समान असावा.

**मिलन म्हात्रे :-**

जातीचा दाखला घेऊन.

**मा. महापौर :-**

मिराभाईंदर शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी आदिवासी पाडे असतील त्या ठिकाणी सर्व आदिवासींना करमध्ये सवलत देउन त्यांना ५ टक्के आदिवासी टॅक्स लागु करण्यात येईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, आजच्या या मा. महासभेमध्ये टॅक्सवर जो निर्णय घेण्यात आला आणि या विषयावर आदिवासी समाजाच्या नागरिकांसाठी आपण....

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ५ पैशाचा उल्लेख करा. ५ न करता ५ पैशाचा उल्लेख करा.

**आसिफ शेख :-**

५ पैसे देखील कशाला पाहिजे? आपण काहीच कर लावू नका.

**मिलन पाटील:-**

मा. महापौर मॅडम, ५ पैशाचा उल्लेख करा. आपण टक्क्याचा उल्लेख केलेला आहे तर ५ पैशाचा उल्लेख करा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आता टॅक्स विषयी आदिवासी पाड्यांबद्दल जी चर्चा झाली आहे. तर त्याच पद्धतीने त्यांची घरे कौलारु नसुन काही झोपड्या आहेत त्याच पद्धतीने आपण त्यांना ५ टक्के टॅक्स ठरवणार आहोत तर मला वाटते तोंडी आश्वासन देण्यापेक्षा आयुक्त साहेब, आपण हे ठरावात घेणे योग्य होईल. कारण हा विषय ठरावामध्ये घ्यायला लागेल. ठरावामध्ये जसे नमुद केलं आहे तसे आपण त्यामध्ये नमुद करुन घ्यावे नाहीतर, आपल्याला पुढे ऑडीटला भाग पडेल. हा ठराव वेगळा करायला लागेल.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर, मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आपण आदिवासांचा प्रश्न घेउन आपण जो ठराव पास केलेला आहे. त्याबद्दल मा. महापौरांचे आणि मा. आयुक्तांचे मी अभिनंदन करीत आहे. त्याचप्रमाणे जे बाजार वसुली करतात त्यामध्ये या डिकोनास्ट्रीटला जे गरीब आदिवासी बेल घेउन येतात, फळे घेउन येतात. जंगलातील जी छोटी फळे वगैरे असतात ती घेउन येतात. लाकडे घेउन येतात. त्यांच्याकडून सुद्धा बाजार फी आदीवास्यांकडून वसुल केली जाते. मी कित्येक वेळा कंम्प्लेट केलेली आहे. पोलिस स्टेशनला सुद्धा मी कंम्प्लेटं केलेली आहे की महानगरपालिकेच्या अटिशर्ती मध्ये असा उल्लेख आहे की, कोणत्याही आदीवाश्याकडून कोणत्याही प्रकारच्या टॅक्स, बाजार फी वसुल केली जाणार नाही. असे असताना सुद्धा आपले जे बाजार टेंडर धारक आहेत ते बाजार फी या आदीवाश्यांकडून वसुल करतात. मी त्या वेळेला त्यांची कंम्प्लेट पोलिस स्टेशनला केलेली आहे तरी आपण सुद्धा आदेश द्यावा की, कोणीही आदिवासी लोकांकडून फी वसुल करता कामा नये.

**रतन पाटील :-**

ह्याचा अर्थ असा की, आपला वचक नाही.

**मिलन पाटील :-**

नाहीतर, आम्ही कायदेशीर कार्यवाही करु.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, हा जो ठराव पारित झाला आणि आदिवासींची मागणी मागितली त्याचप्रमाणे आपण सर्वांनी सर्व नगरसेवकांनी, मा. महापौर मॅडम आणि मा. आयुक्त साहेबांनी तसेच अधिकारी वर्गाने येथे ५ टक्के दराप्रमाणे आदिवासींना जो कर लागु केलेला आहे आणि हा नियम पुढे असाच चालू रहावा. ज्यांची घरे माती, विटा, कौलारु, लाकडी, पाट्यांच्या भिंतीची, कुडाची असतील अशा आदिवासी लोकांच्या घरांना हा नियम लागू करावा असे मी निवेदन करुन आपणा सर्वांना धन्यवाद देते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख ठराव वाचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी आपले आणि मा. आयुक्तांचे अभिनंदन केलेले आहे. पण असे प्रस्ताव करविभागाकडून पहिल्यांदा असे दोन प्रस्ताव वेगवेगळे असे दोन प्रस्ताव

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने आलेले आहेत. त्याबद्दल आता नेमणुक केलेले अधिकारी सन्मा. अजित पाटील त्यांच्याही अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ५३ चा सभागृहासमोर ठराव मांडला. सन्मा. सदस्य विरोधी पक्ष नेते परशुरामजी पाटील यांनी या ठरावाला अनुमोदन दिलेले आहे. आपण या ठिकाणी जो भाडेमूल्य निश्चित करत आहोत जे प्रस्ताविक दर प्रशासनाकडून सर्व सन्मा. सदस्यांनी सभागृहात देण्यात आले आहेत आपण या ठिकाणी तीन विभाग क्लासिफिकेशन केलेलं आहे. पहिले वर्गीकरण करताना एक आदिवासी ग्रामीण व गावठण परिसर असे केलेलं आहे. दुसरे शहरीभाग आणि निवासी परिसर असा केलेला आहे आणि तिसरे शहरी, बिगर निवासी आणि औद्योगिक असे तीन विभागामध्ये क्लासिफिकेशन केलेले आहेत. तर पहिल्यामध्ये आपण आदिवासी ग्रामीण, गावठण परिसर असे नमुद केलेला आहे. त्यामध्ये क्लासिफिकेशन करताना (अ)-आर.सी.सी, दुसरे (ब)-लोडबेअरिंग, सिमेंट, शिटस् व कौलारु नंतर (क)- माती, विटा, कौलारु, लाकडी पाट्यांच्या आणि (ड)- भिंती, झोपडी कुडाच्या भिंती अशाप्रमाणे आपण केलेलं आहे. तर आदिवासी ग्रामीण व गावठाण विभाग (अ)-अ म्हणजे आर.सी.सी. त्यासाठी ८० पैसे दराने आपण दर निश्चित केलेला आहे. त्याप्रमाणे (ब)- लोडबेअरिंग सिमेंट शिट्स आणि कौलारु यासाठी ६५ पैसे या प्रमाणे दर निश्चित केलेला आहे. (क)- माती, विटा व कौलारु, लाकडी पाट्याच्या यासाठी ५५ पैसे आणि (ड)- भिंती, झोपड्या, कुडाच्या भिंती यासाठी ३५ पैशाच्या ५ टक्के प्रमाणे असे आदिवासी भागाकरिता दर निश्चित करण्यात आलेत. नंतर आपण शहरी भागासाठी आणि निवासी परिसर यासाठी अ- आर.सी.सी. साठी आपण १ रुपया ६० पैसे दर निश्चित केलेला आहे. त्याचप्रमाणे लोड बेअरिंग, सिमेंट शिट्स व कौलारु यासाठी १ रुपया ४० पैसे. नंतर माती, विटा, कौलारु, लाकडी पाटयांच्या, झोपडी, कुडाच्या भिंती यासाठी ४० पैसे, त्याचप्रमाणे तिसऱ्याचे वर्गीकरण आपण केले आहे, शहरीभाग आणि बिगर निवासी आणि औद्योगिक यासाठी अ, ब, क, ड सरसकट ४ रुपये दर निश्चित करण्यात आलेला आहे. याप्रमाणे आम्ही या ठिकाणी प्रस्ताव ठेवलेला आहे. ठराव ठेवलेला आहे. अनुमोदन सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी दिलेले आहे. सुचक मी आहे. मॅडम, ठराव आम्ही आपल्यापुढे सादर करित आहोत.

**मोहन पाटील :-**

३५ पैशाच्या ५ टक्के प्रमाणे १ रुपया ७५ पैसे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदय, आपण वार्षिक १ रुपया नाममात्र केले तर काय बिघडेल? सरकारी जसे एक रुपया नाममात्र असते तर काय बिघडेल? १ रुपया वर्षाला ठेवा.

**मोहन पाटील :-**

३५ पैसे आहे ना.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, ५ पैसे घ्यावे.

**शरद पाटील :-**

मग वर्षाला १ रुपया घ्या ना.

**मोहन पाटील :-**

३५ पैशाला ५ टक्के प्रमाणे, पावणे दोन पैसे होतात. ३५ पैशाला ५ टक्के प्रमाणे पावणे दोन पैसे होतात तर किती होतात हे आपण ठरवा. त्यांना आपल्याला पूर्ण लाभ द्यायचा होता. परंतु, त्यांचे आर.सी.सी. मध्ये नाव आलं पाहिजे, त्याची आठवण पडेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या सुचनांचे काय झाले? आमची सुचना ॲड केली का? मा. आयुक्त साहेब, या सगळ्या चर्चेमध्ये महत्त्वाची सुचना बाजूला पडलेली आहे टाईप ऑफ स्ट्रक्चर जो बदलला आहे अशा शेकडो केसेस, हजारो केसेस आहेत. त्याचे व्हॅल्यूएशन झालेलं नाही आणि त्याचे हाउस टॅक्स सुद्धा वाढलेले नाही. तो आहे तिथेच आहे. त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

टाइप ऑफ स्ट्रक्चर मध्ये जर बदल झाला तर त्याप्रमाणामध्ये जे काही दर आपण आता प्रस्तावित केलेले आहे. त्या दराप्रमाणेच ॲसेसमेंट होईल.

**मिलन म्हात्रे :-**

हे आपल्या रुलिंगमध्ये आलं पाहिजे ना. ठरावात काहीच नाही. मी जी सुचना केली तरी ती सुचना ठरावात नाही. त्यांनी जो ठराव वाचला तो आम्ही ऐकला. आम्ही ज्या सुचना दिल्या आहेत. त्या ठरावात अंतर्भूत नाही, गेल्या चार-चार, पाच-पाच वर्षापासून महापालिकेची आर्थिक फसवणूक चालली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपली उपसुचना नमुद करण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावामध्ये ती सुचना अंतर्भूत केली का?

**मा. महापौरः-**

होय, सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे की, जे गरिब बिचारे धंदे करायला बसलेले असतात, त्यांच्याकडून ती पावती देऊन दहा रुपये, वीस रुपये फी वसूल करतात ते बरोबर आहे. पण बिचारे सायकलवाले आज सायकलवरुन कपडे विकतात सायकलीवर, टोपली घेउन पेरू विकतात, केळी विकतात त्यांच्याकडून ही पैसे घेतात हे बरोबर आहे का?

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय नाही. उगाच विषयांतर करु नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपल्या विषयाची नोंद घेतलेली आहे. याबाबत आयुक्त साहेबांबरोबर चर्चा झालेली आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी भाडे मूल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४३ :-**

महानगरपालिका हद्दीतील इमारतींना व मालमत्तेला मालमत्ता अधिकार कराच्या आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर निश्चित करून करयोग्य मुल्य ठरविण्याची तरतुद महानगरपालिका अधिनियमात आहे.

महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी तात्कालीन नगरपालिकेमध्ये ''महानगरपालिका अधिनियम १९६५'' मधील तरतुदीनुसार प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराच्या कर आकारणीसाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरवून देण्याचे अधिकार नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग ह्यांना होते. त्या अधिनियमातील तरतुदीनुसार नगरपालिकेच्या मालमत्तेला कर आकारणी मा. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे ह्यांचे पत्र क्र.प्रा.मु./मिभानपा/कर आकारणी ९९ सननर-ठाणे/२४२८, दि. १४/१०/१९९९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार केली जात आहे. सदरहू ठरवून दिलेले दर हे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील आहेत, त्याच दरानुसार महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत भाडे मुल्य निश्चित केले जात आहे.

शहरातील इमारती / मालमत्तांची खालीलप्रमाणे वर्गवारी दर निश्चित करताना विचारात घेतली जात असते.

अ- आर.सी.सी.

ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू

क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती

ड- झोपडी, कुंडाच्या भिंती

अशी वर्गवारी असताना काही विभागामध्ये वरील वर्गवारीपैकी काही वर्गवारीच्या मालमत्तांना मा. सहा. संचालक नगररचना, ठाणे यांनी कर आकारणीचे दर निश्चित केलेले नसल्याने अडचणीचे होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रकारच्या मालमत्ता विचारात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या कर आकारणीसाठी सोबतच्या तक्त्याप्रमाणे भाडे मुल्याचे वाजवी दर प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत.

**महानगरपालिका क्षेत्रातील विविध विभागामध्ये (मालमत्ता कर आकारणीसाठी) भाडेमुल्य निश्चित करण्यासाठी ठरविलेले दर**

| अ.क्र | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रति चौरस फुट भाडे | |
|---|---|---|---|---|
| | | | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मिरारोड (पुर्व)<br>भाईदर (पुर्व व पश्चिम) | अ- आर.सी.सी.<br>ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू<br>क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | १.६० पैसे<br>१.४० पैसे<br>०.७० पैसे<br>०.४० पैसे | ३.०० पैसे<br>२.५० पैसे<br>१.५० पैसे<br>--- |

| अ.क्र | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रति चौरस फुट भाडे | |
|---|---|---|---|---|
| | | | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २. | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, चेणे वार्सोवा सर्व महामार्गालगत | अ- आर.सी.सी.<br>ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू<br>क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | १.६० पैसे<br>१.२० पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३५ पैसे | ३.०० पैसे<br>२.०० पैसे<br>१.०० पैसे<br>--- |
| ३. | घोडबंदर काशिमिरा, मिरा, महाजन पेणकरपाडा, चेणे वार्सोवा सर्व गावठाण | अ- आर.सी.सी.<br>ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू<br>क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | १.४० पैसे<br>१.२० पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३५ पैसे | २.८० पैसे<br>२.४० पैसे<br>१.०० पैसे<br>--- |
| ४. | उत्तन | अ- आर.सी.सी.<br>ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू<br>क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | ०.८५ पैसे<br>०.६५ पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३२ पैसे | १.५० पैसे<br>१.२० पैसे<br>०.८० पैसे<br>--- |
| ५. | राई, मुर्धे, डोंगरी चौकी, मारेबा | अ- आर.सी.सी.<br>ब- लोड बेअरींग/सिमेंट शिट्स व कौलारू<br>क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | ०.८५ पैसे<br>०.६५ पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३२ पैसे | १.५० पैसे<br>१.२० पैसे<br>०.८० पैसे<br>--- |
| ६. | काजूपाडा, चेणे वर्सोवा, माशाचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजन वाडी, घोडबंदर, आदिवासी कुटुंबे. | क- माती विटा कौलारू लाकडी पाट्याच्या भिंती<br>ड- झोपडी, कुंडाच्या भिंती | ०.०५ पैसे<br>०.०५ पैसे | -- |
| ७. | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरिता असलेले) | अ- आर.सी.सी | -- | ४.०० |

**टिप :-** सदरचे दरामध्ये दर ४ वर्षांनी ५% दर वाढ करण्यात यावी.

शहरामध्ये मालमत्ता व जमिनीचे बाजार मुल्य सतत वाढत आहे. जमिनीचे / मालमत्तेचे वाढते भाव विचारात घेता करयोग्य मुल्य ठरविणेसाठी वरिलप्रमाणे नमुद केलेल्या दरास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरू होण्याबाबत मंजूरी मिळण्याबाबत तर हा जो विषय आहे. ह्याच्यावर आपल्याला थोडासा अभ्यासक्रम करायचा आहे आणि आपल्याला पुर्ण माहिती नसल्याने हा जो आजचा विषय आलेला आहे. तो विषय आपण पुढच्या मिटींगमध्ये ठेवावा.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ५४ हा विषय सध्या पेडींग ठेवण्यात येत आहे. सदरचा विषय पुढील सभेत घेण्यात येईल. सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ५४:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरू करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४४:-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने प्रकरण क्र. ५५ या विषयावर बोलू इच्छितो.

**याकूब कुरेशी :-**

प्रकरण क्र. ५५ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**एस.ए.खान :-**

सदर विषयाला माझे अनुमोदन आहे. मा. महापौर मॅडम, ११ जुलै रोजी जो बॉम्बस्फोट झाला त्याच्यामध्ये आपण जी यादी केलेली आहे. त्याच्यामध्ये प्रथम चिकित्सक आणि डायग्नोसिस सेंटर डॉ. चव्हाण जो आहे त्याला अजुनपर्यंत पैसे दिलेले नाहीत. बाकीचे जे दुसरे आहेत. दुसऱ्या लोकांना रेल्वेच्या मार्फत देण्यात आलेले आहेत. पण यांना देत नाही. का तर म्हणजे यांना सिटीस्कॅन केले आहेत म्हणून देत नाही. पण त्यांनी आपल्या सांगण्यावरुन ११ जुलैला सिटीस्कॅन केल. त्यांनी डायग्नोसिस केल्यानंतरही त्यांच्यावर ट्रीटमेन्ट झाला. म्हणजे महत्वाची भुमिका डॉक्टर चव्हाणने बजावली व त्यांनी रात्री २ वाजेपर्यंत सिटीस्कॅन केले आणि डायग्नोसिस झाल्यानंतर त्यांनी ट्रीटमेन्ट केले त्यांनाच अजुन पैसे मिळालेले नाहीत. सर्व दुसऱ्या डॉक्टरांना, हॉस्पीटलना पैसे मिळालेले आहेत. त्यांना अजुन पैसे मिळालेले नाहीत. ४९ हजार चारशे रुपयाचे बिल आहे. माझी विनंती आहे की, आपल्या महानगरपालिकेच्यातर्फे त्यांना ती रक्कम देण्यांत यावी. त्यांनी माणुसकीच्या नात्याने केले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, भाईंदर मे जो प्रथमेश है। उसके डॉक्टर अभी तक उनको मिला नही है। कमिशनर साहब को भी लेटर दिया है और चव्हाण साहबने पुरी रात सेवा की थी। भाईंदर रोड के उपर दिपक हॉस्पीटलके सामने।

**एस. ए. खान :-**

माझी विनंती आहे की, रेल्वेवाले नाकारतात सिटीस्कॅनला देणार नाहीत तर आपल्या महानगरपालिकेतर्फे देण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे जी माहिती आहे ती सर्व माहिती आपण महापौर दालनाला जमा करा. त्याच्यावर सविस्तर अर्ज करुन आपण तशी मागणी करु.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या ठरावामध्ये दि. १४/७/२००६ ही तारीख दिलेली आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

कमिशनर साहब को सब बिल दे दिया है।

**एस. ए. खान :-**

तो माणूस आपल्या येथे चक्कर मारतो. ही शरमेची गोष्ट आहे.

**मा. महापौर :-**

त्याची तपासणी करुन त्याच्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

यात अपघाताची तारीख दिलेली आहे ती चुकीची आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. उपायुक्त खतगावकर साहेबांना देखील माहिती आहे की, माझ्याकडे देखील अशा दोन तीन केसेस आहेत. हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झालेले आहेत त्यांची नोंद काही, काही ठिकाणी झालेली आहे पण आपल्या महानगरपालिकेच्या लिस्टमध्ये नोंद नाही.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी बॉम्बस्फोटाचा अपघात झाला त्यावेळेची गोष्ट मी तुम्हाला सांगते ती ऐका. सन्मा. सदस्य नलावडे साहेब जरा बोलू द्या. हॉस्पीटलमध्ये एन.ओ.सी. का देत नाही?

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, याची जी लिस्ट आहे .......

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य नलावडे साहेब, ज्यावेळी बॉम्बस्फोट झाला त्यावेळी काही रुग्ण हॉस्पीटलमध्ये गेले होते त्यावेळी त्यांना हॉस्पीटलमध्ये घेतले नाही. त्यांना घरी पाठवले. त्यांना सांगितलं की, आपल्याकडे प्रवेश मिळणार नाही. अशा हॉस्पीटलला एन.ओ.सी. देता कशाला? आपल्याला अशा हॉस्पीटलला एन.ओ.सी. द्यायची नाही. दिपक हॉस्पीटमध्येही घेतले नव्हते आणि आम्ही जेव्हा जबरदस्ती केली तेव्हा हॉस्पीटलमध्ये घेतल नाही. मग असे हॉस्पीटल आपल्याला हवेतच कशाला?

**रतन पाटील :-**

महानगरपालिकेचे हॉस्पीटल चालू करा.

**शुभांगी नाईक :-**

त्यापेक्षा आपले महानगरपालिकेचे हॉस्पीटल चालू करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या प्रस्तावामध्ये जी तारीख दिलेली आहे ती ११/६ नसुन ११/७ अशी आहे.

**रतन पाटील :-**

ही आपलीच कृपा की १५ वर्षामध्ये आपले हॉस्पीटल होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी लिस्ट आपण दिली आहे, विषय पत्रिकेमध्ये .......

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक मॅडम ह्यांनी जे सांगितलेले आहे ते देखील बरोबर आहे. परंतु, ज्यांची ज्यांची लिस्टमध्ये नावे आहेत आणि जे बॉम्बस्फोटात जखमी झालेले आहेत. भाईंदरचे आपले सन्मा. सदस्य आहेत, मेम्बर्स आहेत त्यांची लिस्ट आम्ही आपल्याकडे मा. महापौर दालनामध्ये सादर करतो. आपण ह्याची नियमानुसार चौकशी करा. पोलिस स्टेशनला नोंद आहे, तलाठी कार्यालयात नोंद आहे, तहसिलदाराकडे नोंद आहे. पण काही नोंदी महानगरपालिकेमध्ये झालेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या गोषवाऱ्यात नोंद आहे का? या गोषवाऱ्यामध्येही नोंद नाही.

**एस. ए. खान :-**

रुग्णांची नोंद झालेली आहे. मिरारोडचे दोन तीन जखमी अजुन आहेत. त्यांना अजिबात मदत मिळालेली नाही. त्यांची नोंद होणे चालू आहे. बोरीवली पोलिस ठाण्यामध्ये, मिरा भाईंदरमध्ये त्यांनी अर्ज दिलेला आहे. डॉक्टरचे सर्टिफिकेट्स आहेत पण अजुनही त्यांना मदत मिळालेली नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, सर्व सन्मा. सदस्यांनी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये जे पिडीत होते त्यांच्या विषयी ज्या काही गोष्टी आपल्या समोर नमुद केल्या त्या सर्व गोष्टींचा आढावा घेऊन आपण मा. महापौर दालनामध्ये सर्वांना बोलावून त्या त्या परिने सहकार्य करावे अशी सुचना ह्या ठिकाणी करत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जो या विषयी ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये टिपण्या काय सादर केलेल्या आहेत की, रेल्वेची लिस्ट त्याच्यात आहे का?

(सभागृहामध्ये गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

महापौर दालनामध्ये मांडण्याचा हा विषय नाही.

**मोहन पाटील :-**

एखादा गोषवारा प्रशासनाद्वारे दिल्यानंतर त्याच्यावर ठराव करताना अधिकार अध्यक्षांचा आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही महापौर दालनात का हा विषय नाही आणलात?

**मोहन पाटील :-**

एखादा गोषवारा प्रशासनाने दिल्यानंतर त्याच्यावर ठराव करताना पूर्ण अधिकार अध्यक्षांना आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. ह्याच्यामध्ये तुम्ही विषयच घेतलेला नाही. ह्याच्यात बॉम्बस्फोटची लिस्ट आहे का?

**रतन पाटील :-**

ह्या लिस्टमध्ये अजुनही बरेचशा रुग्णांची नांवे नाहीत. ह्या लिस्टमध्ये तुट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या लिस्टमध्ये बॉम्बस्फोटातील एकाचीही माहिती नाही, नावं नाही.

**मोहन पाटील :-**

मॅडम, जे या ॲक्सीडेंटमध्ये पिडीत झाले त्याच्या करीता सर्व पैसे रेल्वे त्यांना देत आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेने पैसे देण्याचं कबुल केले होतं. परंतु, एका हॉस्पीटलला पैसे दिले होते. आपण त्या बालाजी हॉस्पीटलकडून पैशाची मागणी केली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना आपण लेखी पत्र दिले का?

**मोहन पाटील :-**

पूर्ण पैसे रेल्वे देत आहे. काहींना रेल्वे समोरुन काही पेशंटना पैसे दिलेले आहे म्हणून आपण या ठरावामध्ये पूर्वी गोषवारा वेगळा होता आणि त्यांची नोटिस आपल्याला नंतर आली. म्हणून आता आपण त्या ठिकाणी वेगळा ठराव केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या मा. आयुक्तांनी १३ जुलैला लेखी उत्तर दिलेले आहे की, आम्ही ही सगळी रक्कम देऊ. आता रेल्वेच जे काही देणं आहे तो भाग नंतरचा आहे. हा जो तुम्ही फिगर दिलेला आहे. हा ठराव ठेवण्याची तुम्हाला घाई कसली आहे. हा २० लाखाचा प्रश्न आहे. हे जे दिलेले आहेत त्याची टॅलीसुध्दा होत नाही. मॅडम आपण हे बघता का? तुमचे अधिकारी काय करत आहेत? यामध्ये मिस्टेक आहे हे तुम्ही ठरावात इन्क्ल्युड कराल का? ह्या चर्चा मा. महापौरांच्या दालनात होत नाहीत. सभागृह कशा करिता आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब ............

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त खतगावकर साहेब ही आमची प्रॉपर्टी आहे. हा विषय आपण सदनात आणला आहे. ह्याच्यावर जो काही सोक्ष मोक्ष आहे तो या सदनामध्ये झाला पाहिजे. महापौर दालनामध्ये कशाला जाऊ? या सुचनांवर आपण ठराव पास करुन गेलो .........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्य आपण ऐकूण घ्या. वस्तुस्थिती अशी आहे की ...........

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला बोलू द्या नंतर तुम्ही बोला. विषयपत्रिकेत ही जी लिस्ट दिली आहे त्यामध्ये एक ठिकाणी आपण बॉम्बस्फोटाचा विषय आणला. ह्याची लिस्ट ह्याच्यामध्ये नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ती बाब आपण मंजुर करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे ती लिस्ट आहे. तुमच्या महानगरपालिकेने दिलेले लिस्ट माझ्याकडे आहे. मग ती लिस्ट या लिस्टमध्ये का लागली नाही याचे आम्हाला उत्तर द्या. पहिल्यांदा आम्हाला पहिले बोलू द्या. नंतर तुम्ही त्याचे विश्लेषण करा. तुमचे विश्लेषण आम्ही जरुर ऐकु. याचा खर्च, हॉस्पीटलने तुम्हाला दिलेली बिल ......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे .......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्ही मुद्दा तरी समजुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दे मी सांगतो ते तुम्ही ऐका. प्रशासनाने आम्हाला जी लिस्ट दिली आहे ती लिस्ट दिली आहे ती लिस्ट येथे द्यायला नको का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

ती रक्कम आपण महानगरपालिकेकडून मंजुर करणार होतो. पण संबंधीत सर्व दवाखान्यांना रेल्वे विभागाकडून......

**मिलन म्हात्रे :-**

रेल्वेने अजूनपर्यंत १ रुपयाची रक्कम दिलेली नाही, ११ जुलै रोजी जो अपघात झाला, ठाणे महानगरपालिकेनेसुद्धा रक्कम दिलेली नाही. आता ३ महिने झाले म्हणून ह्या रुग्णांना डिसचार्ज दिला आहे. मॅडम बोलल्या ना त्याला कारण ते आहे. रुग्णांना ॲडमिट करुन घेत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, अधिकारी आपल्याला सविस्तर माहिती देत आहेत. ती माहिती ऐकून घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सांगत आहोत ते ही ऐका ना!

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अधिकाऱ्यांचे म्हणणे अगोदर ऐकून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठाणे महानगरपालिकेने अजूनपर्यंत बिल पेड केलेले नाही म्हणून रुग्णांना हॉस्पिटल वाल्यांनी ॲडमिट केले नाही.

**मोहन पाटील :-**

आपले अधिकारी माहिती देत आहेत ना!

**मिलन म्हात्रे :-**

५७ लाख रुपये बाकी आहेत. आम्ही पत्र देतो आणि पेमेंट करत नाही त्याचे बोला. त्या दिवशी रुग्णांना दिड दिवसानंतर डिसचार्ज द्यावा लागला

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहिबा, ११ जुलै रोजी जी दुर्दैवी घटना बॉम्ब स्फोट मालिका घडली त्यामध्ये आपल्या भाईंदर, मिरा रोडच्या दरम्यान जो बॉम्ब स्फोट झाला त्यामध्ये जी लोक मरण पावली किंवा ज्यांना दुखापत झाली गंभीर स्वरुपात जखमा झाल्या अशा लोकांना आपण आपापल्या हद्दीतील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करुन तातडीने जी वैद्यकिय सुविधा द्यायची होती ती सुविधा आपण त्यांना दिलेली आहे. परंतू, आपण माहिम मध्ये म्हणा, जोगेश्वरीमध्ये म्हणा आणि अन्य ठिकाणी जे बॉम्बस्फोट मध्ये जी लोक मृत्युमुखी आणि जखमी झाले ते काही लोक मिरा - भाइर्दरचे रहीवासी होते. तर अशा लोकांनाही अद्यापही त्याठिकाणी मदत मिळालेली नाही. त्यातील ज्या दोन व्यक्ती आहेत त्या आमच्या प्रभागातील आहेत. एक ओम शिवम मध्ये रहातात आणि एक आमच्या अशोक नगर परिसरात रहातात. आशा दोन व्यक्ती आहेत. ते जोगेश्वरीला झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये ते जखमी झाले आहेत. भाईंदरमध्ये जो बॉम्बस्फोट झाला त्या लोकांना आपण वैद्यकिय सुविधा किंवा आर्थिक मदत किंवा हॉस्पिटलला जे चेक वगैरे द्यायचे आहेत ते केले आहेत. पण अन्य ठिकाणी बॉम्बस्फोट घडले आहेत जसे जोगेश्वरी, माहिम महालक्ष्मीच्या साईडला तिकडे जे भाईंदरचे रहिवासी होते ते तर त्यांना आपण कोणत्या प्रकारे मदत करणार आहोत त्यांना आपण. अजून काही मदत दिलेली नाही आहे. तर अशा लोकांचे म्हणजे मिरा भाइर्दर महानगरपालिकेच्या हद्दीत राहतात. आणि जे जोगेश्वरी माहिम आणि माटूंगा या ठिकाणी जे त्यामध्ये बळी गेलेले आहेत किंवा दुखापत झालेली आहे त्यांनासुद्धा मदत करणे गरजेचे आहे. तर कृपया या गोष्टीची आपण नोंद घ्यावी आणि त्यांना कशाप्रकारे महानगरपालिकेकडुन मदत देता येईल त्या दृष्टीकोनातून प्रामाणिकपणे प्रयत्न झाला पाहीजे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम. हा दुसरा विषय आहे. आता जो १६/८/२००६ रोजी जी अतिवृष्टी झाली त्या अतिवृष्टीमध्ये घोडबंदर गावामध्ये ४ आदीवासी लोकांची घर पडलेली आहेत त्या आदिवासी लोकांची घरे पडलेली आहेत. त्या आदिवासी लोकांना घर बांधण्यासाठी आपल्या आपत्कालीन निधितुन सहकार्य करण्यात यावे असे मी आपल्याला नम्र विनंती आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

या विषयाच्या अनुषंगाने सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तर मी आपल्याला सांगु इच्छितो की, या दुर्दैवी घटनेमध्ये ज्यांना खुप मोठ्या प्रमाणामध्ये दुखापत झालेली होती आणि ज्यांचे आयुष्य आपल्याला सेव करता येत होत म्हणजे त्यांना मदत करुन आवश्यक वैद्यकिय सेवा देऊन त्यांना वाचवता येत होते. अशा सर्वांना तात्काळ सेवा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सन्मा. सदस्यांनी ज्या मोक्यावर स्थळावर ज्या सुचना दिल्या होत्या मा. आयुक्तांनी ती बाब प्रशासनाने मान्य करुन शहरातील सर्व दवाखान्याला त्या रात्री या ट्रीटमेन्टचा खर्च महानगरपालिका करेल असे अवगत केले होते आणि त्या माध्यमाचा फार मोठा उपयोग झाला आणि मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील संबंधित सर्व वैद्यकिय खाजगी व्यवसायक यांनी खुप चांगली मदत केली आणि सर्व बेनिफिसीजलला त्यांनी सेवा उपलब्ध करुन दिल्या. दरम्यानच्या काळामध्ये महानगरपालिकांना त्यांनी लेखी अवगत केले होतं आणि त्याची बिले मागवून आपण विसकुटीनी करण करुन हा त्यांचा खर्च आपण त्यांना देणार होतो. पण संबंधित रेल्वे विभागाकडून ते पैसे त्यांना देण्याचे त्यावेळेस महानगरपालिका प्रशासनाला माहिती मिळाली त्याप्रमाणे आपण हा भाग मोडीफाय केलेला आहे आणि शहरातील ज्या वैद्यकिय सेवा आपल्याला उपलब्ध झालेल्या आहेत. त्या सर्वांना पैसे उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका निश्चित त्यांना मदत करेल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, रेल्वेचे ट्रमिनल कोर्ट असते. याबाबत रेल्वेने तुम्हाला लेखी कळवले आहे का? कारण आपल्या मा. आयुक्तांनी लेखी उत्तर दिले आहे. मी काय म्हणतोय ते नीट पूर्णपणे ऐकून त्याचे एक्सप्लेनेशन व्यवस्थित माहिती घेउन करा. रेल्वेचे ट्रमिनल कोर्ट आहे. रेल्वेने एक रुपयाही दिलेला नाही. ज्याचे फक्त डोळ्यातुन रक्त येत होते त्याला ५ हजार रुपये दिले आणि ब्रेन हॅमरेज झाला, मेंदुला मार लागला त्याला ५०० रुपये दिले आहेत. बऱ्याचशा लोकांचे पैसे आम्ही भक्ती वेदांतला उभे राहून द्यायला लावले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

रेल्वे महामंडळाने आपल्या शहरातील दवाखान्यांना आतापर्यंत १० लाखांचे चेक दिलेले आहेत आणि त्यांचे उर्वरित बिले आहेत त्याच्या तपासणीमध्ये अंडर कन्स्युवेशन आहेत.

**लिओ कोलासो :-**

साहेब, आमचा ह्याच्यावर आक्षेप आहे की, आपण १० लाख म्हणतात आणि सन्मा. सदस्य म्हणतात की, एक नया पैसाही दिलेला नाही. असे बेधडकपणे ते खोटं आहे असे सांगत आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

नाही तसे नाही.

**लिओ कोलासो :-**

सभागृहाची दिशाभूल करित आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय पूर्ण माहितीने आणला पाहिजे होता.

**लिओ कोलासो :-**

अधिकारी सांगतात की, १० लाख रुपये दिले आणि तुम्ही सांगता की नया पैसा दिलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे.

**लिओ कोलासो :-**

प्रत्येकवेळी तुम्ही सभागृहाची दिशाभूल करण्यासारखे बोलत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव देताना आपण त्या ठरावाबरोबर ती माहिती द्या ना की, रेल्वेने १० लाख रुपये दिले आहेत आणि आपण १९ लाख मंजुर केले होते म्हणून आपल्याला द्यायचे नाही. माहिती द्यायला कोणी अडवले होते का? १० लाख रुपये हे तुम्ही आता बोलत आहात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण पूर्णपणे  माहिती ऐकून घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मा. महापौर मॅडम, वैद्यकिय दवाखान्याची ज्यांनी ज्यांनी मदत केली आहे. त्याला प्रशासन पैसा रिइम्बर्समेन्ट करण्यासाठी कटीबध्द आहे. फक्त त्याची डुप्लीकेट होऊ नये म्हणून आपण सध्या ही बाब हे केलेली आहे आणि आतापर्यंत आपण खात्री करु शकता की, जे रेल्वेने पैसे दिलेले आहेत आणि ज्यांची बिले कन्सिड्रेशन आहेत त्यांची माहिती सन्मा. उपायुक्त शेख साहेबांकडे आहे. आपण ती वस्तुस्थिती घेऊ शकता.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, या ठिकाणी विषयपत्रिकेमध्ये आम्हाला असे लिहले गेले आहे की, बॉम्बस्फोटामध्ये जे लोक जखमी झाले आहेत त्यांची यादी आहे. पण यादी नव्हती म्हणून हा मुद्दा उपस्थित झाला. यादी सोबत जोडलेली नाही. दुसरे ज्या ठिकाणी आपण शेवटच्या पानावर बघा, हॉस्पीटलची यादी दिलेली आहे. त्याच्या खाली श्री. मिल्टन डिसोझा बॉक्सींग स्पर्धा यासाठी ५० हजार रुपये निधी म्हणून दिले आहेत. कुमारी सिंपल कौर वेटलिप्टींग स्पर्धामध्ये यांना ५० हजार बस दुर्घटनेतील धनादेश १ लाख ९० हजार आहे. ह्याची टोटल ११ लाख ९० हजार रुपये होत आहे. पण ह्या ठिकाणी चुकून १३ लाख १० हजार रुपये झालेले आहेत. ती दुरुस्ती करुन घ्यावी, ही माझी विनंती आहे. एका बाजुने ठाणे महानगरपालिकेचे असे म्हणणे आहे की, जेव्हा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी श्री. संजय सेठी ठाणे महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेबांशी बोलले तेव्हापर्यंत ठाणे महानगरपालिकेने कुठल्याही हॉस्पीटलला पैसे पाठविलेले नव्हते आणि ते आजही दिले गेलेले नाहीत अशा बऱ्याच मिसअंडरस्टॅन्डीग डॉक्टरांमध्ये आणि ठाणे महानगरपालिकेमध्ये डॉक्टरांचा विश्वास नव्हता म्हणून मा. आयुक्त साहेबांना प्रत्येक डॉक्टरांना लेखी द्याव लागले की, जर तुम्हाला एखादा पेशंट पैसे देऊ शकला नाही तर महानगरपालिका कटीबध्द आहे, महानगरपालिका पेमेन्ट करणार त्यानंतरच डॉक्टरांनी त्यांच्यावर थोडेफार ट्रिटमेन्ट व्यवस्थित करायला सुरुवात केली. पण जर आता रेल्वेने जर पेमेन्ट केले नाही तर आपली महानगरपालिका कटीबध्द आहेच ह्याची आपण कृपया ठरावात नोंद करुन घ्या. जर उद्या रेल्वेने सांगितले की, पालघर कोर्टात जावे लागेल. केबिनेटच्या पुढे केस लढाल तर दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्ष जातील. तेव्हापर्यंत डॉक्टर लोक काय सहन करणार आहेत. भविष्यात अनेक ॲक्सिडेन्ट होऊ शकतात. त्यावेळी कुठलाही डॉक्टर महानगरपालिकेच्या विश्वासावर असे कोणालाही ॲडमिट करणार नाही. म्हणून मी सांगतोय की, जर रेल्वेने पेमेन्ट केले नाही तर आपण ज्याप्रमाणे आज कटीबध्द आहोत तो पेमेन्ट आपण पहिला करावा आणि नंतर डॉक्टर लोक आपल्याला रिफन्ड करतील इतके प्रामाणिक आपले डॉक्टर आहेत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा यांनी सांगितले की, रेल्वे बोर्डाने जर हॉस्पीटलचे पेमेन्ट केले नाही तर हे महानगरपालिकेने करायचे. मा. महापौर मॅडम, प्रत्येक हॉस्पीटलमध्ये अव्वाच्या सव्वा बिल दिलेले आहेत. एक ठिकाणी जेथे ५ हजाराचे बिल पाहिजे तिथे ५० हजार रुपयाचे बिल सांगत आहेत आणि ती जबाबदारी रेल्वे बोर्डाने घेतलेली होती. महानगरपालिकेने ही सगळी जबाबदारी घेतली नव्हती. आज जे सन्मा. सदस्य सांगत आहेत की, सगळे हॉस्पीटल सांगेल तेवढे बिल महानगरपालिकेने

भरायचे. मॅडम, हे असे होऊ शकत नाही. ही जबाबदारी रेल्वेची देखील तेवढीच आहे. महानगरपालिकेकडे फार मोठे बजेट नाही. परंतु, तरी देखील महानगरपालिका हॉस्पीटलमध्ये जे सर्व अॅडमिट आहेत त्यांची आपण सेवा करत आहोत. जे अॅडमिट झालेले आहेत परंतु, ज्यांच्यावर उपचार झालेले आहेत त्यांच्यावर खर्च झाला आहे त्यांची नांवे नाहीत. त्यांना महानगरपालिकेने निश्चितपणे न्याय द्यावा. परंतु, रेल्वे बोर्डाची संपूर्ण जबाबदारी आपल्या महानगरपालिकेने स्विकारु नये अशी मी आपल्याला याठिकाणी विनंती करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ज्या दिवशी दुर्घटना घडली सर्व लोकांनी आपल्या परीने प्रयास केला त्या लोकांना मदत करण्याचा पण काही अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरुन काही नगरसेवकांच्या सांगण्यावरुन काही लोकांनी औषध पुरवठा केला, काही केले की, आम्ही तुम्हाला बिल नंतर देऊ आणि माझ्या स्वतःच्या मेडीकल मधून एक, दोन लोकांनी माझ्या नावाने मेडीसीन घेऊन गेले. ह्यांनी पाठवले सांगून मी त्यांचे नाव घेत नाही. पण अशा जबाबदार व्यक्तींनी पाठवलेलं आहे.

**लिओ कोलासो :-**

नाव सांगा ना. मी ह्यांना औषध दिले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ऐका ना ज्या ज्या व्यक्तींनी जबाबदारी घेतलेली आहे. साहेब, पैशाचा प्रश्न नाही.

**महेंद्रसिंग चौहान :-**

नाम बताईए किसलिए उपकार लेने का। मेहरबानी कि है तो अच्छा काम किया है। आपने अच्छा काम किया है। नाम बताईए औषध कौन ले गया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हे नाव मा. खतगांवकर साहेबांना माहीत आहे. मी त्यांना सांगितलेले आहे. मॅडम, माझे म्हणणे असे आहे की, ज्या कोणीही आपल्या सांगण्यावरुन किंवा कुठल्या तरी नगरसेवकांच्या सांगण्यावरुन औषध पुरवठा केला आहे किंवा काही वस्तु फुकट पुरवली त्यांनी माणुसकीच्या दृष्टीने प्रशासनाला कळवले पाहीजे की, त्या दुकानातून एवढी औषधे गेलेली आहेत फार मोठी रक्कम नाही. पण एखादा व्यापारी पण म्हणजे चार लोक बॉम्ब स्फोटात नेले आणि महानगरपालिका पैसे देणार म्हणून व्यापारी मरतील अशी गत झाली नाही पाहिजे याची दक्षता घ्यावी.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आहे की, बॉम्ब स्फोटात जे अपघात झाले त्यात राई गावातील स्थानिक श्री. अरुण दिनानाथ पाटील यांनी प्रायव्हेट हॉस्पिटलला उपचार केलेले आहेत त्यांच्या नावाची नोंद करण्यात यावी.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ५५ :-**

आपात्कालीन केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दि. ०२/०५/२००६ रोजी ठाणे परिवहन सेवेची बस चेणा येथील नदीत पडून फार मोठा अपघात झाला. या बसमध्ये बरेच प्रवासी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील होते. या दुर्घटनेमध्ये ३५ लोक मृत्युमुखी पडले व ३४ लोक जखमी झाले या दुर्घटना स्थळावर महानगरपालिकेमार्फत त्वरीत अग्निशमन दल व रूग्णवाहीका सेवा पाठवून मृत्युमुखी पडलेल्यांना बाहेर काढले व जखमींना बस मधून बाहेर काढून रूग्णालयात औषधोपचारा करीता तातडीने हलविण्यांत आले या बस दुर्घटनेतील मृत व्यक्तींना व जखमींना मानवतेच्या दृष्टीने अनुक्रमे २५ हजार व रू. १० हजार अनुदान देणेबाबत मा. महापौर महोदयांनी महासभेच्या मान्यतेने सभागृहात दि. १८/०६/२००६ रोजीचे महासभेमध्ये घोषणा केली होती.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा रोड येथे दि. ११ जुलै २००६ रोजी बॉम्ब स्फोट झाला होता. त्या दिवशी मिरा भाईंदर शहरातील विविध खाजगी रूग्णालयामध्ये जखमिंना दाखल करण्यात आले होते. त्या रूग्णांवार पैशाअभावी उपचारामध्ये कमतरता पडून रूग्ण दगावण्याची शक्यता होती. त्यामुळे त्या रुग्णांवर खाजगी डॉक्टरांकडून योग्य उपचार होण्यासठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तत्काळ बॉम्ब स्फोटातील जखमींची दखल घेऊन बॉम्बस्फोटातील जखमीवर होणार खर्च महानगरपालिकेकडून देण्यात येईल असे सांगितले म्हणून सर्व खाजगी रूग्णालयातील डॉक्टर्सनी शर्थीचे प्रयत्न करून अनेक रूग्णांचे प्राण वाचविले. दि. १३/०७/२००६ रोजी या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/आरोग्य/३५७/२००६-०७ नुसार लेखी कळविण्यात आले. त्यानंतर विविध वृत्तपत्रातुन अशा बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या की, सदर खर्च हा शासन किंवा रेल्वे प्रशासन देणार आहे. परंतु, बॉम्ब स्फोटात झालेल्या जखमी रूग्णांना वैद्यकीय उपचार तातडीने उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिकेने वरील घोषणा केली होती. दि. १ ऑगस्ट, २००६ रोजी पश्चिम रेल्वेने वृत्तपत्रात जाहिर केलेल्या आव्हानानंतर जाहिरातीत नमुद केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधला

असता पश्चिम रेल्वेच्या डॉ. इंदिरा सारनाथ यांच्या समवेत दुरध्वनीवर केलेल्या चर्चेनुसार बॉम्ब स्फोटात जखमी झालेल्या रूग्णांवरती करण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयाचा झालेला खर्च अन्वये देणार असल्याचे सांगितले व महापालिकेकडे असलेली खाजगी रुग्णालयाची देयके रेल्वे प्रशासनाकडे सादर करावी असे सांगितले. त्यामुळे दुबार प्रदान होऊ नये म्हणून सदरची देयके खाजगी रूग्णालयांना प्रदान करण्यात आलेली नाहीत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय खेळांत प्राविण्य मिळाल्याबाबत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मा. महापौरांनी महासभेच्या मंजुरीने सभागृहात घोषित केल्याप्रमाणे श्री. मिल्टन डिसोजा, बॉक्सींग स्पर्धेबाबत अनुदान रक्कम रू. २,३०,०००/- व श्रीम. सिंपल कौर, वेटलिफ्टींग स्पर्धेत अनुदान रू. ५०,०००/- देण्यात आलेले आहेत.

अशा प्रकारे उक्त तिन्ही बाबतीत महानगरपालिका फंडातुन खालीलप्रमाणे झालेल्या खर्चास (१) बस दुर्घटना रू. १२,१५,०००/- (२) बॉम्ब स्फोट दुर्घटना रू. २,०५,९५०/- (३) खेळातील प्राविण्य अनुदान रू. २.८० लाख असे एकूण रू. १७,००,९५०/- रक्कमेचे अनुदान वाटपास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (३) नुसार या ठरावाद्वारे कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. याकूब कुरेशी.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसेवकांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

श्री. रमेश धरमचंद्र जैन ह्या सन्मा. सदस्यांचा प्रश्न आहे व ते सभेत गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. ५६ :-**

सन्मा. सदस्य श्री. रमेश धरमचंद्र जैन यांचे दि. १६/७/०६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मौजे भाईंदर स.क्र. २६२/१ नविन मंजूर बांधकामापेक्षा जास्त बांधकाम केल्याने लेखी तक्रार करुन सुद्धा कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासन नगर विकास परिशिष्ट क्र. जी. ई. एन १०९६/४५ प्र.क्र. १५/नवि २७ अन्वये कारवाई करणे.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**नगरसचिव:-**

श्री. रविंद्र भिमदेव माळी हे देखील आजच्या सभेला गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. ५७ :-**

सन्मा. सदस्य श्री. रविंद्र भिमदेव माळी यांचे दि. २/८/०६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. काजुपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुवठा पाईपलाईन टाकणेकामी जागा दिलेल्या कर्मचाऱ्यांना कमहानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक देणेबाबत.

(मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५८ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील हा विषय स्थायी समितीमध्ये घेण्यात आलेला आहे व स्थायी समितीमधून मा. महासभेमध्ये या विषयाची शिफारस करयात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

स्थायी समितीमधून महासभेला हा विषय शिफारस करण्यांत आलेला आहे आणि हा विषय मा. महासभेवर आपल्या माध्यमातुन म्हणजे, प्रशासनाच्या माध्यमातुन आला नाही.

**मा. महापौर :-**

मा. महासभेमध्ये सदरचा विषय आल्यानंतर आपण त्यावर सविस्तर चर्चा करुया.

**रतन पाटील :-**

आता चर्चा करायला वेळ नाही का?

**मा. महापौर :-**

त्यावेळेस चर्चा करुया. सदरचा विषय सभेमध्ये घेण्यात येणार आहे.

**रतन पाटील :-**

नक्की.

**मा. महापौर :-**

होय.

**प्रकरण क्र. ५८ :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक ०३/०८/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी आपत्कालिन परिस्थिती तात्पुरत्या स्वरूपात राहण्याकरिता संक्रमण शिबिराची व्यवस्था करणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, विषय पत्रिकेवरील विषय संपले असतील तर मला शोकप्रस्ताव मांडायचा आहे. मा. भारतरत्न बिसमिल्ला खॉ यांचे निधन झालेले आहे आणि त्या निधनामध्ये ही सभा त्यांना श्रध्दांजली अर्पण करत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर परिसरात ११ तारखेला जो बॉम्बस्फोट झाला. त्याच्यामध्ये ज्या व्यक्ती मरण पावल्या त्यांच्याकरितासुध्दा आपण श्रध्दांजली वाहू या. त्यावेळेला ठराव झाला होता पण त्यानंतरसुध्दा काही व्यक्ती मरण पावल्या आहेत.

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेतील आर्किटेक्ट श्री. गिरिश प्रधानजी यांच्या मातोश्री यांचेही दुःखद निधन झाले आहे त्याबद्दल देखील ही सभा दोन मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना आदरांजली वाहत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

उपसचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्या मातोश्री यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्याच्यासाठीसुध्दा ही मा. महासभा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ४६ :-**

भारतरत्न मा. बिसमिल्ला खॉ यांचे निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर परिसरात ११ तारखेला जो बॉम्बस्फोट झाला. त्याच्यामध्ये ज्या व्यक्ती मरण पावल्या. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आर्किटेक्ट श्री. गिरीश प्रधानजी ह्यांच्या मातोश्री व उपसचिव श्री. वासुदेव शिरवळकर ह्यांच्या मातोश्री ह्यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्या सर्व मृतांना ही सभा त्यांना श्रध्दांजली अर्पण करत आहे.

सर्व मृतांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधु व प्रेक्षक आपल्या सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ३.१५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**